

# सेवा संकल्प



रूही संस्थान





पुस्तक २

# सेवा संकल्प

रुही संस्थान

या मालिकेतील पुस्तके:

खाली रुही संस्थेने प्रकाशित केलेल्या मालिकेतील वर्तमान शीर्षके आहेत. तरुण आणि प्रौढांना, त्यांच्या समुदायाची सेवा करण्याची क्षमता वाढवण्यासाठी पद्धतशीर प्रयत्नांमध्ये अभ्यासक्रमांचा मुख्य क्रम म्हणून या पुस्तकांचा वापर करण्याचा हेतू आहे. रुही संस्था लहान बहाई मुलांच्या वर्गाच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी या मालिकेतील तिसऱ्या पुस्तकातील अभ्यासक्रमावर आधारीत शाखा अभ्यासक्रमाचा एक संच देखील विकसित करत आहे, तसेच किशोर युवा गटांच्या अनुप्रेरकांची संख्या वाढवण्यासाठी पुस्तक ५ मधील एक अधिक संच विकसित करत आहे. हे सर्व खालील सूचीमध्ये समाविष्ट आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की कार्यक्षेत्रांच्या प्रगतीच्या अनुभवानुसार या यादीमध्ये बदल होऊ शकतात आणि विकासाधीन अनेक अभ्यासक्रम घटक ज्या टप्प्यावर ते मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केले जाऊ शकतात अशा टप्प्यावर पोहोचल्यामुळे अतिरिक्त शीर्षके जोडली जाऊ शकतात.

पुस्तक १ दिव्य जीवन — एक चिंतन
पुस्तक २ सेवा संकल्प
पुस्तक ३ लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी १
लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी २ (शाखा अभ्यासक्रम)
लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी ३ (शाखा अभ्यासक्रम)
लहान मुलांच्या वर्गासाठी अध्यापन, श्रेणी ४ (शाखा अभ्यासक्रम)
पुस्तक ४ युगल अवतार
पुस्तक ५ युवाकिशोरांच्या शक्ती मुक्त करणे
प्रारंभिक आवेग: पुस्तक ५ चा पहिला शाखा अभ्यासक्रम
विस्तारित वर्तुळ: पुस्तक ५ चा दुसरा शाखा अभ्यासक्रम
पुस्तक ६ प्रभूधर्माचा संदेश—प्रसार
पुस्तक ७ सेवेच्या मार्गावर एकत्रित चालणे
पुस्तक ८ बहाउल्लाह ह्यांचा करारनामा
पुस्तक ९ ऐतिहासिक दृष्टीकोन प्राप्त करणे
पुस्तक १० प्रगतिशील समुदाय निर्माण करणे
पुस्तक ११ भौतिक साधन
पुस्तक १२ कुटुंब आणि समुदाय
पुस्तक १३ सामाजिक क्रियांमध्ये संलग्नता
पुस्तक १४ समाजातील प्रचलीत वार्तालापांमध्ये सहभागीता

कॉपी राईट © २०२३ — रूही फाउन्डेशन, कोलंबिया
सर्वाधिकार सुरक्षित, संस्करण २.१.१.पीई २०२३ मध्ये प्रकाशित
भारतामध्ये मुद्रित

मूळतः स्पॅनिशमध्ये या नावाने प्रकाशित - *Levantémonos a servir*
कॉपी राईट © १९८७, १९९६, २०२० — रूही फाउन्डेशन, कोलंबिया
ISBN 978-958-52941-0-3

या पुस्तकाच्या मर्यादित मुद्रणाची परवानगी रुही संस्थेने क्षेत्रिय प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र आणि गोवा यांना दिलेली आहे.

रूही संस्था
काली, कोलंबिया
ईमेल: instituto@ruhi.org
वेबसाईट: www.ruhi.org

क्षेत्रिय प्रशिक्षण संस्था
कोर्ट चेंबर्स,
३५, न्यू मरीन लाईन्स,
मुंबई ४०००२०

# विषयसूची


सहशिक्षकासाठी काही विचार ............................................. V

धर्म प्रचार–प्रसार सेवेचा आनंद ........................................... १

उत्थानकारक वार्तालाप ..................................................... १७

दृढीकरणाचे विषय ........................................................ ३९

# सहशिक्षकासाठी काही विचार

हे पुस्तक, रुही संस्थेने प्रस्तुत केलेल्या अभ्यासक्रमांच्या मुख्य क्रमातील दुसरे पुस्तक आहे, जे अर्थपूर्ण आणि उत्थानकारक संभाषणात योगदान देण्यास आपल्याला समर्थ करणाऱ्या क्षमतांशी संबंधित आहे. या पुस्तकाच्या तिसऱ्या घटकामध्ये सेवेच्या विशिष्ट कृतीवर लक्ष केंद्रित केलेले आहे. आजच्या जगात जेथे सामर्थ्यशाली शक्ती विविध संप्रदायातील अनुबंध तोडत आहेत, अशा वेळी समाजजीवनाच्या केंद्रस्थानी असलेल्या विषयांचा शोध घेण्यासाठी मित्रांच्या आणि शेजाऱ्यांच्या घरी भेट देण्याची प्रथा जर संस्कृतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य बनली, तर वाढत्या अलिप्ततेतून उद्‌भवलेल्या काही आजारांवर उपाय होऊ शकेल. हा तिसरा घटक हे सुचवितो की असे मैत्रीचे संबंध प्रगतीशील आणि सामंजस्यपूर्ण समुदाय तयार करण्याच्या प्रक्रियेला बळकटी आणतात.

प्रभागातील किंवा गावातील घरांना भेटी देण्याचा कार्यक्रम कायमस्वरूपी करण्यासाठी काही प्रमाणात व्यवस्थित पध्दतींची आवश्यकता असते, ज्यामध्ये समर्पित मित्रांना केंद्रस्थानी ठेवून योग्य ती मदत करणाऱ्या प्रशासकीय संस्थांचा आणि समित्यांचा समावेश असावा लागतो. पुस्तकाद्वारे एखाद्या गटाला मार्गदर्शन करताना, सहशिक्षकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की सुरु असलेल्या अशा प्रयत्नात सामील होण्यासाठी सहभागींना तयार केले जात आहे. त्यांच्या अभ्यासाचा एक घटक म्हणून आयोजित केलेल्या अशा भेटींतून, त्यांच्यात वर्षानुवर्षे भाग घेण्याची वचनबद्धता निर्माण झाली पाहिजे, जो त्यांच्या सेवाजीवनाचा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे.

आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्वाच्या विषयांचा शोध घेण्याच्या स्पष्ट हेतूने घरांना भेट देण्याची प्रथा समुदायाची संस्कृती विपुलपणे समृद्ध करते. घरात आणि कामाच्या ठिकाणी, शाळेत आणि बाजारात होणाऱ्या अनेक अनौपचारिक चर्चा या संदर्भात तितक्याच महत्त्वाच्या आहेत. रोजच्या संभाषणात वेळोवेळी आध्यात्मिक तत्त्वांचा परिचय करून देणे ही एक क्षमता आहे जी लक्ष देण्यास पात्र आहे. त्याचा विकास हा दुसऱ्या घटकाचा मुख्य विषय आहे, अशा प्रकारे, तिसऱ्या घटकामध्ये होणाऱ्या अभ्यासाचा त्याने पाया घातला जातो.

जर मित्र आणि शेजारी यांच्याशी आपले संभाषण उत्थानकारक व्हायचे असेल तर आपण त्यांच्याशी संवाद साधण्यात आनंद आणण्यास समर्थ असले पाहिजे. हा विषय पहिल्या घटकात “धर्म प्रचार–प्रसार सेवेचा आनंद” मध्ये संबोधित केला आहे. रुही संस्थेने शिफारस केलेल्या सर्व सेवा कृतींमध्ये, थोडक्यात, बहाउल्लाह यांच्या प्रकटीकरणाच्या महासागरात आपल्याला सापडलेल्या दैवी ज्ञानाचे मोती इतरांसोबत सामायिक करणे समाविष्ट आहे. पहिल्या घटकाच्या अभ्यासाचा हेतू या शोधात अंतर्भूत असलेल्या आनंदाची जाणीव वाढवणे हा आहे. सहभागींना अनेक विभागांमध्ये परमेश्वराच्या वचनांबद्दल विचार करण्यास आणि ते इतरांसह सामायिक करणे हा किती मोठा आशीर्वाद आहे ते सांगितले जाते. या कृतीतून, हा घटक प्रस्तावित करतो की आपण सेवेच्या मार्गावर चालत असताना हा आनंद आपली पावले जलद करतो. तरीही, या गहन आध्यात्मिक सत्याची पूर्ण खात्री असतानाही, सेवेत फरक करणाऱ्या गुणांचा आणि वृत्तींचा विचार न केल्यास आपण शिकवण्याचा आनंद गमावू शकतो. या मालिकेतील नंतरच्या अनेक पुस्तकांमध्ये हे चर्चेचे विषय आहेत आणि विभाग ७ मध्ये निरासक्तीपासून सुरुवात करून फक्त काही येथे तपासले गेले आहेत. बहाई पवित्र लेखनातील उद्धरणांची निवड या गुणवत्तेवर प्रतिबिंबित

करण्यासाठी आधार बनते, जर काही बाह्य घटकांना सेवेचा आनंद कमी करू द्यायचा नसेल तर ही गुणवत्ता अपरिहार्य आहे. महत्त्वाचे म्हणजे निरासक्तीचा अर्थ अलिप्तपणा किंवा काळजीचा अभाव असणे या चुकीच्या कल्पनेने सहभागी त्यांच्या अभ्यासापासून दूर जात नाहीत ना ते पाहणे. आम्ही आमचे परिश्रम अधिक तीव्र करण्यासाठी आणि आमच्या सेवेची परिणामकारकता वाढवण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत कारण आम्ही अधिक उत्तमोत्तम परिणाम मिळवण्याचा प्रयत्न करतो. यासाठी प्रयत्नांच्या स्वभावाची पुरेशी समज असणे आवश्यक आहे, एक विषय ज्याचा विभाग ८ मध्ये विचार केला आहे. सेवेच्या मार्गासाठी मूलभूत असलेल्या आशावाद आणि कृतज्ञता या दोन वृत्तींची पुढील आणि अंतिम विभागात थोडक्यात चर्चा केलेली आहे.

पुस्तकाचा दुसरा घटक, “उत्थानपूर्वक संभाषणे”, जेव्हा प्रसंग अनुमती देतो तेव्हा आध्यात्मिक तत्त्वांचा संदर्भ देऊन अनौपचारिक संभाषणाची पातळी वाढवण्याच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये विविध विषयांवरील अनेक लहान विधाने आहेत, जी अचूक उद्धरणे नसली तरी, अब्दुल—बहांच्या वचनांवर आधारित आहेत आणि त्यांनी वापरलेले अनेक शब्द आणि वाक्ये त्यात समाविष्ट आहेत. ते सार्वत्रिक परिणाम करणारे आहेत आणि सर्व पार्श्वभूमीच्या लोकांच्या आकांक्षा आणि चिंतांबाबत बोलतात. अशी आशा आहे की, या विधानांचा अभ्यास करून, ज्या पद्धतीने अब्दुल—बहांनी आध्यात्मिक तत्त्वे समजावून सांगितली, त्यापासून सहभागी प्रेरणा घेतील आणि बहाउल्लाह यांच्या प्रकटीकरणाच्या महासागरात दडलेले मोती शोधण्याचा प्रयत्न करताना आणि त्यांच्या पित्याच्या शिकवणींचा अर्थ आणि परिणाम समजून घेऊन तो इतरांना सढळपणेने सामायिक करतांना, अब्दुल—बहांकडे उन्मुख होण्याची सवय त्यांना लाभेल.

घटकाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, सहभागींना प्रत्येक उद्धरणे अनेक वेळा वाचण्याची, विचारांची क्रमवारी ओळखण्याची आणि विचार चांगले आत्मसात होईपर्यंत ते म्हणण्याचा सराव करण्याची संधी दिली पाहिजे, जेणेकरून ते नैसर्गिकरित्या त्यास व्यक्त करू शकतील. सुरुवातीला, ते काही विधाने कंठस्थ करतील आणि कमी—अधिक प्रमाणात ते घटकामध्ये जसे आहेत तसे त्याची पुनरावृत्ती करतील. हे अपेक्षितच आहे. जसजसे त्यांचे धर्मश्रध्देचे ज्ञान वाढत जाईल आणि त्यांचा अनुभव वाढत जाईल, तसतसे ते सामग्रीच्या विस्तृत श्रेणीशी आणि अधिक समृद्ध शब्दसंग्रहाशी परिचित होतील, जे त्यांच्या इतरांशी होणाऱ्या संवादातून दिसून येईल. सहशिक्षकाने हे ओळखले पाहिजे की, या टप्प्यावर, जे उद्दिष्ट आहे ते दुहेरी आहे: सुलभतेने शिकवणी समजावून सांगता येणे आणि अब्दुल—बहांच्या विचाराशी समांतर असणे.

सहभागींनी प्रत्येक विधानाची सामग्री सादर करण्यास शिकल्यानंतर, ते दुसऱ्या क्रियाकलापाकडे जातात ज्यामध्ये त्यांना त्यांच्या कुटुंब, मित्र आणि सहकाऱ्यांशी निगडित समस्यांवर त्यांनी अभ्यास केलेल्या कल्पनांशी संबंध जोडण्यास प्रोत्साहित केले जाते. यासाठी, त्यांना संभाषणात उपस्थित केलेल्या काही विषयांचा आणि प्रश्नांचा विचार करण्यास आणि त्यांना चर्चेत विधानांचा परिचय करून देण्याची शक्यता कुठे असेल हे ठरविण्यास सांगितले जाते. काही विधानांसाठी, अब्दुल—बहांनी सांगितलेली आध्यात्मिक तत्त्वे सार्वत्रिक लोकांच्या निगडित विषयांवर कसा प्रकाश टाकतात हे स्पष्ट करण्यासाठी एक किंवा दोन उदाहरणे दिली आहेत. पुस्तकाचा अभ्यास सुरू असतानाच, सहशिक्षक प्रत्येक सहभागीला विधानांपैकी एक सुचवून त्यात समाविष्ट असलेल्या कल्पनांवर संभाषण करण्यास

दोन व्यक्तींची निवड करण्यात मदत करण्यास सक्षम असेल तर हा सराव अधिक चांगले फळ देईल. अशाप्रकारे, सहभागींशी एकत्र भेटताना, ते ज्या संभाषणांमध्ये गुंतले आहे त्यांच्या गतिशीलतेचे एकमेकांना वर्णन करण्यासाठी वेळ बाजूला ठेवला जाऊ शकतो.

घटकामधील प्रत्येक विधानासाठी, बहाउल्लाह यांच्या पवित्र लेखनातील काही उद्धरणे कंठस्थ करण्यासाठी समाविष्ट केले आहेत. मालिकेतील पहिल्या पुस्तकात रुही संस्थेने उद्धरणे कंठस्थ करण्यावर दिलेला भर आधीच स्पष्ट आहे, जो तद्नंतर पुस्तक २ मध्ये अधिक स्पष्ट होतो. असे गृहीत धरण्यात येते की, सहभागींनी पवित्र लेखनातील उद्धरणे वेळोवेळी कंठस्थ केल्यामुळे, त्यांना प्राप्त होणाऱ्या आध्यात्मिक पोषणाची जाणीव आतापर्यंत झाली आहे. त्यामुळे या पुस्तकात, ते परमेश्वराच्या वचनांच्या मानवी हृदयावर होणाऱ्या परिणामांवर अधिक चिंतन करतील, आणि दुसऱ्या घटकाप्रमाणेच, तिसऱ्या घटकातदेखील, ते त्यांच्या संभाषणात आणि लेखनात आढळणारी तत्त्वे आणि कल्पना मांडण्यास शिकतील, तसेच जेव्हा योग्य असेल तेव्हा ते ही उद्धरणे उद्धृत करतील. शिकवणी अचूकपणे समजावून सांगणे आणि इतरांना त्या त्यांच्या शुद्ध स्वरूपात सामायिक करणे, ही क्षमता आपण सर्व सेवेच्या मार्गावर चालत असताना विकसित करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्याची सुरुवात करण्याचे एक उत्तम ठिकाण म्हणजे, अब्दुल–बहांच्या स्पष्टीकरणांचा अभ्यास करून आणि त्यांनी ज्या पद्धतीने ते व्यक्त करण्याचा प्रयत्न केला ते समजून घेणे हे आहे आणि दुसऱ्या घटकाच्या रचनेचा तो आधार आहे.

वर दर्शविल्याप्रमाणे, “दृढीकरणाचे विषय” शीर्षक असलेला तिसरा घटक, या पुस्तकात संबोधित केलेल्या सेवेच्या कृतीकडे वळतो –म्हणजेच, समुदायाच्या जीवनासाठी महत्त्वपूर्ण चर्चेत सहभागी होण्याच्या स्पष्ट हेतूने मित्रांना आणि शेजाऱ्यांना भेटी देणे. या घटकामध्ये तीन प्रकारच्या संभाषणांचा विचार केला आहे आणि प्रत्येकासाठी विशिष्ट सामग्री सुचविली आहे. पहिला प्रकार खेड्यातील किंवा प्रभागातील रहिवाशांसह पद्धतशीर भेटींच्या कार्यक्रमात चर्चिल्या जाणाऱ्या विषयांशी निगडित आहे. जरी विशेष स्वारस्य असलेल्या श्रोत्यांसह वरील सामग्रीवर विविध मार्गांनी चर्चा केली जाऊ शकते, तरी –घरातील सर्व सदस्यांना त्यांचे धर्मश्रध्देचे ज्ञान वाढवण्याची संधी देणे हाच मूळ हेतू असल्यामुळे– त्याच्याशी संबंधित संभाषणावर या घटकात मोठा भर दिलेला आहे.

तरीही, अलिकडच्या वर्षांत घरांना भेट देण्याच्या प्रथेने नवीन स्वरूप घेतले आहे, विशेषत: गाव आणि शहरी वस्त्यांच्या पातळीपर्यंत लहानात लहान भौगोलिक घटकात सहशिक्षक, युवाकिशोर गटांचे अनुप्रेरक आणि लहान मुलांच्या वर्गांचे शिक्षक म्हणून सेवा करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत वाढ झाली आहे. हे उल्लेखनीय आहे की, ही प्रथा केवळ धर्मश्रध्देच्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या हेतूनेच नव्हे, तर युवाकिशोरांचे आध्यात्मिक सशक्तीकरण आणि लहान मुलांचे नैतिक शिक्षण यासंबंधीचे कार्यक्रम यशस्वीपणे योजण्यासाठी देखील आवश्यक आहे असे लक्षात आले आहे. यामध्ये, अनुप्रेरक आणि शिक्षकांनी पालकांच्या नियमित भेटी घेऊन कार्यक्रमांना आकार देणाऱ्या संकल्पना आणि दृष्टिकोनांवर चर्चा करणे आवश्यक आहे हे स्पष्ट झाले आहे. हा आहे संभाषणाचा दुसरा प्रकार, ज्याचे परिक्षण विभाग १४ आणि १५ मध्ये केले आहे. या विभागांमध्ये समाविष्ट केलेली सामग्री फार विस्तृत नाही, कारण भविष्यातील सहभागी या दोन शैक्षणिक कार्यक्रमांशी अधिक परिचित होतील. तथापि, त्यांना या प्रकारच्या संभाषणाच्या महत्तेची जाणीव माहित असणे, आणि बालकवर्गाच्या शिक्षकांना व युवाकिशोर गटांच्या अनुप्रेरकांना पालकांच्या भेटींमध्ये सोबत घेणे हे या सुरुवातीच्या टप्प्यावर अत्यंत फलदायी ठरू शकते.

घटकामध्ये मांडलेल्या संभाषणाचा तिसरा प्रकार एक विशेष उद्देश पूर्ण करतो. जगाच्या उन्नतीसाठी योगदान देण्याची उत्कट इच्छा असलेले अनेक तरुण स्त्रीपुरुष ती व्यक्त करण्याचे मार्ग शोधत आहेत. समाजाला बदलण्याची प्रचंड क्षमता त्यांच्यामध्ये आहे आणि तो बदल करण्याची त्यांची तीव्र इच्छा आहे. तरुणपणीच समवयस्कांशी संभाषण करतांना ते अद्वितीय संधी आणि जबाबदाऱ्यांवर विचार करत असतात, त्यांच्या या उत्कट ऊर्जेमुळे आणि क्षमतेमुळे, त्यांच्यासोबत सेवाकार्याची वारंवार चर्चा होऊ शकते आणि जगभरातील प्रभागात आणि खेडोपाडी सुरू असलेल्या कामात त्यांचा रस वाढवू शकते. त्यांच्यापैकी असंख्य, लहान मुलांच्या बालकवर्गाचे शिक्षक आणि युवाकिशोर गटांचे अनुप्रेरक या भूमिकेतून वाढत्या पिढ्यांना आध्यात्मिक शिक्षण देण्याची क्षमता संपादन करण्याचे साधन म्हणून, रुही संस्थेच्या अभ्यासक्रमांमध्ये सामील होण्याचे आमंत्रण स्वीकार करतील. विभाग ९ आणि १० मध्ये याबाबत काही कल्पना मांडल्या आहेत, ज्याबाबत या प्रकारच्या संभाषणात विचारविमर्श केला जाऊ शकतो.

अर्थातच, व्यक्तींना अर्थपूर्ण संभाषणे सुरू करण्यास आणि त्यांना अखंडपणे राखून ठेवण्यास समर्थ करणाऱ्या क्षमतांना बळकट करण्यासाठी, या घटकाने, व्यापक विषय आणि संबंधित सामग्री सुचवण्याच्या पलीकडे जाणे आवश्यक आहे. स्पष्टपणे कल्पना व्यक्त करण्याच्या क्षमतेव्यतिरिक्त, सहभागींनी आवश्यक वृत्ती आणि आध्यात्मिक गुण विकसित करणे आवश्यक आहे. घटकामध्ये उलगडणारे बरेचसे विवरण हे अधोरेखित करते, परंतु वरील क्षमतांसाठी त्यांचे महत्त्व विभाग ४ मध्ये स्पष्ट केले आहे, जेथे भेटीची तयारी करताना आपल्या अंत:करणात आणि मनात कोणत्या प्रकारच्या भावना आणि विचार भरले पाहिजेत याबद्दल सहभागी विचार करतात आणि विभाग ५ मध्ये, जेथे ते नम्रतेच्या गुणवत्तेवर लक्ष प्रतिबिंबित करतात. या विभागांना सहभागींकडून पुरेसे लक्ष मिळावे याची सहशिक्षकाने खात्री करून घ्यायची आहे, कारण, जरी आपण कितीही ज्ञान प्राप्त केले, आणि आपण कल्पना कितीही चांगल्या प्रकारे सदर करू शकलो तरीही, आपल्या संभाषणाची परिणामकारकता आपण प्रतिबिंबित केलेल्या गुणांवर आणि वृत्तींवर अवलंबून असते.

याची नोंद घ्यावी की या पुस्तकांच्या मालिकेत वर्णन केलेल्या सेवेची कृती, जरी समाजाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी केंद्रस्थानी असली, तरी शेवटी अभ्यास आणि कृतीद्वारे वैयक्तिक क्षमता वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रक्रियेचे ती एक घटक आहे. प्रत्येक सहशिक्षकाने हे लक्षात घेतले पाहिजे की या कृती एकमेकांवर आधारित आहेत, पुस्तकामागून पुस्तकात गुंतागुंतीच्या दृष्टीने त्यांचे स्वरूप वाढत आहे. सेवेची प्रत्येक कृती प्रभावीपणे पार पाडण्यास शिकणे हे पुढील कार्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतेसाठी महत्त्वपूर्ण सिद्ध होते. या पुस्तकात प्रस्तावित केल्याप्रमाणे, पुस्तक १ मध्ये प्रोत्साहित केलेल्या क्रियाकलापांपेक्षा, जसे की एक नियमित भक्ती मेळावा आयोजित करणे, मग ते स्वत:हून किंवा सहकार्याने असो, आणि काही इतर क्रियाकलापांपेक्षा, घरांना अनेक भेटी दरम्यान सतत संभाषण चालू ठेवणे स्पष्टपणे अधिक मागणी करणारे आहे. आणि हे पाहणे कठीण नाही की, पुढे सेवेच्या अधिक जटिल कृती कशा करायच्या ते शिकण्यासाठी, सहभागींनी येथे संबोधित केलेल्या क्षमतांमध्ये प्रगती करणे अत्यंत आवश्यक आहे.

पुस्तक १ मधील प्रास्ताविकात नमूद केल्याप्रमाणे, रुही संस्था अभ्यासक्रमातील जगभरातील सहभागी विविध पार्श्वभूमीतून येतात आणि सुरुवातीला, वेगवेगळ्या प्रमाणात बहाई शिकवणींशी परिचित असतात. ज्यावेळेस ते हे

दुसरे पुस्तक सुरू करतील, त्यावेळेस, ते सर्व अभ्यासक्रमांद्वारे उघडलेल्या सेवेच्या मार्गावर गेले असतील. परंतु काही फरक राहतात. तरुणांच्या बाबतीत, उदाहरणार्थ, जर त्यांनी लहान मुलांसाठी आणि युवाकिशोरांसाठी शैक्षणिक कार्यक्रम पूर्ण केलेले नसतील, तर या पुस्तकात मांडलेली अनेक विधाने आणि विषय त्यांच्यासाठी नवीन असतील आणि त्याचा अभ्यास त्यांच्यासाठी एक साधन म्हणून काम करेल आणि धर्मश्रध्देबद्दलचे त्यांचे स्वत:चे ज्ञान वाढवेल. या संदर्भात, सहभागींना अर्थपूर्ण आणि उत्थानकारक संभाषणात सहभागी होण्यास सक्षम करणे हा अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश साध्य झाला आहे याची खात्री करत असताना, गटातील प्रत्येक सदस्यामध्ये समज वाढविण्यासाठी आवश्यक लवचिकता आणि सृजनशीलता प्रदर्शित करण्यासाठी सहशिक्षकाने तयार असले पाहिजे. इतकेच काय, हजारो परिसरात जिथे हे पुस्तक कार्यरत आहे, तिथे पुस्तकातील तीनही घटक ज्या समुदाय—निर्माण प्रक्रियेत योगदान देऊ इच्छितात, ती प्रक्रिया विकासाच्या एकाच टप्प्यावर असू शकेल असे नाही. त्यामुळे जे शिकले जात आहे ते कृतीत आणणे हे, एका ठिकाणाहून दुसऱ्या भागात काहीसे वेगळे आकार धारण करू शकते आणि सहशिक्षकाने या पुस्तकाचा अभ्यास करतांना गटातील प्रत्येक सदस्याच्या गरजांना ज्याप्रकारे प्रतिसाद दिला पाहिजे, त्या काळजी आणि परिपूर्णतेकडे हे संकेत करते.



# धर्म प्रचार—प्रसार सेवेचा आनंद

## हेतू

धर्म प्रचार—प्रसार सेवेचा आनंद, परमेश्वराचे पवित्र वचन इतरांसोबत सामायिक करण्याच्या कृतीमध्ये अंतर्भूत आहे, हे रसग्रहण करणे

## विभाग १

रुही संस्थेने सादर केलेल्या अभ्यासक्रमांच्या श्रृंखलेतील *सेवा संकल्प* हा दुसरा अभ्यासक्रम आहे जो अध्ययन आणि कृती यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करतो. त्याचा उद्देश, आपण दुहेरी उद्देश पूर्ण करण्याचा प्रयत्नांची पराकाष्ठा करत असताना, आपण प्रविष्ट केलेल्या सेवेच्या मार्गावर आपणास पुढे जाण्यात सहाय्य करणे आहे: आपल्या स्वत:च्या आध्यात्मिक आणि बौद्धिक शक्तिंना सुसज्ज करणे आणि सोबतच समाजाच्या परिवर्तनात योगदान देणे. आपल्या पहिल्या अभ्यासक्रमामधील सहभागापासून, आपल्या लक्षात हे आधीच आले असेल की आम्ही जो मार्ग संदर्भित करत आहोत तो सेवा कृतींच्या मालिकांद्वारे परिभाषित केला जातो, अशा कृती ज्या बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखणीत कल्पिल्याप्रमाणे, नवीन जागतिक कार्यव्यवस्थेच्या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित आहेत. अशाप्रकारे, आपण ज्याला "सेवेच्या मार्गावर चालणे" म्हणतो त्यामध्ये बहाउल्लाहांच्या शिकवणुकीनुसार, आपल्या स्वत:च्या जीवनासाठी आणि मानवतेच्या जीवनासाठी प्रयत्न केलेल्या कार्यांचा समावेश असतो. बहाउल्लाह स्वत: त्यांच्या प्रकटीकरणाबद्दल खालीलप्रमाणे बोलतात:

> **"हे माझ्या सेवकांनो! माझ्या परमपावन, माझ्या दिव्य संकल्पित धर्मसाक्षात्कारास अशा महासागराची उपमा देता येईल, ज्याच्या उदरी अति मौल्यवान किंमतीची आणि अनुपम कांतीची मौक्तिके दडलेली आहेत. प्रत्येक साधकाचे कर्तव्य आहे की त्याने स्वत:स दक्ष करावे आणि ह्या महासागराच्या काठापर्यंत पोहचण्याचा प्रयास करावा, ज्यायोगे तो आपल्या साधनेच्या जिज्ञासेनुसार आणि आपल्या प्रयत्नांच्या प्रमाणानुसार त्या लाभप्रद गोष्टीत सहभागी होईल, ज्या गोष्टी परमेश्वराने आपल्या अपरिवर्तनीय आणि रहस्यमय पत्रिकेत पूर्वनियोजित केल्या आहेत."**[१]

या पहिल्या घटकामध्ये, आपले विचार त्या हर्षोल्हासाप्रत वळतात जे आपल्या चैतन्यास भरून देतात, कारण आम्हास बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाच्या महासागरात असलेले सुज्ञपणाचे मोती प्रकट होऊन ते इतरांसोबत सामायिक करण्याचे भाग्य प्राप्त होते. आपल्या पुस्तक १ च्या अध्ययनातून आपणास जाणीव झाली असेल की बहाउल्लाह ह्यांच्या पावन लेखनात दैवी मार्गदर्शनाचे किती सुंदर मोती आहेत. आता आपण आणखी काही उद्धरणांवर चिंतन करूया:

> **"परमेश्वराची वचने एक दीप आहेत, ज्याचा प्रकाश हे शब्द आहेत: तुम्ही एकाच वृक्षाची फळे आणि एकाच शाखेची पाने आहात."**[२]

> **"न्याय माझ्या दृष्टीमध्ये सर्व गोष्टींपेक्षा अतिप्रिय आहे. तू मला इच्छितोस तर त्यापासून दुरावू नकोस, त्याकडे दुर्लक्ष करू नकोस म्हणजे मी तुझ्यावर विश्वास ठेवीन."**[३]

> **"तुम्ही ज्या युगात जगत आहात त्या युगाच्या आवश्यकतांसंबंधी उत्सुकतेने निगडित रहा आणि त्याच्या अपेक्षा व गरजांवर आपले विचार केंद्रित करा."**[४]

> **"चिरस्थायी संस्कृतीला पुढे नेण्यासाठी मानवाची निर्मिती केली गेली आहे."**[५]

**“जग सरत जाते आणि ते जे चिरंतन आहे ते आहे ईश्वराचे प्रेम.”[६]**

**“तू माझा दीपक आहेस, आणि माझा दिव्य प्रकाश तुझ्याठायी आहे. माझ्या दिव्य प्रकाशाने तू प्रकाशित हो आणि माझ्याशिवाय अन्य कोणासही शोधू नकोस. कारण मी तुला संपन्न निर्माण केले आहे आणि माझ्या सर्व कृपा तुला औदार्याने प्रदान केल्या आहेत.”[७]**

आपणास कालांतराने वरील छोटी उद्धरणे कंठस्थ करावेसे वाटेल.

## विभाग २

या घटकाच्या मुख्य संकल्पनेवर आपली चर्चा प्रारंभ करण्यासाठी, मागील विभागात उद्धृत केलेल्या पहिल्या उद्धरणाचे पुन्हा वाचन करा आणि खालील सराव पूर्ण करा:

१. खालील वाक्ये पूर्ण करा:

क. हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे की, आपण स्वत:स —————— ——————— आणि बहाउल्लाह ह्यांच्या महासागराच्या ———————————— ———————————— ——————————— करावा.

ख. आपण बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाच्या महासागराच्या काठापर्यंत पोहचण्याचा प्रयास केला पाहिजे, ज्यायोगे परमेश्वराने आपल्या ——————————— आणि ———————————— पत्रिकेत ——————————————— केलेल्या लाभप्रद गोष्टीत आपण सहभागी व्हावे.

ग. बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाच्या महासागराचे आपण जे फायदे प्राप्त करू, ते आपल्या ——————————— ——————————— आणि आपल्या ————————— प्रमाणानुसार असतील.

२. स्वत:स “दक्ष करणे” याचा अर्थ काय आहे? ————————————————————————————————

३. काही तरी “साध्य करण्याचा प्रयास करणे” याचा अर्थ काय आहे? —————————————————————

————————————————————————————————————————————————————————————

४. प्रत्येक साधकाने काय साध्य करण्याचा प्रयास केला पाहिजे? ————————————————————————

————————————————————————————————————————————————————————————

५. एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीच्या “प्रमाणात” असणे याचा अर्थ काय आहे? —————————————————

————————————————————————————————————————————————————————————

६. आम्हास बहाउल्लाह सांगतात, आपल्या प्रयत्नांच्या प्रमाणानुसार त्यांच्या प्रकटीकरणाच्या महासागरापासूनचे लाभ आपणास मिळतात.

क. असे लाभ मिळविण्यासाठी आपण जे प्रयत्न करतो, त्यांची काही उदाहरणे द्या: ——————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

ख. आपण जे लाभ साध्य करतो त्यांची काही उदाहरणे द्या: ————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

## विभाग ३

बहाउल्लाह यांचे दैवी प्रकटीकरण अशा एका महासागराप्रमाणे आहे ज्यांच्या खोलीत अनमोल मौक्तिके दडलेली आहेत, हे जाणून आपण प्रत्येक जण त्याच्या लाभांचे सहभागी होण्याचा आणि त्याच्या काठावर इतरांनी पोहचावे म्हणून सहाय्य करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. तथापि, आपण स्वत:ला विचारू शकतो की, ह्या महासागराच्या काठांवर जाण्याचा प्रवास किती दूर आहे? बहाउल्लाह घोषित करतात:

> **“हे माझ्या सेवकांनो! तो एकमेव सत्य परमेश्वर माझा साक्षी होय! हा अतिमहान, अगाध आणि उफाळणारा महासागर तुमच्यासाठी निकटच आहे, अत्यंत आश्चर्यकारकपणे निकट आहे. पहा, तो तुमच्या जीवनदायी रक्तवाहिनीपेक्षा निकटतम आहे! तुम्ही केवळ इच्छिले तर एका निमिषार्धात तुम्ही त्याच्यापर्यंत पोहचू शकता आणि हे अविनाशी औदार्य, ही परमेश्वरी दैवी कृपा, हे पवित्र वरदान, हा अत्यंत शक्तिशाली आणि अनिर्वचनीय भव्य अनुग्रह, यामधुन आपला वाटा साध्य करू शकता.”**[८]

१. “हा अतिमहान, अगाध आणि उफाळणारा महासागर” या वाक्यांशाचा संदर्भ काय आहे? ——————

————————————————————————————————————————

२. हा महासागर आपल्यासाठी किती निकटवर्ती आहे? ——————————————————————————

————————————————————————————————————————

३. ह्या महासागराला आपण किती लवकर पोहचू शकू? ——————————————————————————

————————————————————————————————————————

४.	खालील वाक्ये पूर्ण करा:

क. बहाउल्लाह ह्यांच्या दैवी प्रकटीकरणाचा अतिमहान, अगाध आणि उफाळणारा महासागर तुमच्यासाठी निकटच आहे, ———————— ——————————— —————— आहे.

ख. बहाउल्लाह यांच्या दैवी प्रकटीकरणाचा महासागर आपल्या रक्तवाहिनी पेक्षाही आपल्यासाठी —————— आहे.

ग. आपण केवळ इच्छिले तर, एका ————————— आपण —————————— पोहचू शकाल आणि त्याच्या प्रकटीकरणाच्या महासागरातून आपला —————— ————————— करू शकाल.

घ. एका निमिषार्धात ———— त्याच्यापर्यंत ————————— शकाल आणि त्याच्या प्रकटीकरणाच्या महासागरातून आपला वाटा साध्य करू शकाल.

## विभाग ४

बहाउल्लाह ह्यांच्या दैवी प्रकटीकरणाच्या महासागराच्या किनाऱ्यावर पोहोचल्यावर, आम्ही त्यांच्या धनसंग्रहातून दैवी मार्गदर्शनाचे मौक्तिक प्राप्त करतो, जे आपण उदारपणे आणि विना अट इतरांसोबत सामायिक करतो; अशी मौक्तिके ज्यांचा आपण स्वत:चे अध्ययन, प्रार्थना व ध्यान यामध्ये अविरतपणे शोध घेतो आणि त्यांचा परमेश्वराच्या धर्मश्रद्धेची आणि मानवतेची सेवा करण्याच्या आमच्या प्रयत्नांमध्ये उपयोग करतो. या कर्तव्याच्या पवित्रतेची सतत आठवण करून देणारे खालील उद्धरण कंठस्थ करण्यासाठी आपणास थोडा वेळ द्यावासा वाटेल:

**“हे परमेश्वराच्या मार्गावरील पथिका! त्याच्या कृपासागरातून आपला वाटा प्राप्त कर आणि त्याच्या तळात दडलेल्या गोष्टीपासून स्वत:स वंचित ठेवू नकोस. त्याच्या कोषागारातून ज्यांनी आपला अंश प्राप्त केला आहे त्यांच्यापैकी हो. ह्या सागरातील केवळ एक दवबिंदु स्वर्गात आणि पृथ्वीवर असलेल्या सर्वांवर शिंपडण्यात येईल तर तो त्या सर्वांना सर्व शक्तिमान, सर्वज्ञ, सर्वबुद्धिमान परमेश्वराच्या औदार्याने संपन्न करण्यास पुरेसा होईल. त्यागाच्या हस्तांनी त्यातील जीवनदायी जल घे आणि सर्व निर्मित वस्तूंवर त्याचा शिडकाव कर ज्यायोगे ते मानव निर्मित सर्व उणीवांपासून मुक्त व्हावेत आणि परमेश्वराच्या समर्थ अधिष्ठानास अशा या पावन दैदिप्यमान स्थानाप्रत त्यांनी पोहचावे.”**[९]

## विभाग ५

जसजसे आपण संस्थागत प्रक्रियेच्या अभ्यासक्रमांमध्ये भाग घेत प्रगती कराल, त्यामध्ये आवश्यक असलेल्या अध्ययन आणि कृतीमध्ये भाग घ्याल, तसतसे आपल्या सेवा करण्याच्या क्षमतेत वृद्धी होईल, आणि आपण अशा सेवा—कृती करू शकू ज्यामुळे आपल्या अंत:करणाला प्रचंड आनंद मिळेल आणि आपले दुहेरी उद्देश पूर्ण करण्यात मदत होईल —लहान मुलांच्या आध्यात्मिक शिक्षणासाठी बाल वर्गात शिकवणे,

युवाकिशोरांसाठी आयोजित आध्यात्मिक सशक्तिकरण कार्यक्रमात सहभागी होणे आणि मित्रांच्या गटाला संस्थागत पुस्तकांचे अध्ययन करण्यास मदत करणे यासारख्या कृती. या सर्व सेवेच्या प्रयासात, परमेश्वराचे वचन, जे आपण इतरांसोबत, तरुण असो वा वृद्ध, सामायिक करणार आहोत, तेच आपले सतत प्रेरणास्रोत असेल:

> **"परमेश्वरी वचनाला एखाद्या रोपट्याची उपमा देता येते, ज्याची मुळे मानवी अंत:करणात रूजविण्यात आली आहेत. तुम्ही त्याच्या वृद्धीची जोपासना ज्ञानाच्या जीवनदायी जलाने, पवित्र व सात्विक वचनांनी करणे अनिवार्य आहे, ज्यायोगे त्याचे मूळ दृढ व्हावे आणि त्याच्या फांद्या स्वर्गापर्यंत आणि त्याच्याही पुढे पसराव्यात."**[१०]

१. परमेश्वराच्या वचनास कशाची उपमा देता येऊ शकते? ——————————————————————

————————————————————————————————————————————

२. परमेश्वराच्या वचनाच्या वृक्षाची मुळे कोठे रुजवण्यात आली आहेत? ——————————————

————————————————————————————————————————————

३. ह्या वृक्षाच्या वाढीची जोपासना आपण कशी केली पाहिजे? ———————————————————

————————————————————————————————————————————

४. ह्या वृक्षाची उंची कितपत वृद्धिंगत होऊ शकते? —————————————————————

————————————————————————————————————————————

५. परमेश्वराच्या वचनात सहभागी करणे का अत्यंत महत्वाचे आहे, हे काही वाक्यात स्पष्ट करा. ————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

## विभाग ६

विविध कार्यांचा विचार करा जी आपल्या दैनिक जीवनात व्यापून राहतात. आपण आपले शरीर जोपासतो. आपण नवीन ज्ञान संपादन करण्यास व आपल्या मानसिक पात्रता विकसित करण्यासाठी अभ्यास करतो. आम्ही उपजीविकेसाठी काम करतो आणि अशी कौशल्ये विकसित करतो ज्यामुळे आम्हाला समाजाचे उत्पादक सदस्य म्हणून जगता येईल. आपण खेळात व इतर करमणुकीत सहभागी होतो. ह्या सारखी बहुसंख्य कार्ये जी आपली बौद्धिक प्रगती व भौतिक समृद्धी या सर्वांसाठी महत्त्वाची असून आपल्या वेळेचा बराचसा भाग व्यापून टाकतात. तथापि, प्रत्येक दिवसात असे काही आध्यात्मिकतेने भारावलेले विशेष क्षण असतात, जेव्हा आपण प्रार्थना करतो; जेव्हा आपण एकटे किंवा मित्रांसह, दैवी शिकवणींच्या ज्ञानाविषयी दृढीकरण

करतो; किंवा जेव्हा, उपलब्ध असलेल्या असंख्य मार्गांद्वारे, बहाउल्लाह ह्यांच्या प्रकटीकरणाच्या महासागरात जी मौक्तिकें दडलेली आहेत ती शोधून काढण्यास, आम्ही आमच्या सभोवतालच्या लोकांना सहाय्य करतो. तर हे क्षण मोजमापणापेक्षा मौल्यवान नाहीत का? ह्या स्वर्गीय वरदानांमध्ये वाटा उचलण्यास योग्य होण्यापेक्षा आणखी काही अधिक महान आनंद आहे का?

आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की अब्दुल–बहांनी कशाप्रकारे मानवतेच्या उन्नतीसाठी स्वत:ला समर्पित करण्यास आम्हाला प्रोत्साहित केले आहे:

**“आपण सर्व एका दैवी उद्देशाने एकत्र जमलो आहोत, येथे आपला कोणताही ऐहिक हेतू नाही, आणि आपल्या सर्वांची ही प्राणप्रिय इच्छा आहे, की परमेश्वराच्या प्रेमास आपण जगभर प्रस्तृत करावे!”**[११]

समजा आपणास आपल्या एका मित्रासोबत विभाग १ मधील आपण कंठस्थ केलेल्या उद्धरणांपैकी एक उद्धरण सामायिक करण्याची संधी उद्‌भवते. आपल्या अंत:करणात जो आनंद उत्पन्न होतो तो कोठून प्राप्त होतो? साहजिकच, आपणास अपेक्षा असेल की बहाउल्लाह ह्यांच्या पावन वचनांनी आपला मित्र उन्नत होईल. तथापि, त्याने किंवा तिने आपणास अपेक्षित असलेला उत्साह दर्शविला नाही तर? यामुळे आपल्या अंत:करणातील आनंद संपूर्णपणे नाहीसा होतो का? असे का नाही? ————————————————————————
——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

—————————————————————————————————

## विभाग ७

ज्यावेळी आपल्या लक्षात येते की, आपल्या जीवनात ज्या सर्व गोष्टी आपण करतो त्या सर्वांपैकी असे क्षण जे आपण परमेश्वराच्या शब्दांत इतरांना सहभागी करून घेण्याच्या कामी आणतो ते विशेष अनुग्रहांनी संपन्न असतात, त्यावेळी आम्ही सर्वात महत्त्वपूर्ण निष्कर्षावर पोहोचतो: कार्यसेवेतून मिळणारा आनंद हा कृतीतच असतो. अर्थातच, आम्हाला आशा असते की, आम्ही करत असलेल्या कार्यसेवेच्या कृत्यांचे योग्य परिणाम होतील, परंतु जर आम्ही परिणामांशी अतिशय संलग्न झालो तर, किंवा जर आपल्यावर प्रशंसा व टीकेचा परिणाम होत असेल, तर आपण प्रचार–प्रसार सेवेचा आनंद घालवून देऊ. ज्याने आपल्याला सेवेसाठी प्रेरित केले पाहिजे ते आहे परमेश्वराप्रती आपले प्रेम –यश मिळविण्याची, लाभ मिळविण्याची किंवा प्रशंसा प्राप्त करण्याची इच्छा नव्हे. या सर्वांपासून अलिप्त राहणे ही आनंददायी सेवेची आवश्यकता आहे. खालील उद्धरणांच्या अध्ययनाने आपणास या विषयावर विचार करण्यास मदत होईल:

**“हे द्वैत दृष्टीच्या मनुष्या! बाह्यदृष्टी बंद करून अंतर्दृष्टी उघड. विश्वासाठी आणि त्यातील सर्वांसाठी बाह्यदृष्टी बंद कर आणि अंतर्दृष्टीने प्राणेश्वराच्या पवित्र सौंदर्याचे दर्शन कर.”**[१२]

**"हे मित्रांनो! जे सौंदर्य मर्त्य आहे त्यासाठी चिरंतन सौंदर्याचा त्याग करू नका आणि धुळीच्या नश्वर जगावर आपली आसक्ती जडू देवू नका."[१३]**

**"हे उद्‌घोषाच्या पुत्रा! माझ्याकडे तुझे मुख वळव आणि माझ्या व्यतिरिक्त सर्वांचा परित्याग कर, कारण माझे सार्वभौमत्व अविनाशी आहे व माझे अधिपत्य नाश पावत नाही. माझ्याशिवाय दुसऱ्याची अभिलाषा ठेवून तू साऱ्या विश्वाच्या शोधात कल्पान्त भटकलास तरी तुझा शोध व्यर्थ होईल."[१४]**

**"हे मित्र बनलेल्या अपरिचिता! तुझ्या अंतःकरणातील दीपज्योती माझ्या सामर्थ्याच्या हस्ते प्रज्ज्वलित करण्यात आली, स्वार्थ आणि वासना यांच्या विरोधी वाऱ्यांनी तिला विझवू नकोस. तुझ्या सर्व रोगांचा उपचार म्हणजेच माझे स्मरण होय, हे विसरू नकोस. माझे प्रेम तुझा ठेवा बनव आणि प्रत्यक्ष तुझी मनोमनी दृष्टि आणि जीवन याप्रमाणे त्यास जपून ठेव."[१५]**

**"अनासक्ति सूर्याप्रमाणे आहे, ज्या कोणत्या अंतःकरणात ती प्रकाशते, लोभीपणा व स्वार्थीपणाचा अग्नि ती शमविते. ज्याची दृष्टि प्रज्ञेच्या प्रकाशाने उज्ज्वल झाली आहे, तो खात्रीने जगापासून व त्याच्या डामडौलापासून स्वतःला अनासक्त करील. जग आणि त्यातील निष्कृष्टता यांनी तुम्ही दुःखी होऊ नका. केवळ तोच आनंदी आहे जो धनसंपत्तीच्या दिखावू वैभवाने किंवा दारिद्र्याच्या दुःखाने भारावून जात नाही."[१६]**

१. काय ह्या जगापासून विरक्त असणे म्हणजे बैराग्याप्रमाणे जगणे होय? ————————————————

२. ह्या जगापासून विरक्त असणे आणि त्याचवेळी वस्तूची लालसा बाळगणे शक्य आहे काय? —————

————————————————————————————————————————————————————

३. जी व्यक्ति आपल्या जीवनाच्या प्रत्येक घटकेत प्रत्यक्षपणे त्याच्या कार्यास वाहून घेते, काय ती जगाच्या गोष्टींपासून विरक्त असते? ——————————————————————————————————————

४. एखादी व्यक्ति आपल्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी केवळ पर्याप्त काम करते आणि आपला बाकीचा वेळ काही न करता घालविते ती ह्या जगापासून विरक्त आहे का? ———————————————

————————————————————————————————————————————————————

५. जगापासून अलिप्त असलेल्या सेवेच्या क्षेत्रात, एखादी व्यक्ती भौतिक गैरसोय सहन करू शकते का?

————————————————————————————————————————————————————

६. भौतिक संपत्तीशिवाय आपण आसक्त राहू शकू अशा अनेक गोष्टी आहेत. आपण कशासोबत आसक्त असाल जर आपण एखादी अशी व्यक्ति असाल तर

— जेव्हा तो किंवा ती धर्मश्रद्धेची सेवा करतो/करते आणि कोणीही मान्य करीत नाही, तेव्हा

त्याला/तिला ते सेवाकार्य सोडावेसे वाटेल? ——————————————————————————————

— मनोधैर्य खचते, जेव्हा तो/ती सामायिक करत असणारे विचार एखादी व्यक्ति स्वीकारीत नाही?———

————————————————————————————————————————————————

— इतरांच्या नकाराच्या भीतीने स्वत:च्या धर्मश्रद्धेबाबत माहिती लपवतात? ——————————————

७. अनासक्त असणे याचा अर्थ अलिप्तपणा किंवा काळजीचा अभाव असा होत नाही. खालीलपैकी कोणते लक्षण अनासक्त नसल्याचे लक्षण असू शकते?

— इतरांची प्रगती बघून आनंदित होणे

— वर्गात काही मुले गैरवर्तन करतात तेव्हा शिकवणे बंद करणे

— स्वत:च्या यशाबाबत बढाई मारणे

— अभ्यासासाठी कठीण परिश्रम करणे आणि झालेल्या प्रगतीमध्ये समाधानी असणे

— सर्वसामान्य हिताची सेवा करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी कठोर परिश्रम करणे

— स्वत:च्या कामधंद्यात उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे

— स्वच्छतेचे पालन करणे आणि घर निर्मळ व नीटनेटके ठेवणे

— स्वत:च्या सामानाची काळजी घेणे

— इतरांच्या हिताची काळजी घेणे

— आपल्या प्रयत्नांची प्रशंसा कोणीही न केल्यावर निराश होणे

८. आपल्यापैकी प्रत्येकासाठी अनासक्ती अत्यंत महत्त्वाची आहे ज्यामुळे आपणास सुचविण्यात येते की आपण ह्या विभागातील सर्व उद्धरणे कंठस्थ करावी.

## विभाग ८

मानवतेच्या सेवेच्या आनंदमय जीवनाचे वरदान प्राप्त करण्यासाठी, आपण प्रयत्न करण्यास तत्पर असले पाहिजे आणि आपल्या प्रयत्नांना काही प्रमाणात त्यागाच्या भावनेची आवश्यकता असू शकते. आपल्या दैनंदिन जीवनात आपण कित्येकदा "त्याग" हा शब्द उपयोगात आणतो. भल्या पहाटे जर जिवलग मित्र प्रवासानंतर परत येत असेल, तर त्यास आणण्यासाठी आपण पहाटे फार लवकर उठतो. आपण म्हणू शकतो की आपण झोपेच्या काही तासांचा त्याग केला आहे. जेव्हा आपल्यासाठी प्रिय असणारा कोणी आजारी असेल; तर त्याची देखभाल करण्यासाठी आपण आपल्या आवडत्या करमणुकीच्या काही तासांचा त्याग करतो. जीवनात असे प्रसंग येतात जेव्हा आपण अत्यंत कठोर परिश्रम केले पाहिजेत आणि आपल्याला असे वाटू शकते की आपण एक ध्येय गाठण्यासाठी आरामाचा त्याग करत आहोत.

आपल्या सर्वांची उदारतेने आपला वेळ आणि चैतन्य आणि शक्य तितक्या प्रमाणात, आपल्या भौतिक संसाधनांचा काही भाग उदारपणे देऊन, धर्मश्रद्धेच्या कार्याची सेवा करण्याची अत्यंत इच्छा असते. जेव्हा आपण असे करतो, तेव्हा आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, सेवेच्या मार्गावर, आपण या जगाच्या काही गोष्टींचा त्याग करू इच्छितो, ज्यामुळे आपल्या जीवनात आध्यात्मिकरित्या वाढ होते, आणि त्यावेळी जे आपल्याला

प्राप्त होते तोच खरा आनंद होय. आम्हास भविष्यातील अभ्यासक्रमांमध्ये त्यागाचे स्वरूप अधिक प्रतिबिंबित करण्याची संधी मिळेल. अगदी सुरुवातीपासूनच जे ओळखणे महत्त्वाचे आहे, ते म्हणजे उच्चतम स्थान प्राप्त करण्यासाठी निम्नतम गोष्टींचा त्याग करणे आवश्यक आहे, जसे की एक बीज स्वत:चा त्याग करते जेणेकरून एका मोठ्या झाडाचा जन्म होऊ शकेल. त्याग हे हर्षोल्हासाचे प्रतिक आहे आणि जोपर्यंत आपण सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यास तत्पर नसतो तोपर्यंत हा हर्षोल्हास आपणास प्राप्त होणार नाही.

बहाउल्लाह म्हणतात:

**“आपणास जर त्याला शोधायचे असेल तर परिश्रमाची गरज आहे, आपणास त्याच्याशी पुनर्मिलनाचे मधुरस पान करायचे तर उत्कट इच्छेची गरज आहे आणि जर आपण ह्या कपाचा आस्वाद घेतला तर आपण हे जग झुगारून देऊ.”**[१७]

आणि अब्दुल—बहा आम्हास सल्ला देतात:

**“...तुम्ही विसावा घेऊ नका, तुम्ही आराम करू नका, ह्या क्षणभंगुर जगाच्या विलासांशी तुम्ही स्वत:ला चिकटवून घेऊ नका, सर्व आकर्षणापासून तुम्ही स्वत:ला मुक्त करा आणि ह्रदयाने व आत्म्याने परमेश्वराच्या अधिराज्यात पूर्णपणे प्रस्थापित होण्यासाठी प्रयत्न करा. तुम्ही स्वर्गीय द्रव्यभंडारे साध्य करा. दिवसेंदिवस तुम्ही अधिक प्रकाशित व्हा आणि एकत्वाच्या उंबरठ्याकडे अधिकाधिक जवळ येत रहा.”**[१८]

सातत्य आणि चिकाटीची देखील आवश्यकता असते. लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. कार्ये संपूर्ण साध्य करण्याची सवय, एखादे कार्य साध्य न करता दुसरे हाती घेणे आणि कार्य पूर्ववत न सोडणे अत्यावश्यक आहे. अर्धवट प्रयत्न फळ देत नाहीत. लहान मुलांच्या आध्यात्मिक शिक्षणासाठी साप्ताहिक वर्गाची कल्पना करा. प्रत्येक वर्गाची तयारी करण्यासाठी शिक्षकाने ठराविक तास दिले पाहिजेत, संपूर्ण कालावधीत विद्यार्थ्यांना पाठातील मजकूर समजण्यास मदत करण्यावर पूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे, मुलांच्या पालकांना नियमित भेटी दिल्या पाहिजेत आणि दर एक आठवड्यात, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीचे मूल्यमापन केले पाहिजे. ज्या वर्गाचे शिक्षक केवळ अधूनमधून तयारी करतात, थकवा आल्यामुळे सत्र लवकर व अचानक संपवतात आणि प्रत्येक मुलाचा विचार करण्यासाठी आणि त्याच्या प्रगतीबद्दल पालकांशी चर्चा करण्यासाठी आवश्यक वेळ घालवू शकत नाहीत अशा वर्गाची प्रगती कशी राहील? आणि जेव्हा जेव्हा शिक्षकांना इतर काही वैयक्तिक कामाकरिता जाण्याचे असेल, जसे की, शहराबाहेरून भेट देणाऱ्या मित्रासोबत वेळ घालवायचा असेल, तेव्हा वर्ग रद्द केला तर?

या काही टिप्पण्या आम्हास अशी समज देण्यासाठी आहेत की आम्हास आवश्यक असलेल्या प्रत्येक प्रयत्नांविषयी, त्याचे परिमाण आणि गुणवत्ता या दोन्हीकडे लक्ष दिले पाहिजे. हे केवळ, ज्या सेवेच्या कृतींमध्ये आपण गुंततो त्याबाबतच खरे नाही; तर ते आपल्या स्वत:च्या विकासातही त्याच प्रमाणात लागू होते. आपण या मालिकेच्या पहिल्या पुस्तकात ज्या आध्यात्मिक सवयींचा विचार केला आहे जसे की —नियमितपणे प्रार्थना

करणे, दररोज पवित्र लेखणाचे वाचन करणे, आपले जीवन धर्मश्रद्धेच्या तत्त्वांनुसार कशाप्रकारे जुळवून घेणे यावर विचार करणे, भक्तीपूर्व सभेत मन:पूर्वक सहभागी होणे— हे सर्व सतत परिश्रमावर अवलंबून असते. खाली अशा प्रयत्नांशी संबंधित अनेक विधाने आहेत. त्यापैकी कोणते खरे आहेत हे ठरवल्याने आपणास या विषयावर अधिक विचार करण्यात मदत होईल:

— जर आपण बुद्धिमान असाल, तर आपणास कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता नाही.
— कठीण मार्गे का जावे; नेहमी सोपा मार्ग शोधावा.
— कष्टाविना फळ नाही.
— मोठे स्वप्न बघा; आपल्या इच्छांची पूर्ती होईल.
— जेवढा मोठा पुरस्कार, तेवढीच मोठी पराकाष्ठा.
— जेवढे मोठे प्रयत्न, तितकेच मधुर प्रतिफळ.
— जरी सुरुवातीला आपण यशस्वी झाला नाहीत, तरी आपण सातत्याने प्रयत्नरत असावे.
— स्वत: कार्य का करावे बरे, जेव्हा आपण इतरांना आपल्यासाठी ते करायला लावू शकता?
— जर या कार्याप्रती विपुल मेहनत घ्यावयाची आवश्यकता असेल, तर ते संपन्न होणारेच नसेल.
— स्वल्प पावले —वारंवार आणि सातत्यपूर्ण— आपले लक्ष्य दीर्घकाळापर्यंत गाठू शकतात.
— कोणतीही मौल्यवान गोष्ट सहजपणे प्राप्त होत नाही.
— उत्कृष्टतेसाठी मन:पूर्वक समर्पित असणे आवश्यक आहे.
— हजार मैलांचा प्रवास एका पावलाने प्रारंभ होतो.
— केवळ 'चालत असेल' असा दृष्टीकोन पुरेसा नाही.
— घटना घडण्याची आपण वाट पाहू नये; आपण आपले उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवले पाहिजे.
— यशस्वी होणे हे नशिबावर अवलंबून आहे.
— आपला दुहेरी उद्देश आपणास जादूपूर्वक साध्य होणार नाही.
— आपण आपल्या कर्मांची तपासणी दररोज केलीच पाहिजे.

आम्ही सेवेच्या मार्गावर कार्यरत आहोत, आमची स्वत:ची आध्यात्मिक आणि बौद्धिक वाढ साधण्यासाठी आणि समाजाच्या परिवर्तनात योगदान देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. हे स्पष्ट आहे की या दुहेरी उद्देशाचा पाठपुरावा करण्यासाठी आम्हास मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे लागतील. बहाउल्लाह आम्हास सांगतात:

> **"त्या अतुलनीय निर्मात्याने सर्व मनुष्यमात्रांना एका समान घटकापासून निर्माण केले आहे आणि त्यांच्या सत्य स्थितीला त्याच्या इतर सर्व निमिर्तींहून उन्नत केले आहे. म्हणून यश किंवा अपयशप्राप्ती अथवा नुकसान सर्वथा मनुष्याच्या स्वत:च्या श्रमावर अवलंबून आहे. जर तो अधिक प्रयत्न करेल, तर त्याची प्रगती अधिक राहील."**[१९]

आपण वरील उद्धरण कंठस्थ करू शकता जर आपण आधीच केले नसेल तर.

## विभाग ९

सेवाकार्यामधून हर्षोल्हास प्राप्त करण्यासाठी, आपण स्वत:च्या अभिव्यक्तीमध्ये काही विशिष्ट वृत्ती जोपासल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, परमेश्वराने आपल्यास प्रदान केलेल्या कार्यसेवेच्या संधीबद्दल आपण आभारी असले पाहिजे; जेव्हा आपणास परमेश्वरी धर्मश्रद्धेच्या कार्याची सेवा करण्याची संधी मिळते तेव्हा आपण ईश्वरावर उपकार करत आहोत अशी कल्पना करणे अशक्य आहे. आपण निराशावाद टाळणे आणि जगाकडे आशावादी दृष्टिकोन ठेवून जीवनाकडे बघणे देखील शिकले पाहिजे. सेवाकार्याच्या मार्गात असलेले अडथळे, पुढे प्रगतीच्या पायऱ्यांमध्ये परिवर्तीत होऊ शकतात. अडचणींमध्येही आपण श्रद्धाभावाच्या नेत्रांनी भविष्याकडे बघतो. अब्दुल–बहांचे खालील शब्द अपेक्षा आणि आशावादाकडे निर्देश करतात, जे आपल्या प्रयत्नांचे वैशिष्ट्य असले पाहिजेत:

> **"सुरवातीला बीज केवढे लहान असते तथापि सरतेशेवटी ते एक भव्य वृक्ष असते. तुम्ही बीजाकडे पाहू नका, तुम्ही वृक्षाकडे आणि पुष्पसंभाराकडे आणि त्याच्या वर्णराजीकडे आणि त्याच्या फळांकडे पहा."**[२०]
>
> **"तेव्हा ह्या लहानशा बीजाची मार्मिक महत्ता जाण जे खऱ्या दैवी कृषकाने ईश्वराच्या मशागत केलेल्या भूमीमध्ये त्याच्या स्वत:च्या हातांनी पेरले आहे आणि प्रदान व अनुग्रहांच्या पावसाने सिंचित केले आणि आता सत्याच्या दिवानक्षत्राच्या उबेमध्ये व प्रकाशात संगोपित करीत आहे."**[२१]
>
> **"जेव्हा तुम्ही एखाद्या वृक्षाची वाढ होत असताना आणि ते विकसित होत असताना पाहता, तेव्हा त्याच्या परिणामाची आशा बाळगा. ते विकसित होईल आणि सरतेशेवटी फळ देईल. जर आपण कोरडे लाकूड किंवा जुनी वृक्षे बघाल तर त्यापासून फळ मिळण्याची आशा अजिबात असणार नाही."**[२२]
>
> **"म्हणून परमेश्वराच्या प्रियजनांनी, परिश्रमपूर्वक, त्यांच्या प्रयत्नांच्या जलाने, या आशेच्या वृक्षाची काळजी घेऊन आणि त्याचे पोषण करून संगोपन केले पाहिजे."**[२३]
>
> **"जर मन ईश्वराने प्रदान केलेल्या आशीर्वादांपासून पराङ्मुख होईल तर ते आनंदाची आशा कशी ठेवू शकेल? जर ते ईश्वराच्या कृपेवर आपली अपेक्षा आणि श्रद्धा ठेवत नसेल तर त्यास विश्रांती कोठे मिळेल?"**[२४]

वरील उद्धरणांवर चिंतन करण्यासाठी, खालील वाक्यांशे पूर्ण करा:

१. सुरवातीला बीज केवढे लहान असते तथापि सरतेशेवटी ते ————————————————————.

२. आपण लहान बीजाकडे पाहू नका, ———————————————————————————————
————————————————————————————————————————————————.

३. तेव्हा आपण ह्या लहानशा बीजाची मार्मिक महत्ता जाणली पाहिजे जे खऱ्या दैवी कृषकाने ईश्वराच्या ______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________.

४. जेव्हा तुम्ही एखाद्या वृक्षाची वाढ होत असताना आणि ते विकसित होत असताना पाहता, तेव्हा ________________________________________.

५. जेव्हा तुम्ही एखाद्या वृक्षाची वाढ होत असताना आणि ते विकसित होत असताना पाहता, तेव्हा त्याच्या परिणामाची आशा बाळगा की ते ________________________________________.

६. आपल्या प्रयत्नांच्या जलाने, या ________________________________________

______________________________________________________________.

७. जर मन ईश्वराने प्रदान केलेल्या आशीर्वादांपासून पराङ्मुख होईल ____________________

________________________?

८. जर ते ईश्वराच्या कृपेवर आपली अपेक्षा आणि श्रद्धा ठेवत नसेल ____________________

______________?

याक्षणी, थोडेफार चिंतन करा: नम्र कृतज्ञतेच्या मनोभूमिकेसह, आमचा आनंदी आणि आशावादी आत्मा, इतरांसाठी हर्षोल्हासाचा स्रोत आहे, हे आपणास मान्य आहे का? आणि, आपण नेहमी ध्यानात ठेवूया की, आपण धर्मश्रद्धेची सेवा करण्यासाठी उद्‌भवणार असताना, एका नूतन दिनाच्या म्हणजे मानवजात एकत्रित येण्याच्या दिनाची सुवार्ता देतो. बहाउल्लाह ह्यांचे खालील पावन वचन आपल्या हृदयात प्रतिध्वनीत होवो:

> **"आनंदित आहेत जे कृती करतात; आनंदित आहेत जे अध्याहत असतात; आनंदित आहे तो व्यक्ती ज्याने सत्यवादितेला अंतर्भूत केले आहे, स्वर्ग आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टींपासून अलिप्त आहे."**[२५]

## संदर्भ

१. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१५३
२. वरील प्रमाणे, क्र.१३२
३. रहस्यमय शब्द, (अरेबिक क्र. २)
४. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१०६
५. वरील प्रमाणे, क्र.१०९
६. बहाउल्लाह
७. रहस्यमय शब्द, (अरेबिक क्र. ११)
८. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१५३
९. वरील प्रमाणे, क्र.१२९
१०. वरील प्रमाणे, क्र.४३
११. अब्दुल—बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
१२. रहस्यमय शब्द, (पर्शियन क्र. १२)
१३. वरील प्रमाणे, (पर्शियन क्र. १४)
१४. वरील प्रमाणे, (अरेबिक क्र. १५)
१५. वरील प्रमाणे, (पर्शियन क्र. ३२)
१६. बहाउल्लाह
१७. दैवी प्रियतमाची हाक: बहाउल्लाह ह्यांची निवडक गूढ उद्धरणे
१८. दैवी योजनेच्या पत्रिका
१९. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. ३४
२०. अब्दुल—बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२१. वरील प्रमाणे
२२. जागतिक शांततेचा प्रसार
२३. अब्दुल—बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२४. अब्दुल—बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
२५. बहाउल्लाह, लांडगाच्या मुलाच्या नामे पत्रिका



# उत्थानकारक वार्तालाप

**हेतू**

संभाषणात आध्यात्मिक तत्वांचा परिचय करून देण्यास योग्यता संपादन करणे

## विभाग १

या पुस्तकाच्या पहिल्या घटकात, आम्ही परमेश्वराच्या दैवी वचनात इतरांना सहभागी करून आपण अपरिमित आनंद मिळवित असतो याबद्दल बोलले होतो. जेव्हा आपण धर्मकार्यासाठी सेवेच्या मार्गावरून जात असतो, तेव्हा आपल्या मित्रांशी आणि परिचितांशी, बहाउल्लाह ह्यांच्या दैवी प्रकटीकरणातून संपादन केलेल्या अंतर्दृष्टीविषयी संभाषण करण्याच्या अनेक संधी आमच्याकडे येतात. आपण सर्वांनी विकसित करणे आवश्यक असलेल्या सर्व क्षमतांपैकी त्या आहेत, ज्या आपल्याला अर्थपूर्ण आणि उन्नत संभाषणात योगदान देण्यास सक्षम करतात. या संदर्भात आपणास मदत करणे हा या आणि पुढील घटकाचा उद्देश आहे. येथे, जेव्हा प्रसंग आवश्यक असेल, तेव्हा आपणास आध्यात्मिक तत्त्वांचा संदर्भ देऊन संभाषणाची पातळी कशी उन्नत करावी याच्याशी संबंधित असेल. पुढील घटकामध्ये, पद्धतशीर प्रयत्नांचा एक भाग म्हणून, आपण आपल्या गावात किंवा प्रभागात एक प्रगतीशील समुदाय तयार करण्यासाठी, विशिष्ट विषयांवर संभाषणांची मालिका कशाप्रकारे सुरू करावी आणि हे संभाषण सातत्याने कसे टिकवून ठेवावे याबद्दल विचार कराल.

पुढील भागांमध्ये आपण जे करणार आहोत ते म्हणजे विविध विषयांवरील अनेक विधाने वाचणे, जी तंतोतंत उद्धरणे नसली तरी, ती सर्व अब्दुल–बहा ह्यांची व्यक्तव्ये आणि त्यांच्या लिखानांवर आधारित आहेत आणि अब्दुल–बहांची अनेक वाक्ये त्यात समाविष्ट आहेत. आपण प्रत्येक विधान अनेक वेळा वाचले पाहिजे, कल्पनांचा क्रम ओळखला पाहिजे आणि आपल्या गटातील इतर सदस्यांबरोबर आळीपाळीने ते मोठ्याने वाचावे जोपर्यंत आपण ते नैसर्गिकरित्या व्यक्त करू शकत नाही. विचारविमर्श पुढे नेण्यासाठी, जेव्हा आपणास धर्मश्रद्धेच्या शिकवणींवर लक्ष केंद्रित करणे योग्य वाटेल तेव्हा हा सराव आपणास सहजपणे या विषयावर बोलण्यास मदत करेल.

अर्थातच, या घटकामध्ये, आपण पवित्र लेखनातील उद्धरणे कंठस्थ करण्याची प्रक्रिया सुरू ठेवाल, कारण त्या उद्धरणांत मानवी हृदयात प्रविष्ट करणारी एक विशेष शक्ती आहे आणि जेव्हा त्या आपल्या संभाषणात विणल्या जातात तेव्हा श्रोत्यावर त्याचा खोल प्रभाव पडतो. तथापि, संभाषणात पवित्र लेखनातून उद्धृत करण्यासाठी सूज्ञपणाची आवश्यकता आहे. संयम, थेट पवित्र लेखनातून उद्धृत करणे आणि धर्मश्रद्धेच्या शिकवणी स्पष्ट करण्यासाठी स्वत:चे शब्द वापरणे यात संतुलन असणे आवश्यक आहे. हा समतोल साधण्यासाठी, आपणास पवित्र लेखनाच्या अभ्यासासाठी बराच वेळ आणि उर्जा द्यावी लागेल आणि त्यांना आपल्या विचारांना आणि भावनांना आकार देण्याची मुभा द्यावी लागेल.

## विभाग २

आपणास पहिला परिच्छेद ज्याचा अभ्यास करण्याचे सांगण्यात येत आहे, तो मानवतेसाठी दैवी शिक्षकाच्या आवश्यकतेविषयी आहे.

> जेव्हा आपण अस्तित्वाचा विचार करतो, तेव्हा आपण पाहतो की खनिजे, वनस्पती, प्राणी आणि मानवी साम्राज्य, या प्रत्येकाला शिक्षकाची आवश्यकता आहे. प्रत्येक बागेला एका माळीची

आवश्यकता असते. भरपूर पीक मिळविण्यासाठी जमिनीला एका शेतकऱ्याची गरज असते. मनुष्यास अरण्यात एकटे सोडून देण्यात येईल, तर तो प्राण्याचा मार्ग घेईल. जर त्यास शिकविण्यात येईल तर तो यशसिद्धीच्या सर्वश्रेष्ठ शिखरांवर पोहचू शकेल. जर शिक्षकवर्ग नसता तर सभ्यता अस्तित्वात आली नसती.

शिक्षण तीन प्रकारचे असते: भौतिक, मानवी आणि आध्यात्मिक. भौतिक शिक्षण हे शरीराच्या विकासाशी संबंधित आहे. मानवी शिक्षण हे सभ्यता व प्रगतीविषयी आहे. ते प्रशासन, सामाजिक व्यवस्था, मानवी कल्याण, वाणिज्य व उद्योग, कला विज्ञान, महत्त्वपूर्ण संशोधने, आणि महान उपक्रम यांचा विचार करते. आध्यात्मिक शिक्षणात दैवी पुर्णत्वे संपादन करण्याचा समावेश आहे. हे खरे शिक्षण आहे, कारण त्याच्या मदतीने मानवमात्राच्या आध्यात्मिक प्रकृतिच्या श्रेष्ठ स्वरूपाचा विकास करण्यात येतो.

प्रगती करण्यासाठी मानवजातीस प्रशिक्षकाची आवश्यकता असते, ज्याला भौतिक, मानवी व आध्यात्मिक शिक्षक म्हणून शिक्षण देण्याचा स्पष्ट अधिकार असतो. जर कोणी म्हणेल, “मी महान बुद्धिमत्तेने संपन्न आहे, आणि मला अशा शिक्षकाची गरज नाही, तर तो जे स्पष्ट आहे त्याला नाकारत असेल. तो एखाद्या असे म्हणनाऱ्या लहान मुलासारखा आहे, “मला शिक्षणाची आवश्यकता नाही, मी माझा अभिप्राय व बुद्धिचातुर्य यानुसार काम करीन आणि स्वत:हून उत्कृष्टता प्राप्त करेन.”

मानवजातीला सदैव अशा परिपूर्ण शिक्षकाची आवश्यकता राहिलेली आहे, जो पालनपोषण व शरीराचे आरोग्य यांच्याशी संबंधित गोष्टी सुसंगठित करण्यास मदत करू शकतो, ज्ञान, संशोधन व शोध यांमध्ये तिला प्रगतीसाठी प्रेरणा देऊ शकतो, आणि सर्वात महत्वपूर्ण म्हणजे, तिच्यामध्ये, वास्तविक जीवनाच्या चैतन्याचा प्राण फुंकू शकतो. कोणताही सामान्य मनुष्य ही बलवत्तर कार्ये साध्य करू शकत नाही. यांना साध्य करण्याचे सामर्थ्य केवळ परमेश्वराचे अवतारच बाळगतात. हे निवडक दैवी आत्मे आहेत, जे मानवजातीचे सार्वत्रिक शिक्षक असावेत म्हणून वेळोवेळी परमेश्वराकडून पाठविण्यात येतात.

१. वरील परिच्छेद आपल्या गटात अनेकदा वाचा आणि एकमेकांस त्यातील आशय उत्तम प्रकारे समजून घेण्यासाठी मदत करा. आपण मांडलेल्या कल्पनांशी संबंधित प्रश्न एकमेकांना विचारले पाहिजेत आणि त्या नैसर्गिकरित्या आणि सहजतेने व्यक्त करण्याविषयी सराव केला पाहिजे.

२. पुढे, आपल्या गटात चर्चा करा की आपण येथे मांडायला शिकलेल्या कल्पना संभाषणात कशाप्रकारे वाक्पटुतेणे सादर कराल. साहजिकच, शिक्षण हे तीन प्रकारचे असते हे आपण आपल्या मित्रांना अचानकपणे सांगणार नाही. तेव्हा, वरील कल्पना सुसंगत ठरतील अशा परस्परसंवादाच्या प्रकारांचा विचार करणे आपल्यासाठी फायदेशीर ठरेल. कदाचित, चर्चेत असलेला मुद्दा समाजाचे नैतिक पतन किंवा जगाच्या उन्नतीसाठी कसे कार्य करावे हा असू शकेल. आपण आपले मित्र, कुटुंबातील सदस्य आणि परिचित व्यक्तींसोबत ज्या वैविध्यपूर्ण संभाषणांमध्ये गुंतता त्यावर विचार करा. त्यांच्या मनाला व्यापून राहिलेल्या मुद्द्यांपैकी, या विधानातील कल्पनांबद्दल चर्चा करण्याविषयी अशा काही आहेत

का ज्या स्वत: हातभार लाऊ शकेल? ————————————————————————————————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

३. आपण नुकत्याच अध्ययन केलेल्या विषयावरील संभाषणात अनेकदा प्रश्न उद्भवतात. आपण काय उत्तर द्याल जर कोणी विचारले: "आपण ज्यांच्याविषयी बोलत आहात यापैकी काही दैवी शिक्षक कोण आहेत?" ————————————————————————————————

————————————————————————————————————————————

————————————————————————————————————————————

४. मानवजातीसाठी दैवी शिक्षकाच्या गरजेशी संबंधित बहाउल्लाह ह्यांच्या दिव्य लिखाणांतील काही उद्धरण खाली दिले आहेत. त्यांच्यावर मनन करा व त्यांपैकी किमान एक कंठस्थ करा. अशाप्रकारे, जेव्हा योग्य असेल तेव्हा आपण आपल्या संभाषणात दैवी लिखाणांतील उतारे गुंफण्यासाठी सक्षम असाल.

**"चिरस्थायी संस्कृतीला पुढे नेण्यासाठी मानवाची निर्मिती केली गेली आहे."**[१]

**"परमेश्वराच्या वैभवाचा गौरव असो, त्या एकमेव सत्य परमेश्वराचा मानवासमक्ष प्रगट होण्याचा पवित्र हेतु, ती अनमोल रत्ने उघड करणे होय, जी त्याच्या सत्य व अंतर्गहन स्वत्वाच्या खाणीत दडलेली आहेत."**[२]

**"आपल्या अवतारांना मानवासाठी पाठविण्यात परमेश्वराचा उद्देश दुहेरी आहे. पहिला उद्देश, मानवी वंशांना अंध:कारातून मुक्त करणे आणि त्यांना सत्य ज्ञानाच्या प्रकाशाकडे येण्यास मार्गदर्शन करणे हा होय. दुसरा हेतु मानवजातीमध्ये शांती व सौख्य स्थापित करणे, त्यांच्या स्थापनार्थ सर्व साधनांची सिद्धता करणे हा होय."**[३]

**"सर्व काळी आणि सर्व परिस्थितीमध्ये मनुष्यप्राण्यांना एका अशा विभुतीची आवश्यकता असते जी त्यांना प्रबोधित करू शकेल, मार्गदर्शन प्रदान करू शकेल आणि त्यांना शिकवण देऊ शकेल."**[४]

## विभाग ३

खालील परिच्छेद वर्णन करतात की —परमेश्वर केवळ त्याच्या अवतारांद्वारेच कसा ओळखला जाऊ शकतो आणि ते आपण जेव्हा मित्रांशी संभाषण करता त्यासाठी सहाय्यक राहील:

अमर्याद विश्वाचा विचार करा. काय हे शक्य आहे की निर्मात्याशिवाय ते निर्माण होऊ शकले? किंवा निर्मात्याची वास्तविकता त्याने निर्माण केलेली निर्मिती कधीही समजू शकते काय? आपण जर

संपूर्ण निर्मितीचे निरीक्षण करू तर हे बघू की जे काही कमी प्रतीचे आहे, ते अधिक श्रेष्ठ प्रतीचे असणाऱ्याचे सामर्थ्य समजून घेण्यास असमर्थ आहे. म्हणून दगड आणि वनस्पती, ते कितीही विकसित झाले तरी दृष्टी आणि श्रवणशक्तीची कल्पना करू शकत नाही. प्राणी कधीही मानवाची वास्तविकता समजू शकत नाही आणि मानवी चैतन्याच्या शक्तींबद्दल जागरूक होऊ शकत नाही. म्हणून आपण, निर्मिलेला मानव, आपल्या निर्मात्याची वास्तविकता कशी समजू शकतो?

जरी आपली समज परमेश्वरापर्यंत कधीच पोहचू शकत नाही, तरी आपण त्या परमेश्वरास जाणून घेण्यापासून वंचित नाही. वेळोवेळी पृथ्वीवर एक विशेष अस्तित्व प्रकट होते जे ईश्वराचे अवतार आहेत. सर्व परिपूर्णता, वरदान आणि ईश्वरी वैभव या पवित्र अवतारांमध्ये दृश्यमान आहे, जसे की सूर्याच्या किरणांसारखे, जे स्पष्टपणे, स्वच्छ आरशात प्रतिबिंबित होतात. आरशात सूर्याचे प्रतिबिंब पडते असे म्हणण्याचा अर्थ हा नाही की सूर्य आपल्या उच्च शिखरापासून उतरला आहे आणि आरशामध्ये बंदिस्त झाला आहे. त्याचप्रमाणे, परमेश्वर पवित्रतेच्या स्वर्गातून या अस्तित्वाच्या तळावर उतरत नाही. याचा अर्थ असा आहे: मानवता जे सर्व काही जाणते, शिकते आणि परमेश्वराची नामे, गुण, लक्षणे व पूर्णत्वे समजून घेते ते परमेश्वराच्या पवित्र अवतारांशी संदर्भित असते.

१. हा उतारा आपल्या गटात अनेकदा वाचल्यानंतर आणि त्याच्या आशयाविषयी एकमेकांकडून केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर, आपण या कल्पना सहजतेने मांडण्याचा सराव केला पाहिजे.

२. आता आपण येथे शिकलेल्या कल्पना सहजपणे संभाषणात कशा प्रकारे जुळवू करू शकता याबद्दल आपल्या गटात चर्चा करा. हे सहजपणे केले जाऊ शकते, उदाहरणार्थ, ईश्वराचे अस्तित्व किंवा जीवनाच्या उद्देशाविषयी चर्चा करून. आपले कुटुंब आणि मित्र यांच्यासोबत करत असलेल्या संभाषणात, इतर कोणते विषय आणि प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात जे तुम्हाला या कल्पना सामायिक करण्याची शक्यता देतील? ——————————————————

——————————————————————————————

——————————————————————————————

३. समजा की, आपल्या मित्रांशी संभाषणातून आपण नुकत्याच अभ्यासलेल्या विषयास प्रस्तुत करण्यासाठी संधी मिळाली आहे. जर आपणास कोणी खालील प्रश्न विचारला तर आपण कसे उत्तर द्याल: "परमेश्वराविषयी त्याच्या अवतारांद्वारे आपण जाणतो अशा काही गोष्टी कोणत्या आहेत?" —————

——————————————————————————————

——————————————————————————————

४. बहाउल्लाह यांच्या लिखाणांतील पुढील एक किंवा अधिक उतारे कंठस्थ करण्याची आपली इच्छा असेल ज्यायोगे ह्या विषयावर जेव्हा आपण मित्रांशी बोलाल तेव्हा त्यांचा उल्लेख करू शकाल:

**"जो सर्व सृष्टीचा उगम स्त्रोत आहे, त्याचे ज्ञान व त्याची सिद्धी, हे सत्य–सूर्यापासून निघणाऱ्या ह्या तेजस्वी दिव्यात्म्यांचे ज्ञान व त्यांची सिद्धी यांच्याशिवाय अशक्य आहे."[५]**

**"पवित्र अवताराचे व्यक्तित्व सदा परमेश्वराचे प्रतिनिधित्व करते आणि ते त्याच्या वाणीचे प्रवर्तक होय. वास्तविकत:, ते परमेश्वराच्या सर्वश्रेष्ठ पदवींचा दिन–मणि आणि त्यांच्या गुण विशेषांचे उदयस्थान होय."[६]**

**"शिवाय, तुम्ही खात्री बाळगा की, त्या सर्व पवित्र अवतारांपैकी प्रत्येकाचे कार्य व कृती, इतकेच नव्हे तर त्यांच्याशी संबंधित असलेले सर्व काही आणि ते जे भविष्यामध्ये प्रगट करतील ते सर्व काही परमेश्वराच्या योजनेनुसार आहे, आणि ते सर्व त्याच्या इच्छेचे व उद्दिष्टांचे प्रतिबिंब आहे."[७]**

## विभाग ४

धर्माची एकता हा अनेक व्यक्तींच्या आवडीचा विषय आहे आणि खालील कल्पना आपणास अनेक प्रसंगी मदतनिस ठरतील:

आपण प्रकाशावर प्रेम करणारे असले पाहिजे मग तो कोणत्याही दिव्यापासून का येत असेना. आपण गुलाब पुष्पावर प्रेम करणारे असले पाहिजे, मग ते कोणत्याही बागेत उमलत असो. आपण सत्याचा शोध घेणारे असावे, मग ते कोणत्याही उगमापासून येत असो. एका दिव्याशी संलग्नीकरण हे प्रकाशाचे मोल ठरविण्यापासून आपणास प्रतिरोध करू शकते जेव्हा तो दुसऱ्यात चकाकतो. सत्याचा शोध करत असताना, आपण स्वत:ला पूर्वकल्पित कल्पनांपासून मुक्त केले पाहिजे आणि आपल्या पूर्वग्रहांचा त्याग केला पाहिजे. जर आमचा प्याला 'स्व' च्या भावनेने भरलेला असेल तर त्यात जीवनाच्या जलास जागा प्राप्त होणार नाही.

धर्म हा जगाकरिता प्रकाश स्त्रोत आहे. ते आपल्या पावलांना मार्गदर्शन करते आणि आपल्यासाठी अनंत आनंदाचे दरवाजे उघडते. जेव्हा आपण, कट्टर विश्वास आणि आंधळे अनुकरण यांच्या बंधनांपासून मुक्त होऊन, सर्व महान धर्मांच्या शिकवणींचा अभ्यास करतो, तेव्हा आपल्या लक्षात येते की त्या सर्वांचा मुलभूत पाया एकच आहे. ते सर्व ईश्वरी ज्ञान प्रकट करतात. ते मानवतेच्या जगाची प्रगती करण्याचे प्रयत्न करतात.

अर्थातच, वेळ आणि स्थळाच्या आवश्यकतेनुसार प्रत्येक धर्माने प्रचार केलेल्या सामाजिक कायदे आणि नियमांमध्ये भिन्नता आहे. पण त्यांच्या मुलभूत तत्वात सर्व धर्म एकच आहेत. ते धर्मश्रद्धा, ज्ञान, दृढनिश्चय, न्याय, धार्मिकता, उच्च–विचारसरणी, विश्वासार्हता, परमेश्वरावरील प्रेम आणि परोपकार विकसित करतात. या मानवी गुणांचे प्रत्येक धर्मचक्रात नूतनीकरण केले जाते.

हे दुर्दैव आहे की, पूर्वग्रहांमुळे आणि अंध अनुकरणामुळे, अनेकांना धर्मातील अंतर्निहित एकत्व दिसून येत नाही. मानवतेसाठी ईश्वरी मार्गदर्शन सत्य आहे आणि सत्याचे कोणतेही विभाजन नाही: ते

एकमेव आहे. जर आपण पूर्वकल्पित कल्पना बाजूला ठेवून स्वतंत्रपणे सत्याचा शोध घेतलास, तर आपला शोध एकात्मतेकडे नेईल. धर्मने आपल्याला एकत्रित केले पाहिजे; त्याने लोकांमध्ये प्रेमाचे बंध निर्माण केले पाहिजेत. जर ते शत्रुत्व आणि कलहाचे कारण बनले तर त्याची अनुपस्थिती श्रेयस्कर आहे.

१. मागील विभागाप्रमाणे, आपण हे विधान आपल्या गटात अनेक वेळा वाचले पाहिजे, कल्पनांशी संबंधित प्रश्न एकमेकांना विचारले पाहिजेत आणि त्या कल्पना चांगल्या प्रकारे व्यक्त करण्याचा सराव केला पाहिजे.

२. आपल्या गटात विचार करा की आपण अभ्यासलेल्या कल्पनांना संभाषणात कसे विणता येईल, जसे की धार्मिक संघर्षांबद्दल, जे लोकांच्या मनात अनेकदा असते. तथापि, सत्याचा शोध घेण्याच्या महत्तेवर आणि असत्य प्रचारामुळे आपल्या मनावर विपरित परिणाम होणार नाही याबद्दल चर्चा करणाऱ्या अनेक मित्रांमध्ये आपण स्वत:ला देखील बघू शकता. मित्र आणि शेजारी, सहकारी आणि ओळखीच्या लोकांसोबतच्या आपल्या अलीकडील संभाषणांविषयी पुनर्विचार करा. त्यांच्या मनातील काही मुद्दे कोणते आहेत ज्यांना या कल्पनांभोवती चर्चेचा फायदा होईल? ——————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

३. संभाषणात वरील कल्पना सामायिक केल्यानंतर, जर एखाद्या सहभागीने आपणास विचारले, "सर्व धर्मातील काही समान सत्यें कोणती आहेत?", तर आपण कसे उत्तर द्याल? ——————————

————————————————————————————————————————

४. असे सुचविण्यात येते की, बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखनातील खालीलपैकी एक किंवा दोन उद्धरण आपण कंठस्थ करावे:

**"ह्यात कोणतीही लेशमात्र शंका राहू शकत नाही की, पृथ्वीचे निवासी कोणत्याही वंशाचे अगर धर्माचे असोत, सर्वजण एकाच दिव्य उगमापासून आपली प्रेरणा प्राप्त करतात आणि ते एकाच परमेश्वराची प्रजा आहेत."**[८]

**"सर्व धर्माच्या अनुयायांशी मैत्री व बंधुभावाने सहवास करा."**[९]

**"परमेश्वराची श्रद्धा व त्याचा धर्म सचेतन करण्याचा मुळ हेतु आहे मानव—वंशाचे हितसंबंध व ऐक्य सुरक्षित करणे..."**[१०]

**"परमेश्वराचा धर्म, प्रेम व ऐक्यासाठी आहे, त्यास शत्रुत्व व बेबनाव यांचे कारण बनवू नका."**[११]

## विभाग ५

विज्ञान आणि धर्म यांच्यातील संबंध हा पुढील विषय आहे ज्याचा आपणास अभ्यास करण्यास सांगितले जात आहे.

> धर्म हा विज्ञानाशी सुसंगत असला पाहिजे. परमेश्वराने आपल्याला तर्कशक्ती प्रदान केली आहे जेणेकरून आपण सत्य काय आहे हे समजू शकू. विज्ञान आणि धर्म या दोघांनीही तर्काच्या मानकांची पूर्तता करणे अपेक्षित आहे. म्हणून, त्यांनी एकमेकांशी सहमत असले पाहिजे. ते असे दोन पंख आहेत ज्यामुळे मानवी बुद्धिमत्ता मोठी उंची गाठू शकते, दोन पंख ज्यांच्या सहाय्याने मानवता उंच भरारी घेऊ शकते. एक पंख पुरेसा नाही.
>
> विज्ञान हे परमेश्वराचे वरदान आहे. ते भौतिक जगाचे नियम शोधते आणि निसर्गाने आपल्यावर लादलेल्या मर्यादांवर मात करण्यास सक्षम करते. वैज्ञानिक साधनांच्या साहाय्याने, आपण उघड्या नेत्रांना न दिसणाऱ्या गोष्टी पाहतो आणि क्षणार्धात अफाट अंतर पार करून संवाद साधतो. विज्ञान वर्तमान आणि भूतकाळ एकत्रित करते आणि भविष्यातील रहस्ये शोधते. मानवजातीची प्रगती ही वैज्ञानिक सिद्धींवर अवलंबून असते.
>
> परमेश्वराचा धर्म हा सत्य प्रसारीत करणारा, ज्ञानाचा समर्थक आणि मानवजातीस सुसंस्कृत करणारा आहे. धर्माशिवाय, विज्ञान हे भौतिकवादाला पुढे नेण्याचे साधन बनते आणि शेवटी निराशेकडे जाते. जेव्हा धर्म विज्ञानाचा विरोध करतो तेव्हा ती केवळ अंधश्रद्धा ठरते. जर धर्म आणि विज्ञान एकसंधपणे चालले तर, द्वेष आणि कटुता, ज्या मानवतेवर दु:ख लादण्याचे कारण आहेत, त्या बऱ्याचश्या प्रमाणात संपुष्टात येईल.

१. नेहमीप्रमाणे, हे विधान आपल्या गटात, परिच्छेदानुसार परिच्छेद, अनेक वेळा वाचा आणि जोपर्यंत आपण हा आशय नैसर्गिकरित्या व्यक्त करण्यासाठी पुरेसे शिकत नाही तोपर्यंत एकमेकांना प्रश्न विचारा.

२. जर एखाद्या व्यक्तीने खालीलप्रमाणे विचार व्यक्त केले तर त्याला आपण कसा प्रतिसाद द्याल: “धर्म ही भूतकाळातील गोष्ट आहे; विज्ञान मानवतेच्या सर्व समस्या सोडवेल.” धर्म हा अंधश्रद्धेसारखा नसून तो तसा विज्ञानाअभावी बनतो आणि धर्माशिवाय विज्ञान भौतिकवादातून जन्माला आलेल्या निराशेला कारणीभूत ठरते, हे स्पष्ट करणे आपल्यासाठी उपयुक्त ठरेल का? हे का घडत असते याची आपण काही उदाहरणे देऊ शकाल का? ———————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

३.	असे सुचविण्यात येते की, बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखनातील खालीलपैकी एक किंवा दोन उद्धरण आपण कंठस्थ करावे:

**"त्या सर्वशक्तिमान परमेश्वराने मानवांना जी वरदाने प्रदान केली आहेत, त्यांपैकी प्रथम आणि प्रमुख वरदान समजून घेण्याची शक्ती आहे.... हे वरदान मानवाला सर्व गोष्टींतील सत्य जाणण्याची शक्ती देते, त्याला जे न्याय्य आहे त्याकडे मुखोन्वित करते, आणि सृष्टीतील रहस्ये शोधण्यास सहाय्य करते."[१२]**

**"जगाकडे बघा आणि क्षणभर त्यावर विचार करा. ते आपल्या स्वतःच्या अंतरंगाचे पुस्तक तुझ्या नेत्रासमोर अनाकृत्त करते आणि जे तुझ्या स्वामीच्या, भूषाकाराच्या, सर्व विदाच्या लेखणीने त्यामध्ये जे अंकित केले आहे ते प्रकट करते."[१३]**

**"ज्ञान मानव—जीवनासाठी पंखाप्रमाणे आणि त्याच्या उंचावण्यासाठी शिडी प्रमाणे आहे."[१४]**

## विभाग ६

मानवजातीचे एकत्व हा एक असा विषय आहे जो आज सर्वत्र लोकांच्या हृदयात प्रतिध्वनित होत आहे आणि खाली सादर केलेल्या कल्पनांनुसार आपल्यासोबत चर्चा करण्याचे अनेकजण स्वागत करतील.

ज्या बागेत अनेक रंगांची आणि सुगंधांची फुले एकमेकांच्या बाजूस उगतात, ती नेत्रांना आल्हाददायी असते. आणि जरी ते भिन्न असले तरी प्रत्येक फूल सारख्याच पावसाने टवटवीत होते व एकाच सूर्याचा उबारा मिळविते. हेच मानवजातीसाठी देखील खरे आहे. मानवजात कित्येक वंश व वर्ण यांनी बनली आहे. परंतु सर्व एकाच परमेश्वरापासून येतात आणि सर्वांचे मूळ एकच आहे. मानवी परिवारातील विविधता सुसंवादाचा स्रोत झाला पाहिजे, जसे की संगीताच्या बाबतीत; जेथे वेगवेगळे सूर पूर्ण संगीत बनण्यासाठी एकत्र मिसळतात.

ऐक्य अस्तित्वासाठी आवश्यक आहे. प्रेम हे जीवनाचे प्रत्यक्ष कारण आहे. भौतिक जगतात, सर्व वस्तूंचे अस्तित्व आकर्षणाच्या नियमाने एकत्रित बांधलेले असते. आकर्षणाचा कायदा सुंदर फुलांच्या स्वरुपात विशिष्ट तत्त्वांना एकत्र आणतो. तथापि, जेव्हा ते आकर्षण काढून घेण्यात येते, तेव्हा फुलांचे विघटन होईल आणि त्यांचे अस्तित्व संपेल. असेच आहे मानवजातीच्या बाबतीत. आकर्षण, समन्वय आणि ऐक्य ह्या अशा शक्ति आहेत ज्या मानवजातीला एकत्र टिकवून ठेवतात.

बहाउल्लाह ह्यांनी जगातील सर्व लोकांच्या एकत्रीकरणासाठी एक आकृतिबंध अस्तित्वात आणलेला आहे. आपण ऐक्याच्या ह्या वर्तुळात त्यांना आकर्षित करण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा आपण वंश, राष्ट्रीयता, धर्म आणि आपल्यापेक्षा भिन्न मतमतांतरे असणाऱ्या लोकांशी भेटतो,

तेव्हा आपण हे मतभेद आपल्यामध्ये अडथळे बनू देऊ नये. आपण त्यांना मानवतेच्या सुंदर बागेत उगवलेले विविध रंगांचे गुलाब समजले पाहिजे आणि त्यांच्यामध्ये उपस्थित असण्याबद्दल आनंदी असले पाहिजे.

१. आपण मागील विधानांप्रमाणे वरील विधानाचे अध्ययन केल्यानंतर, आपल्या आजूबाजूला उलगडत असलेल्या अनेक संभाषणांचा विचार करा. सभोवतालच्या लोकांच्या मनातील काही मुद्दे कोणते आहेत जे आपल्यासाठी त्यांच्याशी या कल्पना सामायिक करण्याची शक्यता उघडतील? ——————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२. मानवजातीच्या एकतेवरील संभाषणामुळे एखाद्याच्या स्वत:च्या समुदायातील एकतेच्या महत्तेबद्दल चर्चा होऊ शकते. आपल्यापैकी प्रत्येकजण त्यात कशाप्रकारे योगदान देऊ शकेल याबद्दल आपण काही शब्द बोलू शकता का? ——————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

३. पवित्र लिखाणांतील पुढील एक किंवा अधिक उतारे कंठस्थ करण्याची आपली इच्छा असेल ज्यायोगे ह्या विषयावर मित्रांशी आपण बोलाल तेव्हा त्यांचा संदर्भ देऊ शकाल:

**"एकोप्याचा मंडप उभारण्यात आला आहे; तुम्ही एकमेकास परके समजू नये. तुम्ही एकाच वृक्षाची फळे आणि एकाच शाखेची पाने आहात."**[१५]

**"ऐक्याचा प्रकाश इतका सामर्थ्यशाली आहे की तो संपूर्ण पृथ्वी प्रकाशमय करण्यास समर्थ होय."**[१६]

**"तुमचे चेहरे ऐक्याकडे उन्मुख करा, आणि त्याच्या प्रकाशाची दीप्ती तुम्हावर चमकू द्या. तुम्ही एकत्र या आणि त्यांच्यात वाद निर्माण करणाऱ्या कोणत्याही कारणांचे परमेश्वरासाठी निर्मूलन करण्याचे निर्णय घ्या."**[१७]

**"हे काही बंधुत्वभाव, दयाळूपणा व ऐक्य उन्नत करील त्याच्याशी निग्रहाने एकनिष्ठ राहणे मानवांसाठी निर्धारित आहे."**[१८]

## विभाग ७

खालील विधान न्याय या विषयावरील चर्चेत योगदान देण्यास मदत करेल, जी बहुतांश लोकांसाठी अत्यंत चिंतेची बाब आहे:

> मानवजातीच्या अस्तित्वासाठी व्यक्तींमधील पात्रतेची भिन्नता हा मूळ आधार आहे. त्यामुळे सर्व लोक सर्व बाबतीत समान असणे शक्य नाही. तरीपण मानवजातीचा कारभार, आपल्या पूर्णत्वात, न्यायाच्या तत्त्वाने नियंत्रित झाला पाहिजे. न्याय पवित्र असला पाहिजे आणि सर्व लोकांचे अधिकार संरक्षित असले पाहिजे.
>
> न्याय मर्यादित नाही, तो एक सार्वत्रिक गुण आहे. तो मानवी जीवनाच्या सर्व स्तरावर कार्यान्वित असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक सदस्याने सभ्यतेचे फायदे उपभोगले पाहिजेत, कारण प्रत्येक व्यक्ति मानवजातीच्या शरीराचे अवयव आहे. या शरीरातील एक अवयव दुख किंवा त्रासग्रस्त असेल तर इतर सर्व अवयवांना अपरिहार्यपणे पिडा होईल. एका घटकाने पिडीत असणे आणि इतरांनी आरामात राहणे हे कसे शक्य आहे? आजच्या समाजात आवश्यक असलेले परस्पर सहकार्य व समप्रमाणातील अभाव दिसून येतो; तो सुव्यवस्थित नाही. अशा पद्धतीचे कायदे व नियम आवश्यक आहेत जे मानवी परिवाराच्या सर्व सदस्यांमध्ये कल्याण व आनंदाची खात्री देतील.
>
> न्यायाची स्थापना बक्षीस व शिक्षा यांच्या स्तंभावर झाली आहे. जे विश्वासपात्र नाहीत त्यांनी शासित केलेले सरकार आणि ज्यांना दैवी सूडाची भीती नाही, ते अन्यायकारक कायदे अंमलात आणतील. जुलूम रोखायचा असेल तर बक्षीसाची आशा आणि शिक्षेची भीती या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. कायद्याचे विधायक व प्रशासक यांना त्यांच्या निर्णयांच्या आध्यात्मिक परिणामांची जाणीव असली पाहिजे. ज्या राज्यशासकांना विश्वास आहे की त्यांच्या कृतींचे परिणाम या पृथ्वीवरील जीवनाच्या पलीकडे त्यांचे अनुसरण करतील आणि ज्यांना हे माहित आहे की त्यांचे निर्णय दैवी न्यायाच्या तोलात तोलले जातील, ते नक्कीच जुलूमशाही आणि अत्याचार टाळतील.

१. एकदा आपण वरील कल्पना नैसर्गिकरित्या व्यक्त करायला शिकलात, तेव्हा संभाषणातील कोणत्या विषयांना विधानाने दिलेल्या अंतर्दृष्टीचा फायदा होईल यावर विचार करा. ——————————

——————————————————————————————

——————————————————————————————

२. अन्याय कधीच संपणार नाही असे मानणाऱ्या व्यक्तीला आपण कशाप्रकारे प्रतिसाद द्याल? ————

——————————————————————————————

——————————————————————————————

३. न्याय या विषयाबद्दल संबंधित, बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखणीतील काही उद्धरणे खाली दिलेली आहेत जे आपणास कंठस्थ करण्यास प्रोत्साहित केले जाते.

**“मानवाचा प्रकाश न्याय आहे. त्यास जबरदस्ती व जुलूमाच्या प्रतिरोधी वाऱ्यांनी विझवू नका. न्यायाचा उद्देश मानवामध्ये ऐक्य निर्माण करणे हा आहे.”**[१९]

**“न्यायाच्या प्रकाशाशी कोणत्याही प्रकाशाची बरोबरी होऊ शकत नाही. जगाची संघटना व मानवजातीची सुस्थिरता त्यावर अवलंबून आहे.”**[२०]

**“जे काही जगाला प्रशिक्षित करते ते आहे न्याय, कारण त्यास बक्षिस व शिक्षा या दोन स्तंभांनी आधार मिळतो. हे दोन स्तंभ जगासाठी जीवनाचे उगम स्त्रोत आहेत.”**[२१]

## विभाग ८

श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी दिवसेंदिवस विस्तारित होत आहे आणि खालील विधान आपणास या आणि संबंधित विषयांवर मित्रांशी संवाद साधण्यात मदत करेल.

आजमितीस, परस्परसंबंध आणि सौहार्दपूर्ण संबंधांच्या अभावामुळे, समाजातील काही सदस्य समाधानी आहेत, मोठ्या सुखदायक परिस्थितीत आणि ऐषोआरामात जगत आहेत, तर काहींना अन्न आणि निवारादेखील मिळत नाही. काही प्रचंड श्रीमंत आहेत, तर काही अत्यंत गरिबीत जगतात.

समाजाचे कायदे अशा प्रकारे निर्माण केले पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे की काही लोकांना अवाजवी संपत्ती गोळा करणे आणि इतरांना निराधार होणे शक्य होणार नाही. याचा अर्थ असा नाही की सर्व समान असले पाहिजेत, कारण पातळी आणि क्षमतेमधील फरक निर्मितीमध्ये अंतर्निहित आहे. तथापि, गरिबीचे नैराश्य आणण्याबरोबरच संपत्तीचा दु:खद अतिरेक नष्ट केला जाऊ शकतो. जर भांडवलदाराला संपत्ती असणे योग्य असेल, तर कामगाराला अस्तित्वाचे पुरेसे साधन मिळणे आवश्यक आहे. जेव्हा आपण आत्यंतिक दारिद्र्य बघतो तेव्हा कुठेतरी आपणास जुलमीपणा दिसेल.

वस्तुस्थितीचा सार असा आहे की दैवी न्याय, मानवी परिस्थितीत प्रकट झाला पाहिजे. संपूर्ण आर्थिक स्थितीची मूलभूत तत्त्वे दैवी स्वरूपाची आहेत आणि हृदय आणि चैतन्याच्या जगाशी संबंधित आहेत. श्रीमंतांनी आपल्या विपुलतेचे दान करावे; त्यांनी त्यांचे हृदय कोमल केले पाहिजे आणि दयाळू बुद्धिमत्ता जोपासली पाहिजे. हृदये अशा प्रमाणात जोडली गेली पाहिजेत, प्रेम इतके प्रबळ झाले पाहिजे की श्रीमंत लोक, स्वेच्छेने, कायमस्वरूपी आर्थिक समायोजन स्थापित करण्यासाठी पावले उचलतील. त्यांनी स्वत: हे समजून घेतले पाहिजे की समाजात दारिद्र्य असताना त्यांच्याकडे प्रचंड संपत्ती असणे हे न्याय्य किंवा कायदेशीर नाही. अशाप्रकारे, ते स्वेच्छेने त्यांची संपत्ती दान करतील, आणि त्यांना स्वत: आरामात जगण्यास सक्षम बनवतील.

१. वरील विधान वाचा आणि नेहमीच्या पद्धतीने आपल्या गटात त्याचे अध्ययन करा. श्रीमंती आणि गरिबीशी संबंधित अनेक समस्या लोकांच्या मनात आहेत जसे की रोजगार, वेतन, घरे इत्यादी. या विधानातील कल्पनांचा फायदा होईल अशा इतर विषयांचा आपण विचार करू शकता का? ——————————————————————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————————————

२. वरील कल्पनांचा उल्लेख ऐकणाऱ्या एखाद्याने आपणास जर हे विचारले तर आपण काय उत्तर द्याल: "आपण असे म्हणत आहात का की श्रीमंत लोक काटेकोर कर कायदे समजून घेतील व ते त्यांचे समर्थन करतील आणि जे कर त्यांना प्रत्यक्षात द्यावे लागणार आहेत ते स्वेच्छेने देतील? हे शक्य आहे असे आपणास का वाटते?" ————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————————————

———————————————————————————————————————————————————————

३. असे सुचविण्यात येते की, बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखनातील खालीलपैकी एक किंवा दोन उद्धरण आपण कंठस्थ करावे:

**"...तुम्ही उत्कृष्ट व अद्‌भूत फळे द्यावेत, ज्यामुळे तुम्ही आणि इतरांनी, त्यांच्यापासून लाभ घ्यावा. अशा प्रकारे व्यवसाय धंद्यात व कला कौशल्यात गुंतवून घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, कारण यामध्ये संपत्तीचे रहस्य आहे, हे सुज्ञ मानवांनो!"**[२२]

**"जर तुझे नेत्र दयेकडे वळले असतील तर तू त्या गोष्टींचा त्याग कर ज्या तुला लाभान्वित करतात आणि त्यांचेशी सलंग्न हो जे मानवजातीला लाभान्वित करेल. आणि जर तुझे नेत्र न्यायाकडे वळले असतील, तर तू तुझ्या शेजाऱ्याकरिता त्याची निवड कर ज्याची निवड तू स्वतःसाठी करतोस."**[२३]

**"तो आशीर्वादित आहे जो स्वतः आधी आपल्या बांधवास प्राधान्य देतो."**[२४]

**"कोणतेही चांगले कृत्य कधीही किंवा पुढे कधीही वाया जाणार नाही, कारण परोपकारी कृत्ये हे कृत्य करणाऱ्यांच्या भल्यासाठी ईश्वराजवळ जतन केलेले खजीने आहेत."**[२५]

**"संयमाचरणाच्या मर्यादा ओलांडू नका आणि उधळपट्टी करणाऱ्यांमध्ये तुमची गणना होऊ देऊ नये याची दक्षता बाळगा."**[२६]

## विभाग ९

खाली काही कल्पना सादर केलेल्या आहेत ज्या आपणास पूर्वग्रह या विषयावरील चर्चेत सहभागी होण्यास मदत करतील.

सर्व प्रकारचे पूर्वग्रह —धार्मिक, वांशिक, लैंगिक, जातीय, आर्थिक— मानवतेचे संबंध विध्वंस करतात आणि परमेश्वराच्या दैवी आज्ञांच्या विरोधी आहेत. हजारो वर्षांपासून मानवतेला यापैकी एक किंवा दुसऱ्या पूर्वग्रहांमुळे युद्ध आणि रक्तपात सहन करावा लागला आहे. जोपर्यंत हे पूर्वग्रह अस्तित्वात राहतील तोपर्यंत मानवाला चैन मिळणार नाही.

प्रेम आणि एकता निर्माण करण्याच्या एकमेव उद्देशाने परमेश्वराने आपल्या दैवी प्रेषितांना प्रकट केले आहे. ही सर्व स्वर्गीय पुस्तके प्रेमाचे लिखित शब्द आहेत. जर ते वियोगाचे कारण सिद्ध झाले आहेत तर ते निष्फळ झाले आहेत. यास्तव, धार्मिक पूर्वग्रह विशेषत: ईश्वरी इच्छेला आणि आज्ञेला विरोध करतात.

राष्ट्रीय पूर्वग्रह पूर्णपणे असमर्थनीय आहे. संपूर्ण पृथ्वी एक भूमी, एक देश आहे. राष्ट्रांना वेगवेगळे करणाऱ्या रेषा आणि सीमा काल्पनिक आहेत; त्या परमेश्वराने निर्माण केलेल्या नाहीत. लोक नदीला दोन देशांमधील सीमारेषा म्हणून घोषित करतात, प्रत्येक बाजूला एक नाव देतात, जरी ही नदी दोन्ही देशांसाठी निर्माण झाली होती आणि ती त्या सर्वांसाठी एक नैसर्गिक धमनी आहे. तर, ही कल्पनाशक्ती आणि अज्ञान नाही का जे प्राप्त झालेल्या जीवन—वरदानांना युद्ध आणि विनाशाचे कारण बनवण्यास प्रवृत्त करतात?

वांशिक पूर्वग्रह म्हणजे अंधश्रद्धेशिवाय दुसरे काही नाही. एखाद्या व्यक्तीच्या त्वचेचा रंग हा केवळ त्याच्या पूर्वजांच्या हवामान आणि वातावरणाशी जुळवून घेतल्याचा परिणाम असतो. चारित्र्य हा मानवतेचा खरा निकष आहे. उत्कृष्टता वंश आणि त्वतेच्या रंगावर अवलंबून नसते. श्रद्धा, अंत:करणाची शुद्धता, सत्कर्म आणि प्रशंसनीय वाणी हेच परमेश्वराच्या उंबरठ्यावर मान्य आहे.

प्रदीर्घ काळापासून महिलांना पुरुषांच्या अधीन करून त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. नर आणि मादी यांच्यातील फरक ही भौतिक जगताची आवश्यकता आहे कारण आत्म्याच्या जगतात ते समान आहेत. परमेश्वराच्या नजरेत स्त्री—पुरुष असा भेद नाही. परमेश्वराने सर्व मानवजातीला बुद्धिमत्ता आणि आकलनाने संपन्न केले आहे. या सर्वांमध्ये सद्‌गुण प्राप्त करण्याची क्षमता आहे. आज अशी कोणतीही परिस्थिती नाही ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीचे लिंग भेदभावासाठी कारण होऊ शकेल.

'जुन्या कराराच्या (पवित्र बायबलचा प्रथम भाग)' शब्दांनुसार, ईश्वराने म्हटले आहे, "आपण आपल्या प्रतिरूपात, आपल्या प्रतिरूपानुसार मनुष्याची निर्मित करूया." हे महिलांनाही स्पष्टपणे लागू होते. मानवाची निर्मिती ईश्वराच्या प्रतिमेत झाली आहे; म्हणजे, दैवी गुण मानवी वास्तवात प्रतिबिंबित होतात आणि प्रकट होतात. हे सर्व मानवतेसाठी खरे आहे. केवळ एका रंगाचे, वंशाचे किंवा राष्ट्रीयत्वाचे लोकच परमेश्वराच्या प्रतिमेत निर्माण झाले, असा दावा करणे किती असमर्थनीय आहे. केवळ श्रीमंत लोकच ईश्वराच्या प्रतिमेनुसार निर्मित झाले आहे किंवा परमेश्वराच्या जवळ जाण्याचा निकष, समाजात उच्च स्थान असणे आहे असे समजणे किती मूर्खपणाचे आहे. पूर्वग्रहांचा त्याग आणि दैवी साम्राज्याच्या नैतिकतेच्या संपादनाशिवाय मानवतेला प्रकाश प्राप्त होऊ शकणार नाही.

१. आधीच्या विधानांप्रमाणेच, या विधानाचा अभ्यास करा आणि नंतर आपल्या मित्रांनी आणि शेजाऱ्यांनी संभाषणात समोर आणलेल्या काही आव्हानांचा विचार करा ज्यात पूर्वग्रह दूर करण्याच्या आवश्यकतेबाबत चर्चा होत असेल. ————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

२. वरील कल्पना ऐकणाऱ्या एखाद्याने आपणास विचारले तर आपण काय उत्तर द्याल: "असे होऊ शकते का, की आम्हाला पूर्वग्रह असू शकतो आणि त्याबद्दल आम्हाला माहिती नाही?" ————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

३. या कल्पनांवरील आपल्या चर्चेत, बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखनातील खालीलपैकी एक किंवा दुसऱ्या उद्धरणांचा समावेश करण्याचा प्रसंग आपणास मिळेल:

**"पृथ्वी केवळ एक देश असून मानवजात तिचे नागरिक होय."**[२७]

**"जगाची सर्व रोपटी एकाच वृक्षापासून, आणि सर्व थेंब एकाच महासागरातून प्रकट झाले आहेत, आणि सर्व प्राण्यांचे अस्तित्व त्या एकमेव ईश्वराच्या अस्तित्वाचे ऋणी आहेत."**[२८]

**"तो वस्तुतः एक खरा मानव आहे, जो आजमितीस, स्वतःला संपूर्ण मानवजातीच्या सेवेसाठी समर्पित करतो."**[२९]

**"एका चांगल्या चारित्र्याचा प्रकाश सूर्याचा प्रकाश आणि त्याच्या दीप्तीवर मात करतो."**[३०]

**"मानवाचे उच्चतम स्थान दागिन्यांमध्ये किंवा संपत्तीमध्ये नाही, तथापि ते सदाचारी वर्तनात आणि सत्यमय आकलनशक्तीमध्ये आहे."**[३१]

**"ईश्वर करो की सर्व परिस्थितीमध्ये अंधविश्वासाच्या प्रतिमांना क्षतविक्षत करण्यात आणि मनुष्याच्या व्यर्थ कल्पनांच्या पडद्यांना फाडून वेगळे करण्यात तुम्हास कृपापूर्वक सहायता प्राप्त हो."**[३२]

**"वृथावाद करणारा आणि आपल्या बंधुपेक्षा स्वतःची फार महानता मिरविणारा मनुष्य हा सर्वांपैकी अत्यंत क्षुद्र मनोवृत्तीचा आहे."**[३३]

## विभाग १०

मित्रांशी संभाषण करत असताना, आपण अनेकदा स्त्री पुरुष समानता याविषयी पुढील परिच्छेदातून विचार मिळवू शकाल:

भौतिक सूर्य आपला प्रकाश व उष्णता यांच्याद्वारे पृथ्वीवरील सर्व वस्तूंची वास्तविकता प्रगट करतो. वृक्षात दडलेली फळे सूर्याच्या शक्तीला प्रतिसाद म्हणून त्याच्या फांद्यावर दिसू लागतात. तद्वतच, दैवी सत्याचा सूर्य, आध्यात्मिक आकाशात पूर्ण वैभवाने प्रकाशमय होत, भूतकाळात प्रकट न झालेल्या वास्तवांना प्रकाशझोतात आणतो. म्हणूनच, या युगात, स्त्री–पुरुष समानतेचे तत्त्व संपूर्णपणे ओळखले गेले आहे आणि ही आता एक प्रस्थापित वस्तुस्थिती आहे.

बहाउल्लाह यांनी अतिस्पष्ट शब्दांत हे विदित केले आहे की परमेश्वराच्या दृष्टीने पुरुष व स्त्रिया यांच्यामध्ये अंतर नाही. असमानतेची परिस्थिती, जी युगानयुगे अस्तित्वात राहिली आहे, ती पुरुषाच्या वर्चस्वाचा परिणाम नव्हे, तर ती केवळ यामुळे राहिली आहे, कारण स्त्रियांना त्यांच्या सर्व क्षमतांच्या विकासासाठी सारखी संधी देण्यात आली नाही. तथापि, त्यांच्या विरुद्ध दुषित पूर्वग्रह असूनही इतिहासात अशा अनेक स्त्रियांच्या जीवनाची नोंद आहे ज्यांनी अतिमहान यशप्राप्ति केली आहे.

अशीच एक स्त्री होती पर्शियन कवयित्री, ताहिरा. तिचा जन्म १८०० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात अशा देशात झाला जेथे महिला पूर्णपणे पुरुषांच्या अधीन होत्या. ती परमेश्वराच्या दैवी साक्षात्काराचे सत्य स्विकारणारी पहिली स्त्री होती. तिने दिव्य दिनाचा उष:काल पाहिल्याबरोबर, तिला ज्ञात झाले की स्त्री–पुरुष समानतेची वास्तविकता ओळखण्याची वेळ आली आहे. हे सत्य घोषित करण्यासाठी तिने आपली शक्ती समर्पित केली. तिच्या ज्ञानाने व प्रभावी भाषणशैलीने तिच्या काळाच्या कित्येक विद्वानांना चकित केले. जुलमी राजा व त्याचे अज्ञानी व गर्विष्ट पुरोहित यांच्या सर्व शक्त्या जरी तिच्याविरुद्ध होत्या, तरी सत्य बोलण्यापासून ती क्षणभरही डगमगली नाही. आणि शेवटी जी नवीन धर्मश्रद्धा तिने पत्करली होती तिच्यासाठी तिने आपले जीवन अर्पण केले.

परमेश्वराने जे इच्छिले नाही त्यावर विश्वास ठेवणे म्हणजे अज्ञान व अंधश्रद्धा होय. आज स्त्रियांना शिक्षित होण्यासाठी सर्व संधी देण्यात आल्या पाहिजेत आणि मानवी प्रयत्नाच्या सर्व क्षेत्रांत मनुष्याच्या समानतेचे स्थान ग्रहण करू दिले पाहिजे. जोवर स्त्री–पुरुष समानता ह्या जगात वास्तविकता बनत नाही, जशी की ती आध्यात्मिक क्षेत्रात आहे, तोवर मानवजातीची खरी प्रगती शक्य नाही.

१. नेहमीप्रमाणे, आपण आपल्या गटामध्ये या विधानाचा अभ्यास केला पाहिजे आणि कल्पना सामायिक करण्याचा सराव केला पाहिजे. आपल्या मित्रांसोबत आपण अलीकडे केलेले असे काही संभाषण आहेत का ज्याने ते प्रदान केलेल्या अंतर्दृष्टींचा आपणास फायदा झाला असेल? अशा चर्चेत कोणत्या मुद्द्यांचा समावेश होता? ————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

२. आजच्या समाजात प्रचलित असलेल्या काही समजुती आणि दृष्टीकोन कोणत्या आहेत ज्या बदलल्या

पाहिजेत जर महिलांना प्रयत्नांच्या सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्थान ग्रहण करायचे असेल तर?

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

३. बहाउल्लाह ह्यांच्या दैवी लिखाणातील खालील उद्धरणे कंठस्थ करण्याची आपली इच्छा असेल:

**"स्त्रिया व पुरुष परमेश्वराच्या दृष्टीने समान राहिले आहेत आणि नेहमी समान राहतील."**[३४]

**"तुम्ही जाणत नाही की तुम्हा सर्वांना आम्ही एकाच मातीतून का निर्माण केले? कारण कोणीही स्वत:स दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजू नये."**[३५]

**"ह्या दिव्य दिनी दैवी कृपेच्या हाताने सर्व अंतरे दूर केली आहेत. परमेश्वराचे सेवक व सेविका यांना एकाच सारख्या पातळीवर समजण्यात येते."**[३६]

## विभाग ११

शेवटचा परिच्छेद, ज्याचा अभ्यास करण्याचे आपण्यास सूचित करण्यात येत आहे, तो सार्वत्रिक शिक्षण या विषयावरील आहे:

ह्या काळाची अत्यंत तातडीची गरज म्हणजे शिक्षणाची उन्नति होय. कोणतेही राष्ट्र समृद्धि मिळवू शकणार नाही, जोपर्यंत ते शिक्षणास आपला मध्यवर्ती विषय बनविणार नाही. लोकांच्या अधोगतीचे मूळ कारण म्हणजे ज्ञान प्राप्त करण्याच्या संधींचा अभाव होय.

शिक्षण बाल्यावस्थेत सुरु व्हावे. आपल्या मुलांना शिक्षित करण्यासाठी, आध्यात्मिक आणि नैतिक नियमांनुसार त्यांचे चरित्र सुधारण्यासाठी आणि त्यांना कलाकौशल्य आणि विज्ञानांमध्ये प्रशिक्षित केले जाईल याची खात्री करणे हे आई वडिलांचे कर्तव्य आहे. माता ह्या मानवजातीच्या पहिल्या शिक्षिका आहेत; ते आपल्या मुलांचे ज्ञानपूर्ण हृदयाद्वारे पालनपोषण करतात. प्रत्येक मूल प्रशिक्षित झाले पाहिजे, कारण ही बाब अशी नाही ज्याकडे दुर्लक्ष केले तरी चालेल. जर आईवडिल खर्चाची दक्षता घेण्यास योग्य असतील तर त्यांनी तसे करावे. नाहीतर समाजाने मुलाच्या शिक्षणासाठी साधन पुरविले पाहिजे.

शिक्षणाद्वारे मानवमात्रातील प्रत्येकात सर्वोत्कृष्टता साध्य करण्याची तीव्र इच्छा विकसित केली पाहिजे. यामुळे मानवी पुर्णत्वाविषयी माणूस मोहित झाला पाहिजे आणि ते उत्साहाने मिळविण्यास झटले पाहिजे. त्याने आध्यात्मिक वैशिष्ट्यासाठी आणि मानवी जगाच्या सद्‌गुणांसाठी —सचोटी, एकनिष्ठा, मानवजातीची सेवा, प्रेम व न्याय यांसाठी सुविख्यात व्हावे म्हणून महत्वाकांक्षा बाळगावी. आपण शांती व ऐक्य उन्नत करण्यासाठी आणि विद्येची जोपासना करण्यासाठी आपल्या प्रयत्नांनी विशेषता मिळवली पाहिजे. लोकांना अशा मार्गावर मार्गदर्शन करणे हे शिक्षणाचे खरे काम आहे.

१. आपल्या गटात या विधानाचा अभ्यास केल्यानंतर, आपल्या मित्रांना शिक्षणाबद्दल असलेल्या काही समस्या ओळखण्याचा प्रयत्न करा. वरील कल्पना त्यांच्या समस्यांचे निराकरण कसे करतात? ––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

२. असे सुचविण्यात येते की आपण बहाउल्लाह ह्यांच्या लिखाणांतील पुढील एक किंवा दोन उद्धरण कंठस्थ करावे:

**“हे वांच्छित नाही की मनुष्यास ज्ञान किंवा कौशल्ये यांपासून वंचित ठेवावे, कारण त्यामुळे तो केवळ एक निष्फळ वृक्ष होईल.”**[३७]

**“तुमचे मनोदय आणि इच्छा आकांक्षा पृथ्वीच्या लोकांच्या आणि मानवबांधवांच्या सुशिक्षणाकडे केंद्रित करा.”**[३८]

**“कला, हस्तकौशल्ये आणि शास्त्रे मानवजातीचे जग उन्नत करतात आणि त्याच्या उच्चत्वासाठी ते पोषक आहेत.”**[३९]

**“सत्यत:, ज्ञान मनुष्यासाठी सत्यार्थाने द्रव्यभांडार आहे आणि त्याच्यासाठी गौरव, कृपा, आनंद, ऐश्वर्य आणि हर्षोल्लास यांचे उगमस्त्रोत आहे.”**[४०]

## विभाग १२

प्रत्येकाच्या मनात शांतीच्या स्थापनेचा विचार असतो. त्याची स्थापना अत्यंत निकडीची आणि अत्यावश्यक आहे. आता आपण आधीच्या विधानांमध्ये दिलेल्या तत्त्वांवर काही प्रमाणात विचार केला असल्यामुळे, आपणास जागतिक शांततेच्या प्रश्नावर विचार करणे हितकारक वाटेल.

अर्थातच, युद्ध संपवण्यासाठी, जगातील सरकारांनी व्यावहारिक पावले उचलण्यावर बरेच काही अवलंबून आहे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी, विवादांचे निराकरण करण्यासाठी व शस्त्रे कमी करण्यासाठी राजकीय करार आवश्यक आहेत, ज्याप्रमाणे राष्ट्रांमधील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे असंख्य प्रकार आहेत. तरीही, असे उपाय कितीही महत्त्वाचे असले तरी, आधी चर्चा केलेली तत्त्वे जगभर प्रस्थापित न केल्यास, ते शाश्वत शांती स्थापित करू शकणार नाही. आपण स्वत:लाच हे विचारले पाहिजे की, जोपर्यंत लोक वास्तविकतेचा शोध घ्यायला शिकत नाहीत आणि त्यांना सत्य एकच आहे याची जाणीव होत नाही, तोपर्यंत युगानुयुगे प्रचलित असलेले वैमनस्य कायम राहतील का? आपल्या सर्वांचे मूळ एकच आहे. परमेश्वर आपल्या सर्वांवर लक्ष ठेवतो आणि त्याच्या दैवी अवतारांद्वारे आपल्याला प्रशिक्षण देतो. दैवी अवतारांच्या शिकवणी प्रेम आणि सहवास ह्यांच्या मुलभूत तत्वांवर आधारित आहेत. जेव्हा धर्माची एकता मान्य केली जाईल तेव्हाच धार्मिक कलह थांबेल आणि धर्माचा प्रकाश शांततेचा मार्ग प्रकाशित करेल. आपण पुढे विचारले पाहिजे की, अज्ञानाचे ढग दूर करण्यासाठी आणि सर्व प्रकारच्या पूर्वग्रहांचा असत्यपणा दर्शविण्यासाठी, जे शांततेसाठी प्रयत्न करत असतांना एक शक्तिशाली अडथळा होत आहेत, अशावेळी विज्ञान आणि धर्म यांच्यात सामंजस्याने कार्य करणे आवश्यक नाही का? आणखी एक प्रश्न विचारायचा आहे की, जगाच्या कानाकोपऱ्यात श्रीमंत आणि गरीब यांच्यातील सध्याच्या कमालीच्या विषमतेकडे लक्ष दिले जात नसेल तर, शांततामय जगाची निर्मिती करता

येईल का? आणि, जो हिंसाचार इतिहासाचे वैशिष्ट्य राहिले आहे त्यास नष्ट करण्यासाठी, जोपर्यंत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मानवी प्रयत्नांच्या सर्व क्षेत्रात सहभागी होण्याची मुभा दिली जाणार नाही, तोपर्यंत शांतता आणि खरी समृद्धी प्राप्त होणार नाही. उमलत्या पिढ्यांना अशा तत्त्वांनुसार सार्वत्रिक शिक्षण दिले पाहिजे, अन्यथा शांततेची प्रत्येक आशा भंग पावेल. आपण बहाउल्लाह ह्यांचे खालील दैवी उद्धरण कंठस्थ करू शकता जेणेकरून आपण ते मानवतेच्या भविष्याशी संबंधित वार्तालापात इतरांसोबत सामायिक करू शकाल:

> **"मानवजातीचे कल्याण, तिची शांती व सुरक्षितता तोवर अप्राप्य आहेत जोवर तिचे ऐक्य मजबूतीने स्थापले जात नाही."**[४१]

## संदर्भ


१. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१०९
२. वरील प्रमाणे, क्र.१३२
३. वरील प्रमाणे, क्र. ३४
४. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
५. बहाउल्लाह, किताब–ए– ईकान
६. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. २८
७. वरील प्रमाणे, क्र. २४
८. वरील प्रमाणे, क्र.१०९
९. वरील प्रमाणे, क्र. ४३
१०. वरील प्रमाणे, क्र.११०
११. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
१२. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. ९५
१३. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
१४. वरील प्रमाणे
१५. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.११२
१६. वरील प्रमाणे, क्र.१३२
१७. वरील प्रमाणे, क्र.१०९
१८. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
१९. वरील प्रमाणे
२०. शोघी एफेंदी, दैवी न्यायाचे आगमन
२१. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
२२. रहस्यमय शब्द (पर्शियन क्र. ८०)
२३. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
२४. वरील प्रमाणे
२५. बहाउल्लाह
२६. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.११८
२७. वरील प्रमाणे, क्र.११७
२८. शोघी एफेंदी
२९. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.११७
३०. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
३१. वरील प्रमाणे
३२. वरील प्रमाणे
३३. रहस्यमय शब्द (पर्शियन क्र. ५)
३४. बहाउल्लाह
३५. रहस्यमय शब्द (अरेबिक क्र.६८)
३६. बहाउल्लाह
३७. बहाउल्लाह
३८. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१५६
३९. बहाउल्लाह, लांडगाच्या मुलाच्या नामे पत्रिका
४०. किताब–ए–अकदसनंतर प्रकट केलेल्या बहाउल्लाहांच्या पत्रिका
४१. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र.१३१



# दृढीकरणाचे विषय

## हेतू

आध्यात्मिक महत्तेच्या विषयांवर संभाषण करण्यासाठी मित्र आणि शेजाऱ्यांना भेट देण्याची सवय विकसित करणे

## विभाग १

हे तिसरे घटक, पूर्वीच्या घटकाप्रमाणे, अशा क्षमतांशी संबंधित आहे जे आपल्यास अर्थपूर्ण आणि उत्थानकारक संवाद करण्यास सक्षम करतात. दुसऱ्या घटकामध्ये आमचे लक्ष अशा असंख्य प्रसंगांवर होते जे आध्यात्मिक तत्त्वांचा संदर्भ देऊन संभाषणाची पातळी वाढवण्यासाठी स्वत:ला सादर करतात. येथे आमचे लक्ष समुदायाच्या जीवनातील केंद्रस्थानी असलेल्या विषयांना एकत्रितपणे अन्वेषण करण्यासाठी, आम्ही मित्र आणि शेजाऱ्यांच्या घरी करत असलेल्या भेटींवर वळतो.

जगभरातील खेड्यापाड्यात आणि प्रभागात, मित्रांचे गट एकमेकांशी संबंधित क्रियाकलापांच्या संचामध्ये तीव्रतेने गुंतलेले असतात ज्यात नियमित भक्ति बैठका, लहान मुलांच्या आध्यात्मिक शिक्षणासाठी वर्ग, युवाकिशोरांच्या बैठका, अध्ययन वर्ग व युवा संमेलने आणि विविध प्रकारच्या कार्यकलापांचा समावेश असतो. क्रियाकलापाचा हा आकृतिबंध एखाद्या परिसरात रुजतो आणि वाढत्या संख्येने सेवेसाठी स्वत:ला समर्पित केल्यामुळे, मित्रांचे नाभिक केंद्र आकार घेतो आणि सामर्थ्याने वाढतो. खेड्यागावातील किंवा प्रभागातील अधिकाधिक घरांना भेटी देण्याचा एक पद्धतशीर कार्यक्रम हा समुदाय उभारणीच्या प्रक्रियेचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे, जो आता गतिशील होत आहे. अशा भेटींमध्ये विविध विषयांवर संवाद केला जातो. उदाहरणार्थ, लहान मुलांच्या बहाई वर्गाच्या शिक्षकाने, शिक्षणाशी संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत वारंवार विचारविमर्श करणे आवश्यक आहे. मानवाच्या जीवनातील या आशादायक वर्षांशी संबंधित आव्हाने आणि संधींशी संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी, अनुप्रेरक आणि सहशिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्यांनी युवाकिशोर आणि युवांच्या घरी अशाच प्रकारच्या भेटी दिल्या पाहिजेत. घरातील सदस्यांसोबत त्यांचे धर्मश्रद्धेचे ज्ञान वाढवणाऱ्या विषयांवर केलेले संभाषण तितकेच आवश्यक आहे. एकूणच, अशा भेटींमुळे समाजात निर्माण होत असलेल्या साहचर्याच्या संस्कृतीवर होणारा परिणाम नजरअंदाज केला जाऊ शकत नाही.

## विभाग २

या घटकाच्या उद्देशासाठी, आम्ही एक काल्पनिक प्रभागाचा विचार करूया, ज्यामध्ये वर वर्णन केलेली प्रक्रिया प्रगतीशील आहे आणि आम्ही त्याचा वापर घराच्या भेटीदरम्यान कशाप्रकारचा संवाद साधू शकतो हे समजून घेण्याचा संदर्भ म्हणून करूया.

अलेहांद्रा ही विद्यापिठाच्या तिसऱ्या वर्षात शिकणारी तरुणी आहे. ती आणि तिचा एक विद्यार्थी भाऊ, आपल्या आई–वडिलांसोबत त्या घरात राहत आहेत, ज्या घराची आपण कल्पना करत आहोत, जेथे त्यांचा जन्म झाला होता आणि तेथेच त्यांचे संगोपन झाले आहे. ते चौघे आणि नुकतेच शेजारी निवास करण्यास आलेले एक तरुण जोडपे, दर आठवड्याला एकत्र प्रार्थना करण्यासाठी भेटतात आणि सुमारे ८००० लोकसंख्येमध्ये त्यांच्या सभोवतालच्या क्रियाकलापांच्या प्रगतीबद्दल विचारविमर्श करतात. इतर तीन मित्र या साप्ताहिक बैठकांमध्ये वेळोवेळी सहभागी होत आहेत आणि केवळ त्यांच्या स्वत:च्या सेवेचाच नव्हे तर संपूर्ण समुदाय–निर्माण प्रक्रियेचा पद्धतशीरपणे विचार करू लागले आहेत: सहा महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या लहान

बहाई मुलांच्या वर्गातील शिक्षक आणि दोन सतरा वर्षांचे तरुण जे अलेहांद्राच्या मोठ्या भावाच्या मदतीने युवाकिशोर गटाच्या प्रयत्नांना मार्गदर्शन करत आहेत, जो त्याच्या तरुणवयात अलेहांद्रासोबत त्यांच्याच गटाचा अनुप्रेरक होता आणि तो नियमितपणे युवाकिशोर गटाच्या पालकांना भेट देत असतो.

संभाषणांचा पहिला संच ज्याचा आपण विचार करणार आहोत तो अलेहांद्रा आणि सँचेझ कुटुंब यांच्यातील संभाषणाबद्दल आहे, असे कुटुंब जे त्या प्रभागात सुप्रसिद्ध आणि आदरणीय आहेत. श्री. व श्रीमती सँचेझ जवळपास साठ वर्षीय आहेत आणि त्यांनी आपल्या मुला—मुलींचे संगोपन केल्यानंतर, अलेहांद्राच्या घरापासून काही अंतरावर राहायला आले आहेत. श्री. व श्रीमती सँचेझ साक्षर आहेत, परंतु मोठ्या प्रमाणात त्यांना शालेय शिक्षण मिळालेले नाही. औदार्य आणि शुद्ध कर्माच्या जीवनातील अनुभवातून त्यांनी प्राप्त केलेल्या सुज्ञपणामुळे त्यांना व्यापक आदर मिळत आहे. त्यांना काही काळापासून बहाई धर्मश्रद्धेच्या शिकवणींविषयी जाणीव आहे, परंतु त्यांनी अलीकडेच त्या शिकवणींविषयी गंभीरपणे जाणून घेण्याचा निर्णय घेतला आहे. एका आठवड्यापूर्वी, त्यांनी अलेहांद्राच्या पालकांना त्यांच्या बहाई समुदायात सामील होण्याच्या इच्छेबद्दल सांगितले होते. त्यांचे स्वागत करण्यासाठी एका बैठकीचे आयोजन आधीच केले गेले आहे आणि या व्यतिरिक्त, हे देखील मान्य केले गेले आहे की अलेहांद्रा त्यांना अनेक आठवड्यांपर्यंत नियमितपणे भेट देईल, जेणेकरून त्यांना धर्मश्रद्धेचे ज्ञान वाढविण्यात मदत होईल. भेटींच्या अहवालाचे अनुसरण करून, आपण हे विषय समजून घेण्यास सक्षम व्हाल आणि सोबतच अशा प्रसंगी झालेल्या संभाषणाच्या गतिशीलतेवर विचार करू शकाल.

## विभाग ३

अलेहांद्राने श्री. व श्रीमती सँचेझ ह्यांच्यासोबत तिचे पहिले संभाषण, परमेश्वराचा शाश्वत करारानामा याविषयी खाली दिलेल्या संक्षिप्त स्पष्टीकरणावर आधारित करण्याची योजना आखली आहे.

> परमेश्वर एकमेव, अतुलनीय, स्वयंभु असा सर्व सृष्टीचा निर्माता आहे. बहाउल्लाह आपणास शिकवितात की परमेश्वराचे सारतत्त्व मानवी मनासाठी अनाकलनीय आहे, कारण सीमित सृष्टी असीमित सृष्टीचे आकलन करू शकत नाही. लोक परमेश्वराबद्दल जे प्रतिनिधित्व करतात ते त्यांच्या स्वत:च्या कल्पनांचे फळ आहेत. परमेश्वर मनुष्य नाही आणि तो केवळ ब्रम्हांडभर पसरलेले सामर्थ्य नाही. आपल्या अस्तित्वाचे मूळ स्त्रोत म्हणून संदर्भ देण्यासाठी अवश्यमेव आपण उपयोगात आणले पाहिजेत ते शब्द जसे की स्वर्गीय पिता, स्वर्गीय सामर्थ्य, महान चैतन्य, असे शब्द मानवी वाणीने त्याची नामे व गुण विशेष व्यक्त करण्यासाठी आहे, जे त्या परमेश्वराच्या वर्णनासाठी एकंदरीत अपर्याप्त आहेत.
>
> "रहस्यमय शब्द" या पुस्तकात आपण वाचतो:

**"हे मानव पुत्रा! तुझी निर्मिती मला प्रिय होती, यास्तव मी तुला निर्मिले. तसेच तू देखील मजवर प्रेम कर, जेणेकरून मी तुझ्या नामाचा नामोच्चार करावा आणि तुझा आत्मा जीवनाच्या चैतन्याने भारून टाकावा."** [१]

या उद्धरणात, बहाउल्लाह आम्हास सांगतात की परमेश्वराचे आपल्यासाठी प्रेम हे आपल्या अस्तित्वासाठी प्रत्यक्ष कारण होय. आपण ह्या प्रेमाविषयी सदैव जागरूक असले पाहिजे, ते आपले संरक्षण करते, आपणास आधार देते आणि आपणास जीवनाच्या चैतन्याने भारून टाकते. अडचणी किंवा आराम, दु:ख किंवा आनंद याप्रसंगी आपण लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वराचे प्रेम नेहमीच आपल्याला आलिंगन देत असते.

बहाई शिकवणींपासून आपण शिकतो की आपल्या प्रेमापोटी आपणास निर्माण केल्यानंतर परमेश्वराने आपल्यासोबत दैवी करारनामा प्रस्थापित केला आहे. "करारनामा" या शब्दाचा अर्थ आहे दोन किंवा अधिक व्यक्तींमधील करार किंवा अभिवचन. शाश्वत करारनाम्यानुसार, सर्व कृपामय निर्माता आपणास कदापि एकटे सोडून देत नाही आणि वेळोवेळी आपल्या अवतारांपैकी एका अवताराद्वारे आपणासाठी त्याची इच्छा व त्याचा हेतु माहित करून देतो.

"प्रगट करणे" या क्रियापदाचा अर्थ आहे अभिव्यक्ति करणे, काही तरी असे दाखविणे जे अद्याप ज्ञात नव्हते. परमेश्वराचे अवतार असे विशेष दिव्यात्मे असतात जे परमेश्वराचे वचन आपणासाठी प्रगट करतात. ते सार्वत्रिक दैवी शिक्षक आहेत जे आपणास शिकवितात की परमेश्वराच्या इच्छेनुसार कसे जगावे आणि खरा आनंद कसा मिळवावा. परमेश्वराच्या अशा अवतारांपैकी आहेत: अब्राहम, श्रीकृष्ण, मोझेस, झरतृष्ट, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, मुहम्मद पैगंबर आणि अर्थातच दिव्यात्मा बाब व बहाउल्लाह जे मानवी इतिहासातील या युगासाठी परमेश्वराचे जुळे अवतार आहेत.

अशा प्रकारे, परमेश्वराच्या शाश्वत करारामध्ये, त्या ईश्वराच्या पक्षाची नेहमीच पूर्तता करण्यात आली आहे. एक मूलभूत प्रश्न आपण सर्वांनी स्वत:ला विचारला पाहिजे, "मी करारातील माझ्या पक्षाची पूर्तता कशाप्रकारे पूर्ण करणार आहे?" सर्व धार्मिक ग्रंथांमध्ये आपल्याला याचे उत्तर मिळते: ईश्वराचे प्रकटीकरण ओळखणे आणि त्याच्या शिकवणींचे पालन करणे. हा प्रतिसाद आपल्या जीवनाच्या उद्देशाकडे निर्देश करतो, तो म्हणजे परमेश्वराला जाणून घेणे आणि त्याची उपासना करणे. लघु अनिवार्य प्रार्थनेत, आम्ही घोषित करतो:

**"हे माझ्या परमेश्वरा, तुला जाणावे आणि तुझी उपासना करावी यासाठी तू मला निर्मिलेस यास मी साक्ष आहे. मी ह्या क्षणी माझी निर्बलता आणि तुझे सामर्थ्य, माझे दारिद्र्य आणि तुझी संपन्नता स्वीकारतो.**

**संकटी सहाय्यक, स्वयंभू असा तुजविण अन्य कोणी परमेश्वर नाही."** [२]

परमेश्वराला त्याच्या अवतारांच्या माध्यमाशिवाय ओळखणे मानवजातीला अशक्य असल्याने, अवतारांना ओळखणे आणि त्यांच्या शिकवणींचे पालन करणे, हाच आपल्या जीवनाचा उद्देश साध्य करण्याचा एकमेव मार्ग आहे. आज, पृथ्वीवर शांतता आणि न्याय प्रस्थापित होईल, असे सर्व पवित्र ग्रंथांमध्ये दिलेले वचन पूर्ण होत आहे, ज्यामुळे या काळात जगण्याच्या कृपेबद्दल आमचे अंत:करण कृतज्ञतेने भरून गेले आहे. बहाउल्लाह घोषित करतात:

**"हा तो दिव्यदिन होय जेव्हा परमेश्वराच्या सर्वोत्कृष्ट अनुग्रहांचा वर्षाव मानवमात्रांवर झालेला आहे, तो दिव्यदिन, जेव्हा त्याची सर्वशक्तीशाली कृपा समस्त निर्मित वस्तूंमध्ये संचारीत झाली आहे. आपसातील सर्व मतभेद मिटवून, दैवी रक्षण व प्रेमळ दयाळूपणाच्या वृक्षसावलीखाली पूर्ण ऐक्याने व शांततेने विहार करणे, आज सर्व मानवांना उचित होय."[३]**

आम्ही आमची कथा पुढे सुरू ठेवण्यापूर्वी, आपण वरील स्पष्टीकरण वाचले पाहिजे आणि आपल्या गटातील इतर सहभागींसोबत परिच्छेदानुसार परिच्छेदावर चिंतन करावे. आपण तोपर्यंत एकमेकांना प्रश्न विचारू शकता आणि त्यांची उत्तरे एकत्रितपणे देऊ शकता, जोपर्यंत आपल्यापैकी प्रत्येकजण नैसर्गिकरित्या आणि सहजतेने कल्पना व्यक्त करण्यास सक्षम होत नाही. उद्धरणे उत्तमप्रकारे शिकणे विशेषत: महत्वाचे आहे, कारण अशा प्रकारच्या चर्चेत पवित्र लेखनातील उतारे सामायिक करणे अपरिहार्य आहे. खालील सराव आपणास या विभागात मांडलेल्या कल्पना आणि उद्धृत केलेल्या उद्धरणांच्या अर्थावर विचार करण्यास मदतनीस ठरतील:

१. परमेश्वर हे अज्ञेय सारतत्व आहे हे आपण एखाद्याला कसे समजावून सांगाल? वरील पहिला परिच्छेद आपणास या संदर्भात उपयुक्त ठरेल. ————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

२. परमेश्वराने आपली निर्मिती का केली? ————————————————————————

————————————————————————————————

३. "करारनामा" ह्या शब्दाचा अर्थ काय आहे? ————————————————————————

४. परमेश्वराने मानवतेशी केलेल्या त्याच्या शाश्वत करारात काय वचन दिले आहे? ————————

————————————————————————————————

५. आपल्या जीवनाचा हेतु काय आहे? ————————————————————————

६. जर आपण परमेश्वराचे सारतत्व कधीच जाणू शकत नाही, तर आपल्या जीवनाचा उद्देश ईश्वराला जाणणे हाच आहे याचा अर्थ काय? ————————————————————————

————————————————————————————————

७. "प्रगट करणे" या शब्दाचा अर्थ काय आहे? ——————————————————————————

८. परमेश्वराच्या अवतारांपैकी काहींचा उल्लेख करा? ————————————————————————

९. दैवी करारनाम्यातील आपल्या बाजूची पूर्तता आपणास करायची असेल तर आपल्यासाठी कशाची आवश्यकता आहे? ——————————————————————————————

१०. खालील वाक्यांशे पूर्ण करा:

क. हा तो दिव्यदिन होय जेव्हा ———————— ———————— ————————
वर्षाव मानवमात्रांवर झालेला आहे.

ख. हा तो दिव्यदिन होय जेव्हा त्याची ———————————— कृपा समस्त
——————— ———————— ———————— झाली आहे.

ग. हा तो दिव्यदिन होय जेव्हा ——————————————————————————
———————————————————————————————— उचित होय.

११. बहाउल्लाह जगातील सर्व लोकांना काय करण्यास सांगतात? ——————————————
——————————————————————————————————————
——————————————————————————————————————

## विभाग ४

ज्यावेळी ॲलेहांद्राने श्री. आणि श्रीमती सँचेझ ह्यांच्यासोबत जी विषयसामग्री सामायिक करण्याची योजना आखली होती, त्यावेळी तिच्या मनामध्ये केवळ तीच बाब नव्हती. तिला या जोडप्याशी मैत्रीचे घट्ट नाते निर्माण करण्याची आशा आहे. प्रत्यक्ष अनुभवावरून, तिला पूर्वग्रह आणि आश्रयदातेपणाची प्रवृत्ती या दोन्हींचे दुष्परिणाम माहीत आहेत. हे ती स्वाभाविकपणे टाळेल; तिच्या उच्च शिक्षणामुळे तिची नम्रता कमी झाली नाही. तिच्या मनात सँचेझ कुटुंबाबद्दल खरे प्रेम आणि आदर आहे. ती पहिला विषय कशाप्रकारे प्रस्तुत करणार आहे याचा विचार करत असताना, ती स्वत:ला आठवण करून देते की येणाऱ्या अनेक आठवड्यांसाठी सतत सुरू असलेल्या संभाषणाचा हा प्रारंभ आहे. ती लक्षात ठेवते की जरी कल्पनांचा क्रम स्पष्टपणे मांडणे महत्त्वपूर्ण असले तरी, त्या जोडप्याचा प्रतिसाद ऐकण्यासाठी तिने काही ठिकाणी अल्पविराम घेतला पाहिजे. "मी चिंताग्रस्त न होण्याचा प्रयत्न केला पाहिजे," ती स्वत:ला सांगते, "कारण जर मी सातत्याने बोलत राहील तर संभाषणास एक आकार मिळण्याची संधी मिळणार नाही." तिच्या भेटीचा विचार करत अलेहांद्रा या कल्पनांवर काही वेळ विचार करते. जर आपण अलेहांद्राच्या जागी असता, तर आपल्या लक्षात ठेवण्यासाठी खालीलपैकी कोणते विचार आपण योग्य मानाल?

— श्री. आणि श्रीमती सँचेझ ह्यांना धर्मश्रद्धेविषयी शिकवण देणे आणि ते चांगल्या रीतीने समजून घेतील ही खात्री करणे माझे कर्तव्य आहे.

— ह्या उत्तम जोडप्यासह काही वेळ घालविण्याची संधी असणे आणि त्यांच्याशी दैवी लिखाणांवर चर्चा करणे म्हणजे किती अहोभाग्य होय.

— मला माहित आहे की ही भेट महत्वपूर्ण आहे. तरीही मला आशा आहे, ह्यासाठी अधिक वेळ लागणार नाही, कारण मला इतर बऱ्याचश्या गोष्टी करावयाच्या आहेत.

— ही पवित्र लिखाणे समजून घेणे त्यांच्यासाठी अत्यंत कठीण असेल. मी केवळ काही सोप्या कल्पना सामायिक केल्या पाहिजेत. जे महत्वपूर्ण आहे ते म्हणजे त्यांच्याप्रती प्रेम दर्शविणे.

— त्यांच्या या वयात, सँचेझ दाम्पत्य जास्त काही शिकू शकणार नाहीत.

— मी या भेटीसाठी आणि त्यांच्या अंतर्दृष्टी ऐकण्यासाठी उत्सुक आहे कारण आम्ही एका विशेष विषयावर चर्चा करूण दैवी उद्धरणांवर चिंतन करणार आहोत.

— ते वाचू शकतात. मी केवळ विषयसामग्रीचा परिचय करून देईल आणि त्यांनी स्वत: अभ्यास करावा यासाठी काही दैवी उद्धरणे त्यांना देईल.

— त्यांच्यासोबत कल्पना सादर करत असताना, मला अनेकदा अल्पविराम द्यावा लागेल जेणेकरून आम्ही दैवी उद्धरणांचा एकत्रित अभ्यास करू शकू आणि त्यांवर चिंतन करू शकू.

— मला आशा आहे की कोणत्याही व्यत्ययाशिवाय मी संपूर्ण विषयसामग्री प्रस्तुत करू शकेल आणि शेवटी त्यांना काही प्रश्न विचारायचे असल्यास ते विचारू शकेल.

अशा भेटीची तयारी करत असताना आपणास इतर भावनांचा विचार करता येईल का?

## विभाग ५

सँचेझ दाम्पत्याच्या घरी दिलेली अलेहांद्राची पहिली भेट उत्तमप्रकारे पार पडली. त्यांनी अलेहांद्राच्या मनात असलेली धास्ती ओळखली आणि त्यांनी प्रेमळपणाने आणि दयाळूपणाने तिचे स्वागत केले. ते लक्षपूर्वक ऐकतात आणि उद्धरणांकडे विशेष लक्ष देऊन चर्चेत पूर्णपणे भाग घेतात. अडचणीचा एकच क्षण शेवटी येतो जेव्हा श्रीमती सँचेझ अलेहांद्राला एक प्रश्न विचारून आश्चर्यचकित करते: “बहाई समुदायात सामील होऊन मी येशू ख्रिस्ताला विसरत आहे का?” अलेहांद्राला उत्तर माहित आहे, तथापि ते व्यक्त करण्यासाठी तिला थोडा वेळ लागतो. श्री. सँचेझ स्मितहास्य करत तिच्या मदतीला येतात: “मला वाटते की बहाई शिकवणींबद्दल शिकल्यापासून येशू ख्रिस्तावरील माझे प्रेम खरोखरच वाढले आहे.” “आणि जगभरातील अनेकांचा प्रतिसाद अशाप्रकारेच आहे,” अलेहांद्रा सहमत होते, आता व्यक्त करण्यासाठी तिचे विचार सज्ज झाले आहेत. “बहाउल्लाह ह्यांच्या परमेश्वराचे

ऐक्य, धर्माचे ऐक्य आणि मानवजातीच्या ऐक्याबद्दलच्या शिकवणींना समजून घेतल्यामुळे, मोझेस, येशू ख्रिस्त, श्रीकृष्ण, गौतम बुद्ध, झरतृष्ट आणि मुहम्मद पैगंबर ह्यांच्यावरील त्यांचे प्रेम अधिक दृढ झाले आहे."

अलेहांद्राची भेट प्रभावशाली होण्यासाठी आपल्या गटात काही गुण आणि वृत्ती उपस्थित असायला हव्यात, या गुणांविषयी आपल्या गटात चर्चा करण्यासाठी थोडा वेळ देणे उपयुक्त ठरेल. आपणास ज्यांचा विचार करणे आवश्यक आहे त्यापैकी मुख्य आहे विनयशीलता. त्यामधून परमेश्वराच्या निर्मितीमधील विनयशीलता पुढे येते. ज्याप्रसंगी कोणीही परमेश्वर आणि त्याच्या अवतारांबद्दल बोलतो त्याप्रसंगी विनयशीलतेशिवाय काहीही अधिक महत्त्वाची नसते. आपण बहाउल्लाह ह्यांच्या खालील पवित्र वचनांवर चिंतन केले पाहिजे आणि ते कंठस्थ करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत:

**"ईश्वरावर ज्यांची खरी भक्ति आहे ते प्रियभक्त, कोणत्याहि ठिकाणी एकत्र येवोत आणि ते कोणालाही भेटोत, परमेश्वरासंबंधीच्या त्यांच्या वृत्तींमध्ये आणि त्यांच्या स्तुती—स्तवनामध्ये अशा प्रकारची विनम्रता आणि लीनता दर्शविली पाहिजे की, त्यांच्या पायाखालच्या प्रत्येक धुळीकणाने त्यांच्या भक्तिच्या गहनतेचा पुरावा द्यावा. अशा धर्मात्म्यांच्या संभाषणात अशी शक्ति सूचित असावी की, ह्याच धुळीचे कण त्याच्या प्रभावाने उत्स्फूर्त होतील. त्यांची वागणूक अशी असावी की, ज्या मातीवर ते चालतात त्या मातीला खालीलप्रमाणे शब्द उच्चारण्याचा कधीच प्रसंग येऊ नये: 'मानवांनो, तुमच्यापेक्षा मलाच अधिक प्राधान्य दिले पाहिजे, कारण पहा ना, शेतकऱ्याने माझ्यावर टाकलेला भार सोसताना मी किती सहनशील असते. कृपांचे आद्य परमतत्त्व, अशा त्या परमेश्वराने माझ्यावर सोपविलेली वरदाने, मी सर्व प्राणीमात्रांना अविश्रांतपणे देणारी एक साधन आहे. माझा एवढा सन्मान असताना, माझ्या संपत्तीचे, जी संपत्ती सर्व सृष्ट वस्तूंच्या गरजा भागविते, तिचे असंख्य पुरावे असतांना, माझ्या अंगी किती विनम्रता आहे, पहा, संपूर्ण समर्पणवृत्तीने मी मनुष्यांना माझ्यावर कसे पायांचे आघात करीत चालू देते....'"[४]**

वर नमूद केल्याप्रमाणे, आपल्या सहमानवांप्रती आपली विनयशीलता ही आपल्या परमेश्वराप्रती असलेल्या विनयशीलतेतून निर्माण होते. याच विनयशील प्रवृत्तीने, आपण एखाद्या मित्राच्या किंवा शेजाऱ्याच्या घरी जाताना, काही विशिष्ट विषय एकत्रितपणे समजून घेण्यासाठी प्रार्थनाशील वृत्ती बाळगतो. अशा संभाषणादरम्यान, आपण आपले विचार सातत्याने परमेश्वराकडे वळवतो, त्या परमेश्वराला आपली आणि सोबतच उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीची मने आणि अंत:करणे प्रकाशित करण्यास याचना करतो. हे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी, दिव्य प्रार्थनेत कित्येक वाक्यांश आणि वाक्ये आहेत, जी आपण कंठस्थ करू शकता. खाली काही वाक्ये दिली आहेत:

**"आमची हृदये तेजस्वी कर, नेत्रांना सूक्ष्म दृष्टी आणि कर्णांना सावध श्रवणशक्ती दे."[५]**

**"हे स्वामी! तुझे अमर्याद कृपाप्रसाद प्रदान कर, आणि तुझ्या मार्गदर्शनाचे तेज प्रकाशित होऊ दे."[६]**

**"सत्य प्रज्ञेची द्वारे उघड आणि श्रद्धेचा प्रकाश तेजस्वीपणे चमकू दे."[७]**

**"हे परमेश्वरा! आमच्या नेत्रांना प्रकाशित कर जेणेकरून आम्ही तुझा तेजस्वी प्रकाश निरखू शकू."[८]**

**"तुझ्या दैवी ऐक्याच्या ह्या कालचक्रात तुझ्या इच्छेविरुद्ध जाणाऱ्या सर्वांपासून मला संरक्षण देण्यास ... माझ्या पूर्ण अंतःकरणाने, चित्ताने व वाणीने, मी तुझी उत्कट याचना करीत तुझ्याकडेच उन्मुख होतो."[९]**

## विभाग ६

सँचेझ दाम्पत्याच्या घरी भेट दिल्यानंतर आणि शाश्वत कराराच्या विषयावर त्यांच्याशी झालेल्या संभाषणानंतर अलेहांद्राचे हृदय आनंदाने भरले आहे. "पुढील भेट," ती विचार करते, "त्यांच्यासाठी बहाउल्लाह ह्यांच्या जीवनाबद्दलचे ज्ञान प्राप्त करण्याची एक चांगली संधी असेल." खालील दिलेले सादरीकरण तिच्यासाठी उपयुक्त ठरेल:

बहाउल्लाह यांचा जन्म पर्शियाची राजधानी तेहरानमध्ये १२ नोव्हेंबर १८१७ रोजी झाला. बालपणापासूनच, त्यांनी असामान्य गुण दर्शविले आणि त्यांच्या वर्तनाने त्यांच्या आईवडिलांना खात्री झाली की त्यांची महानता विधिलिखित आहे. बादशहाच्या दरबारातील प्रसिध्द मंत्री असलेल्या बहाउल्लाह यांच्या वडिलांचे त्यांच्या मुलासाठी अतोनात प्रेम होते. एके रात्री त्यांना स्वप्न पडले की बहाउल्लाह एका अफाट महासागरात पोहत होते. त्यांचा देह विशाल सागरास प्रकाशमान व तेजस्वी करीत होता. त्यांच्या शिराभोवती लांब काळेभोर केस सर्व बाजूंनी तरंगत होते व चकाकत होते. त्यांच्याभोवती जमलेल्या असंख्य मासोळ्या एकेका केसास धरून ओढीत होत्या. त्या मासोळ्यांची इतकी मोठी संख्या असूनही बहाउल्लाह यांच्या शिरापासून एकही केस वेगळा झाला नाही. स्वतंत्र व अनिर्बंधपणे ते पाण्यावरून सरकत होते आणि त्या सर्व मासोळ्या त्यांच्या मागे जात होत्या. बहाउल्लाह यांच्या वडिलांनी एका व्यक्तीस या स्वप्नाविषयी विचारले, जो स्वप्नांचा अर्थ सांगण्यासाठी प्रसिद्ध होता. त्याने सांगितले की तो अफाट सागर म्हणजे विश्वातील मानव समुदाय होय. एकटे बहाउल्लाह त्यावर सार्वभौमत्व साध्य करतील. बहाउल्लाह यांनी संपूर्ण जगातील मानवजातीत निर्माण केलेल्या कोलाहलाचे प्रतिक त्या असंख्य मासोळ्या असतील. बहाउल्लाह यांना शक्तिशाली ईश्वराचे अजिंक्य संरक्षण लाभेल; हे कोलाहल त्यांना कोणतीच हानी पोहोचू शकणार नाही.

बहाउल्लाह तेरा किंवा चौदा वर्षांचे असतांना ते बादशहाच्या दरबारात आपली बुद्धिमत्ता व विद्वत्ता यासाठी प्रसिध्द झाले. ते बावीस वर्षांचे असतांना त्यांचे वडील वारले व सरकारने तेच वरिष्ठ पद बहाउल्लाह ह्यांना देऊ केले. तथापि, त्यांचा हेतु जगाच्या कामकाजाची व्यवस्था करण्यात आपला वेळ घालविणे हा नव्हता. त्यांच्यासाठी परमेश्वराने निर्धारित केलेल्या मार्गावर चालण्यासाठी त्यांनी दरबार व मंत्रीपदाचा त्याग केला. त्यांनी आपला वेळ गांजलेल्या, आजारी व गरीब लोकांना सहाय्य करण्यात समर्पित केला आणि लवकरच न्यायनिष्ठेचे कैवारी म्हणून ते प्रसिध्द झाले.

दीर्घ काळापासून ज्याची वाट पाहिली, ते शांती, ऐक्य व न्याय या जगासाठी आणणाऱ्या परमेश्वराच्या नूतन युगाच्या पहाटेच्या आगमनाची तसेच नवीन अवताराचा दिव्य दिन जवळ असल्याची घोषणा करणारे दिव्यात्मा बाब, यांची काही दिव्य लिखाणे एका विशेष दूताकरवी बहाउल्लाह यांना वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी मिळाली. बहाउल्लाह यांनी दिव्यात्मा बाब यांचा दिव्य संदेश तत्काळ स्वीकृत केला आणि ते त्यांचे अत्यंत उत्साही अनुयायी बनले. परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे, पर्शियाच्या लोकांवर राज्य करणाऱ्या आपल्या स्वत:च्या स्वार्थी आकांक्षांनी अंध बनलेल्या लोकांनी अत्यंत रानटीपणाने दिव्यात्मा बाब यांच्या अनुयायांचा छळ सुरु केला. बहाउल्लाह त्यांच्या उच्चप्रतिष्ठेसाठी प्रख्यात असूनही त्यांचा छळ करण्यात आला. दिव्यात्मा बाब यांच्या घोषणेच्या सुमारे आठ वर्षांनंतर त्यांना गडद अंधारकोठडीत कैद करण्यात आले. ज्या श्रृंखला त्यांच्या मानेभोवती टाकल्या होत्या त्या इतक्या वजनदार होत्या की ते आपले डोके वर करू शकत नव्हते. या काळकोठडीत बहाउल्लाह यांनी कठोर कष्टाचे भयानक असे चार महिने काढले. तरीही ह्याच काळकोठडीत परमेश्वराच्या चैतन्याने त्यांचा आत्मा भारावून टाकला, आणि त्यांना हे प्रगट केले की ते सर्व युगाचे एकमेव प्रतिक्षित आहेत. ह्या अंधाऱ्या तुरुंगातून बहाउल्लाह स्वरूपी सूर्य संपूर्ण सृष्टीला प्रकाशमय करण्यासाठी उदयास आला.

काळकोठडीतील चार महिन्यांनंतर, बहाउल्लाह यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली आणि त्यांना व त्यांच्या परिवारास हद्दपार करण्यात आले. हिवाळ्याच्या कडक थंडीत त्यांनी आज इराकची राजधानी असलेल्या व तेव्हाच्या ऑटोमन साम्राज्यातील बगदाद शहराकडे पर्शियाच्या पश्चिम पर्वतरांगांच्या बाजूने प्रवास केला. त्या विधिलिखित शहराकडे बर्फाच्छादित भूमीवरून जेव्हा ते शेकडो किलोमीटर प्रवास करीत चालत गेले, तेव्हाच्या त्यांच्या यातनांचे वर्णन शब्दात केले जाऊ शकत नाही.

बहाउल्लाह यांची प्रसिद्धी बगदाद व त्या भागातील इतर शहरांमध्ये लवकरच पसरली आणि अधिकाधिक लोक त्यांचे आशिर्वाद मिळविण्यासाठी ह्या हद्दपार केलेल्या कैद्याच्या दर्शनासाठी आले. परंतु असेही काही थोडे लोक होते जे त्यांच्या प्रसिद्धीने मत्सरी बनले. त्यांच्यापैकी एक मिर्झा याह्या, स्वत: बहाउल्लाह यांचा सावत्र भाऊ होता जो त्यांच्या प्रेमळ देखरेखीखाली राहत होता. मिर्झा याह्या ह्याचे कारस्थान दिव्यात्मा बाब यांच्या अनुयायांमध्ये बेबनावास कारणीभूत झाले व त्यामुळे बहाउल्लाह यांना महान यातना झाल्या. एके रात्री कोणालाही काही न सांगता बहाउल्लाह ह्यांनी आपले घर सोडले आणि कुर्दीस्तानच्या पर्वताकडे प्रस्थान केले. तेथे त्यांनी प्रार्थना व ध्यान यामध्ये एकांतवासाचे जीवन कंठले. ते अत्यंत निकृष्ट अन्न सेवन करून एका लहानशा गुहेत राहिले. कोणासही त्यांचे मूळ व त्यांचे नाव माहित नव्हते. परंतु, हळूहळू त्या भागातील लोक एक निनावी व्यक्तीविषयी बोलू लागले, जो ईश्वरी ज्ञानप्राप्त एक महान संत होता. या पवित्र विभूतीविषयीची बातमी बहाउल्लाह यांचे ज्येष्ठ सुपुत्र अब्दुल—बहा यांच्या पर्यंत पोहोचली तेव्हा त्यांनी आपल्या परमप्रिय पित्याविषयीची चिन्हे लगेच ओळखली. बगदादला परत येण्याविषयी बहाउल्लाह यांना याचना करणारी पत्रे विशेष दूताकरवी पाठविण्यात आली. त्यांनी ही विनंती स्वीकारली व दोन वर्षांचा वियोगाचा अवधी संपुष्टात आला.

बहाउल्लाह यांच्या अनुपस्थितीत बाबी समुदायाची अवस्था अगदी वेगाने खालावत गेली. पर्वतातून परत आल्यानंतर आणि त्या अगोदर बगदादमध्ये सात वर्षांच्या वास्तव्यादरम्यान, बहाउल्लाह ह्यांनी दिव्यात्मा बाब यांच्या गांजलेल्या व गोंधळलेल्या अनुयायांमध्ये एक नवचैतन्य भरणे सुरु केले. त्यांनी आपल्या महान दैवी पदाची घोषणा अद्याप जरी केली नव्हती तरी त्यांच्या शब्दातील सामर्थ्य व बुद्धिमत्ता यांनी बहुसंख्य बाबींची एकनिष्ठा आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील लोकांची प्रशंसा मिळविणे सुरु केले. परंतु धर्मांध मुस्लिम धर्मगुरू, इतक्या मोठ्या संख्येतील लोकांवर बहाउल्लाह यांचा प्रचंड प्रभाव सहन करू शकले नाहीत. त्यांनी अधिकाऱ्यांकडे तक्रारीवर तक्रारी करणे सुरु ठेवले तेव्हा पर्शिअन सरकारने बहाउल्लाह यांना त्यांच्या मातृभूमीपासून अतिदूर, कॉन्स्टँटिनोपल या शहराकडे पाठविण्यासाठी ऑटोमन साम्राज्यातील काही अधिकाऱ्यांशी हातमिळवणी केली.


बगदादमधील लोकांसाठी एप्रिल १८६३ हा महिना अतिशय दु:खाचा होता. ज्यांच्यावर त्यांचे प्रेम प्रगाढ झाले होते, ते त्यांच्या शहरातून एका अज्ञात ठिकाणाकडे जाण्यासाठी निघणार होते. त्यांच्या प्रयाणाच्या काही दिवसांपूर्वीच, बहाउल्लाह शहराच्या बाहेर एका बागेत मुक्कामास आले, तेथे त्यांनी आपला तंबू उभारला आणि बारा दिवस त्यांना निरोप देणाऱ्या दर्शनार्थी समुदायास भेटले. भारावलेल्या अंत:करणांनी दिव्यात्मा बाब यांचे अनुयायी या बागेत आले. काही जण बहाउल्लाह यांच्या हद्दपारीच्या ह्या दुसऱ्या चरणात त्यांना सोबत करणार होते, तर कित्येकांना मागे थांबावे लागणार होते आणि त्यांच्या सहवासापासून वंचित रहावे लागणार होते. तथापि हा प्रसंग दु:खाचा असावा असे परमेश्वराने इच्छिले नव्हते. त्याच्या अमर्याद कृपेचे दरवाजे सताड उघडण्यात आले होते आणि बहाउल्लाह यांनी त्यांच्याभोवती असणाऱ्यांना घोषित केले की ते दिव्यात्मा बाब यांनी भाकित केलेले, 'तो ज्याला ईश्वर प्रकट करील' असे तेच एकमेव होते. दु:खाची जागा अमर्याद आनंदाने घेतली, अंत:करणे उन्नत झाली आणि आत्मे यांच्या प्रेमाग्नीने प्रज्ज्वलित झाले. एप्रिलमध्ये हा बारा दिवसांचा कालावधी, बहाउल्लाह यांच्या विश्वव्यापी धर्माच्या घोषणेचे दिवस 'रिझवान महोत्सव' म्हणून सर्वत्र साजरे केले जातात.

कॉन्स्टँटिनोपल ही ऑटोमन साम्राज्याची राजधानी होती. अवघ्या चार महिन्यांत, येथे पुन्हा बहाउल्लाह यांच्या बुद्धिमत्तेने व वैयक्तिक आकर्षणाने असंख्य लोक मोहित झाले. एड्रियनोपलच्या गावाकडे बहाउल्लाह यांना हद्दपार करण्यासाठी अधिकाऱ्यांचे मन वळविणाऱ्या धर्मांध मुस्लिम धर्मगुरूंनी "कॉन्स्टँटिनोपलमध्ये त्यांनी अधिक काळ न राहिले पाहिजे," अशी कुजबुज सुरू केली. एड्रियनोपलमध्ये, जेथे ते साडेचार वर्षे निवासी राहिले, तेथे बहाउल्लाहांनी जगातील राजे व राज्यकर्ते यांना पत्रे लिहिली. त्यांनी जुलुम जबरदस्तीचे मार्ग सोडून द्यावेत व आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी स्वत:ला समर्पित करावे असे आवाहन केले. नंतर त्यांच्या शत्रूंनी अत्यंत क्रूर शिक्षेचा विचार केला. ते व त्यांचा परिवार यांना अक्काकडे हद्दपार करण्यात येणार होते जी त्याकाळी संपूर्ण साम्राज्यात अत्यंत वाईट अपराध्यांची वसाहत होती. "खात्रीने त्या तुरुंगाच्या शहरातील कठोर परिस्थितीत बहाउल्लाह मरण पावतील," असा विचार त्या दुर्बल मनोवृतीच्या लोकांनी केला व त्यांनी कल्पना केली की स्वत: परमेश्वराने गतिशील केलेल्या कार्यास ते थांबवू शकतील.

बहाउल्लाह यांनी अक्कामध्ये ज्या कठोर यातना सोसल्या त्याची गणना करता येणार नाही. त्यांना गरजेच्या साधनांचा अभाव होता आणि रात्रंदिवस त्यांच्याभोवती शत्रू होते. परंतु तुरुंगवासाची परिस्थिती हळूहळू बदलली. अक्का येथील रहिवासी व त्यांचे सरकार यांना या लहानशा बहाई तुकडीच्या, ज्यांना त्यांच्या तुरुंग–शहरात हद्दपार करण्यात आले होते, त्यांच्या नीरपराधीपणाची खात्री झाली. पुन्हा एकदा ह्या असामान्य विभूतीची बुद्धिमत्ता व प्रेम यांनी लोक आकर्षित झाले, जरी बहुसंख्य लोकांना त्यांचे महान दैवी पद समजले नाही. जवळपास ९ वर्षांनंतर तुरुंग–शहराचे दरवाजे बहाउल्लाह व त्यांच्या अनुयायांसाठी उघडण्यात आले. अब्दुल–बहा, त्यांचे प्रिय ज्येष्ठ सुपुत्र, त्यांच्या वडिलांसाठी तुरुंग–शहराबाहेर राहण्यासाठी एक प्रतिष्ठित जागा मिळवू शकले आणि अखेरीस अब्दुल–बहांना ग्रामीण भागात एक घर भाड्याने घेणे शक्य झाले जेथे बहाउल्लाह त्यांच्या आयुष्यातील उर्वरित तेरा वर्षे सापेक्ष शांततापूर्ण आणि स्थिरचित्त परिस्थितीत घालवू शकले. आता आपण या घराला बाहजीचा वाडा म्हणून ओळखतो, आणि तेथे बहाउल्लाह १८९२ च्या मे महिन्यात, त्यांच्या आध्यात्मिक ऐश्वर्य व वैभव उच्च्त्वावर पोहचून स्वर्गवासी झाले.

बहाउल्लाह यांनी सार्वत्रिक शांतता व बंधुत्व यांची पताका उंच उभारली व परमेश्वराचे दैवी वचन प्रगट केले. त्यांच्या शत्रूंनी त्यांच्याविरुद्ध आपल्या शक्ति जरी एकवटल्या तरी तेहरानमधील गडद काळकोठडीत श्रृंखलाबद्ध असतांना परमेश्वराने त्यांना जसे वचन दिले होते त्यानुसार त्यावर ते विजयी झाले. त्यांच्या स्वत:च्या जीवनकाळात, त्यांच्या दिव्य संदेशाने हजारो लोकांची अंत:करणे पुनरुज्जीवित झाली. आज त्यांच्या शिकवणींचा संपूर्ण जगभरात प्रसार होणे सुरु आहे. त्यांचे अंतिम लक्ष म्हणजे, एका सार्वत्रिक धर्मकार्यात, एका सर्वसामान्य धर्मश्रद्धेत मानव जातीस एकवटणे होय, जे साध्य करण्यापासून त्यांना कोणीही अडवू शकत नाही.

बहाउल्लाह यांच्या जीवनाचे वरील विवरण तुलनेने अधिक लांब उतारा आहे. खालील सरावाकडे वळण्यापूर्वी आपण हा उतारा, प्रत्येक परिच्छेदानुसार परिच्छेद आपल्या गटात वाचला पाहिजे आणि त्यातील आशय चांगल्याप्रकारे शिकेपर्यंत आणि आपल्या शब्दात तो सहजपणे व्यक्त करता येईल तोपर्यंत एकमेकास प्रश्न विचारले पाहिजेत. बहाउल्लाह ह्यांच्या हद्दपारीचा मार्ग समजून घेण्यास आणि हद्दपारी दरम्यान घडलेल्या घटना जाणून घेण्यास खालील नकाशा आपल्यास मदतनीस ठरेल.



१. वरील विवरणाच्या आधारे, बहाउल्लाह ह्यांच्या जीवनाशी निगडीत प्रमुख घटनांचा क्रम, खाली दिलेल्या जागेत लिहिणे आपणास उपयुक्त वाटेल. ———————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

————————————————————————————————————

२. बहाउल्लाह ह्यांच्या जीवनाच्या विषयामधील चर्चेत, घटनांच्या क्रमाव्यतिरिक्त, अनेक संकल्पना आहेत ज्या अधोरेखित केल्या पाहिजेत. मानवतेवरील त्यांच्या प्रेमामुळे त्यांनी सहन केलेल्या दु:खांवर सखोल मनन, तसेच विरोधाला तोंड देताना त्यांच्या धर्मश्रद्धेने मिळवलेल्या विलक्षण विजयांचे प्रतिबिंब हे विशेष महत्त्वाचे आहेत. पुढील शब्द आपल्या मनावर आणि अंत:करणावर कोरलेले असू द्या:

**“सनातन सौंदर्याने स्वत: श्रृंखलाबद्ध होणे स्वीकारले जेणेकरून मानवजात तिच्या दास्यत्वातून मुक्त व्हावी, आणि अत्यंत भक्कम दुर्गामध्ये स्वत:स बंदी करवून घेण्यास स्वीकृती दिली जेणेकरून अखिल जगताने खऱ्या स्वातंत्र्याप्रत जावे. त्याने दु:खाचा प्याला तळापर्यंत प्राषण केला, जेणेकरून पृथ्वीतलावरील सर्व लोकांना चिरस्थायी सुख प्राप्त व्हावे व ते आनंदाने भरून जावेत. ही तुमच्या करुणामय, सर्वदयाळू स्वामीचीच कृपा आहे. हे ईश्वराच्या एकत्वावर विश्वास बाळगणाऱ्यांनो, आम्ही अपमानित होण्याचे स्वीकारले ज्यायोगे तुम्हास प्रतिष्ठा लाभावी आणि अनेकानेक दु:सह यातना सहन केल्या आहेत, ज्यायोगे तुमची समृद्धी व भरभराट व्हावी. जो संपूर्ण जगाच्या पुनर्रचनेसाठी अवतरला आहे, पहा परमेश्वराशी भागीदारीने जोडून घेणाऱ्यांनी त्याला कसे अत्यंत ओसाड शहरांमध्ये निवास करण्यास भाग पाडले आहे.”**[१०]

३. जेव्हा आपण बहाउल्लाह ह्यांनी सहन केलेल्या दु:खाबद्दल बोलतो, तेव्हा त्यांना त्यांच्या शत्रूंचा असहाय्य बळी म्हणून सादर करू नये याची आपण काळजी घेतली पाहिजे. मानवजात तिच्या दास्यत्वातून मुक्त व्हावी याकरिता त्यांनी स्वेच्छेने श्रृंखलाबद्ध होणे स्वीकारले. त्यांच्या जीवनाची कथा, जरी अतिशय दु:खाने भरलेली असली तरी, त्याचे सारतत्व एक महान यशप्राप्ती आहे. आपल्या गटाच्या सहशिक्षकाच्या मदतीने, आपणास याक्षणी बहाउल्लाह ह्यांच्या जीवनाविषयी असलेल्या माहितीच्या आधारे, त्यांचे दु:ख आणि यशप्राप्ती यावर आपण एक लहान भाषण तयार करू शकता का? खालील प्रश्न आपल्यासाठी उपयुक्त ठरू शकतील.

क. बहाउल्लाह यांनी श्रुंखलाबद्ध होणे का मान्य केले? ——————————————

————————————————————————————————

ख. बहाउल्लाह यांनी कैदी होणे का मान्य केले? ——————————————————————

——————————————————————————————————

ग. बहाउल्लाह यांनी दु:खाचा प्याला का प्राशन केला? ————————————————————

——————————————————————————————————

घ. बहाउल्लाह यांनी अपमानित होण्याचे का स्वीकारले? ——————————————————

——————————————————————————————————

च. बहाउल्लाह यांनी इतक्या अनेक छळवणुकी का सोसल्या? ————————————————

——————————————————————————————————

छ. काय बहाउल्लाह यांनी यामुळे यातना सहन केल्या कारण ते त्यांच्या पारिपत्यासाठी इतर काही करण्यासाठी दुर्बळ होते? ——————————————————————

——————————————————————————————————

ज. बहाउल्लाह त्यांच्या शत्रूंसमोर जर दुर्बल नव्हते तर, मग त्यांनी यातना सोसण्याचे का स्वीकारले? ——————————————————————————

——————————————————————————————————

## विभाग ७

अलेहांद्राची सँचेझ दाम्पत्याच्या घरी दिलेली दुसरी भेट पहिल्या भेटी सारखीच आनंददायी आहे. श्री. आणि श्रीमती सँचेझ बहाउल्लाह ह्यांच्या जीवनाच्या कथेशी आधीच काहीसे परिचित आहेत, परंतु त्यांना अलेहांद्राच्या सादरीकरणातून त्याविषयी अधिक जाणून घेण्यास आनंद झाला आहे आणि बहाउल्लाह ह्यांनी सहन केलेल्या यातनांविषयी माहिति जाणून त्यांच्या मनाला स्पष्टपणे स्पर्श झाला आहे. “असे स्पष्ट होते की,” श्रीमती सँचेझ एका क्षणी विचार करतात, “नेतृत्व आणि ऐहिक सामर्थ्यासाठी तहानलेल्या लोकांच्या हातून परमेश्वराचे अवतार नेहमीच यातना सहन करतात.” अलेहांद्रा ठरवते की तिने कंठस्थ केले उद्धरण त्यांच्याबरोबर सामायिक करणे योग्य आहे —ज्याची माहिती आपणास मागील भागाच्या अध्ययनातून झाली आहे— ज्यामध्ये बहाउल्लाह त्यांनी मानवजातीसाठी सहन केलेल्या यातनांविषयी बोलतात, जेणेकरून आपण दडपशाहीपासून मुक्त होऊ आणि शाश्वत आनंद प्राप्त करू शकू. तिन्ही मित्रांना त्यादिवशी झालेल्या संभाषणामुळे चेतना प्राप्त होते.

तिच्या पुढच्या भेटीचा विचार करताना, अलेहांद्रा त्वरीत निष्कर्ष काढते की अब्दुल—बहांचे अद्वितीय स्थान हा चर्चेसाठी एक नैसर्गिक विषय असेल. तिच्या पुढच्या भेटीचा विचार करताना, अलेहांद्रा त्वरीत निष्कर्ष

काढते की अब्दुल–बहांचे अद्वितीय स्थान हा चर्चेसाठी एक नैसर्गिक विषय असेल. खालील मुद्द्यांवर ती संभाषण करण्याची खात्री करेल:

बहाउल्लाह ह्यांचे ज्येष्ठ सुपुत्र, अब्दुल–बहा मानवजातीच्या इतिहासात एक अत्यंत अद्वितीय विभूती आहेत आणि आपणास असे व्यक्तिमत्व कोणत्याही भूतकालीन धर्मश्रद्धेत मिळणार नाही. त्यांनी लहानपणीच आपल्या पित्याचे दैवी स्थान ओळखले आणि त्यांच्या हद्दपारीत आणि दु:खात सहभागी झाले. बहाउल्लाह ह्यांनी त्यांच्या निधनानंतर, बहाई समुदायास अब्दुल–बहांच्या काळजी आणि संरक्षणाखाली सोडून दिले. बहाउल्लाह ह्यांनी मानवतेवर जे अपार बक्षीस प्रदान केले आहे त्याचे आपण कधीही संपूर्णपणे रसग्रहण करू शकत नाही, कारण त्यांनी मानवजातीला केवळ त्यांचे अति उच्च दिव्य प्रकटीकरणच दिले नाही, तर त्यांनी आपला स्वत:चा सुपुत्रही दिला, ज्यांच्या ज्ञानाने व बुद्धिमत्तेने, बहाउल्लाह म्हणतात, जग मार्गदर्शित आणि प्रकाशित होईल.

जेव्हा आपण अब्दुल–बहांच्या जीवनाचा आणि उच्चारांचा अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला या धर्मचक्रात त्यांनी व्यापलेल्या अद्वितीय पदाविषयी माहिती मिळते. त्यांच्या या पदाविषयी तीन पैलू आपण लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

प्रथमत: अब्दुल–बहा हे बहाउल्लाह ह्यांच्या करारनाम्याचे केन्द्रबिंदू होत. बहाउल्लाह ह्यांनी आपल्या अनुयायांशी करारनामा केला आहे आणि त्यांच्या अनुयायांनी आपली अंत:करणे ह्या केन्द्रबिंदूकडे वळवावीत आणि त्यांच्याशी पूर्णपणे एकनिष्ठ असावे असा उपदेश दिला आहे. अब्दुल–बहांनी त्यांच्या इच्छापत्र व वारसपत्रात, शोघी एफेंदी ह्यांना धर्मश्रद्धेचे संरक्षक या पदावर नियुक्त केले आहे, जे असे केन्द्रबिंदू आहेत, ज्यांच्याकडे सर्वांनी अब्दुल–बहांच्या स्वर्गारोहणानंतर वळले पाहिजे. आज विश्व न्याय मंदिर हे धर्मश्रद्धेचे केन्द्रबिंदू आहेत, ज्याची स्थापना बहाउल्लाह यांची सुव्यक्त आज्ञा आणि अब्दुल–बहा व धर्मसंरक्षक यांनी दिलेले स्पष्ट आदेश यानुसार करण्यात आली आहे.

दुसरे, अब्दुल–बहा हे बहाउल्लाह यांच्या वचनाचे बिनचूक भाष्यकार आहेत. बहाउल्लाह यांचे प्रकटीकरण इतके विस्तीर्ण आहे, त्यांच्या दिव्य वचनांमध्ये इतके विपुल अर्थ साठलेले आहेत की त्यांना एक असे भाष्यकार मागे सोडणे आवश्यक वाटले, ज्यांना ते स्वत: प्रेरित करतील. याप्रमाणे येणाऱ्या पिढ्यांसाठी अब्दुल–बहांची भाष्ये त्यांच्या अनेक पत्रिकातून आणि त्यांच्या भाषणांच्या विश्वसनीय लेखांतून अभ्यासून मानवजात बहाउल्लाह यांच्या दैवी शिकवणी समजून घेण्यास पात्र होईल. धर्मसंरक्षक हे अब्दुल–बहानंतर बहाउल्लाह यांच्या दैवी शिकवणींचे भाष्यकार आहेत, त्यांच्यासह भाष्य करण्याचे काम संपूर्ण झाले आहे आणि कोणासही बहाउल्लाह यांच्या वचनांचे भाष्य करण्याचा अधिकार त्यांच्या धर्मचक्राच्या उर्वरित काळासाठी नाही.

पूर्वीच्या काळी, प्रत्येक धर्म त्याच्या पवित्र ग्रंथामधील परिच्छेदांच्या वेगवेगळ्या व्याख्यांमुळे, अनेक सांप्रदायिक विभाजनांनी पीडित झाले आहेत. तथापि, ह्या धर्मचक्रात जेव्हा बहाउल्लाह यांच्या विधानातील अर्थाविषयी अनिश्चितता असते तेव्हा प्रत्येक जण अब्दुल–बहा व धर्मसंरक्षक यांच्या

भाष्यांकडे वळतो. जर अनिश्चितता बाकी राहील तर स्पष्टीकरणासाठी विश्व न्याय मंदिराकडे वळता येते. तेव्हा शिकवणींच्या अर्थावर बेबनावास जागा रहात नाही आणि धर्मश्रद्धेच्या ऐक्याचे रक्षण होते.

तिसरे, अब्दुल—बहा त्यांच्या पित्यांच्या दैवी शिकवणींचे परिपूर्ण आदर्श आहेत. आपण जरी पूर्णत्वाच्या अशा प्रमाणापर्यंत कदापि पोहचू शकत नाही, तरी आपण आपल्या दृष्टीसमोर त्यांना नेहमी ठेवले पाहिजे आणि त्यांच्या उदाहरणाचे अनुसरण करण्यास झटले पाहिजे. जेव्हा आपण दैवी लिखाणात प्रेमाविषयी वाचाल, तेव्हा आपण अब्दुल—बहांकडे उन्मुख होऊ शकता आणि त्यांच्यात प्रेम व दयाळूपणा प्रत्येक्ष सारतत्त्व बघाल. जेव्हा आपण पावित्र्य, न्याय, सत्यनिष्ठा, आनंद व उदारता यांविषयी वाचता, तेव्हा त्यांच्याकडे उन्मुख व्हा आणि त्यांच्या जीवनाचा विचार करा, आणि आपण बघाल की त्यांनी हे गुण किती अतोनात पूर्णत्वाने प्रगट केले आहे.

अर्थातच, अब्दुल—बहांच्या जीवनाचे चिन्ह आहे त्यांचे आत्मसमर्पण. आपण जाणता की, "अब्दुल—बहा", म्हणजे बहाचा सेवक आणि ती एक अशी उपाधि आहे जी अब्दुल—बहांना त्यांच्या भाविकांनी बहाल करू इच्छिलेल्या सर्व उपाधींपेक्षा अधिक प्रिय होती. अब्दुल—बहांचे खालील शब्द सेवेसाठी त्यांच्या उत्कट इच्छेची अभिव्यक्ति आहे:

**"माझे नाव आहे अब्दुल—बहा. माझी पात्रता आहे अब्दुल—बहा. माझी वास्तविकता आहे अब्दुल—बहा. माझी स्तुती आहे अब्दुल—बहा. अनुग्रहित पूर्णत्वासाठी दास्यत्व हे माझे वैभवशाली व तेजोमय राजमुकुट, आणि सर्व मानववंशासाठी दासता हा आहे माझा चिरंतन धर्म... अब्दुल—बहा शिवाय मला कोणतेही नाव नाही, उपाधि नाही, स्तवन नाही, प्रशंसा नाही किंवा कदापि असणार नाही. ही आहे माझी आकांक्षा. ही आहे माझी अतिमहान उत्कंठा. हे आहे माझे अमर जीवन. हे आहे माझे अविनाशी वैभव."**[११]

अलेहांद्राने तिच्या पुढच्या भेटीत सँचेझ दाम्पत्यासोबत स्पष्टपणे जे सामायिक करण्याची योजना आखली आहे, ते म्हणजे एका अद्वितीय व्यक्तिमत्त्वाची ओळख होय; ज्यामुळे त्यांच्या जीवनात या धर्मचक्रात अब्दुल—बहांनी व्यापलेल्या एक विशेष स्थानाबद्दलचा आदर पुढील वर्षांत वाढतच जाईल. आपल्या स्वतःच्या जीवनात, आपण सेवाकार्याच्या मार्गावर चालत असताना, आपणास अब्दुल—बहांचे उदाहरण आत्मसात करण्यासाठी आणि त्यांच्या वचनांवर प्रतिबिंबित करण्याच्या अनेक संधी मिळतील. आधीच, मागील घटकामध्ये, आपण त्यांच्या काही उच्चारांशी स्वतःला परिचित केले आहे, आणि त्यांनी त्यांच्या पत्रिकांमध्ये आणि सार्वजनिक भाषणांमध्ये मांडलेल्या कल्पना ज्या पद्धतीने व्यक्त केल्या आहे, त्या पद्धतीने आपण कशाप्रकारे व्यक्त करावे हे शिकण्यास प्रोत्साहित केले गेले आहे. यावेळी, त्यांच्या अद्वितीय स्थानकाबद्दलची आपली सध्याची समज दृढ करण्यासाठी, आपण वर नमूद केलेल्या मुख्य मुद्द्यांवर आपल्या गटातील इतर सहभागींसह विचारविमर्श करा आणि त्यांना प्रभावीपणे सादर करण्याचा सराव करा. उद्धृत केलेल्या उद्धरणावर चिंतन केल्याने आपणास सेवेच्या मार्गावर जाण्याच्या आपल्या प्रयत्नांना प्रेरणा मिळेल.

## विभाग ८

श्री. आणि श्रीमती सँचेझ यांच्या घरी भेटी सुरू झाल्यापासून अलेहांद्राच्या मनात एक प्रश्न आहे तो हा, की चर्चेचे कोणते विषय, या दाम्पत्याला प्रभागामध्ये समुदाय–निर्माण प्रक्रियेत त्यांची पृष्टी होण्यास आणि ते सक्रिय सदस्य बनण्यास मदतनीस ठरतील. एका अर्थी, प्रार्थना, आत्म्याचे अमरत्व, आणि परमेश्वराच्या प्रेमात स्थिरचीत्तता यासारखे विषय आहेत ज्याबद्दल तिला त्यांच्याशी चर्चा करण्याची आशा आहे, कारण त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचा पाया सतत प्रबलित केला पाहिजे. दुसऱ्या अर्थी, त्यांनी हळूहळू विकसित होत असलेल्या समुदायाची दृष्टी प्राप्त करणे आणि ते त्याच्या विकासासाठी कशाप्रकारे मौल्यवान योगदान देऊ शकतात हे जाणून घेणे महत्वाचे आहे. अब्दुल–बहांच्या अद्वितीय स्थानाबद्दल श्री. आणि श्रीमती सँचेझ यांच्यासोबत झालेल्या संभाषणादरम्यान, अलेहांद्राला तिच्या पुढील भेटीचा विषय काय असू शकतो हे हळूहळू लक्षात येते. “मानवजातीचे एकत्रिकरण या धर्मश्रद्धेच्या उद्देशाबद्दल त्यांच्या मनात बरीचशी स्पष्टता आहे,” ती विचार करते. “म्हणून, एकसंध समुदाय कसा तयार करायचा आणि टिकवून ठेवायचा या विषयावर प्रतिबिंबित केले पाहिजे.”

प्रभागातील तुलनेने लहान गटाच्या मित्रांनी सध्या कार्यरत असलेल्या क्रियाकलापांचे वर्णन करत, अलेहांद्रा तिच्या चौथ्या भेटीची सुरुवात करते. “जसजशी आमची संख्या वाढत जाते,” ती स्पष्ट करते, “तसतशी आपल्या सर्वांनी खांद्यावर घेतलेली सर्वात आव्हानात्मक जबाबदारी ही आपल्या शब्दांत, आपल्या विचारांत आणि आपल्या कृतींमध्ये अधिकाधिक एक होणे आवश्यक आहे. जर आपण सहमत असाल तर, आज आपण एकतेच्या विषयावर चर्चा करू शकतो.”

“आमच्या समुदायाच्या विकासासाठी एकता किती महत्त्वाची आहे हे मी समजू शकते,” श्रीमती सँचेझ प्रतिसाद देतात.

“कारण सरतेशेवटी बहाउल्लाह ह्यांचा संदेश एकतेचा होता ज्यामुळे सर्वप्रथम आमची अंत:करणे त्यांच्या शिकवणींकडे आकर्षित झाली,” श्री. सँचेझ म्हणतात.

“मी काही संकल्पना निवडल्या आहेत आणि प्रत्येक संकल्पनेवर चर्चेसाठी एक उद्धरण देखील सोबत आणले आहे,” अलेहांद्रा म्हणते. “जर आपणास आक्षेप नसेल तर, आम्ही एक एक करून त्याविषयी चर्चा करूया.”

अलेहांद्राच्या कल्पनांची यादी खाली नमूद केली आहे:

- खऱ्या अर्थाने समुदायाचे ऐक्य साधण्यासाठी, आपण प्रत्येकाने कुठल्याही प्रकारचे बेबनाव व भांडण तंट्यापासून दूर राहीले पाहिजे. बहाउल्लाह म्हणतात:

  **“आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व संघर्ष, द्वेष, वैमनस्य व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात**

**हानी पोहचवू शकत नाहीत. तुम्ही ईश्वरी शक्तीने आणि त्याच्या सर्वोच्चपरी सहाय्याने त्याचे पारिपत्य करा आणि परमेश्वर, जो एकत्व साधणारा, सर्वज्ञाता व सर्व बुद्धीमान आहे, त्याच्या पवित्र नामात मानवांची अंतःकरणे एकत्र गुंफण्याचा प्रयत्न करा."**[१२]

- समुदायातील प्रत्येक भाविकावर आपले प्रेम असले पाहिजे, असे प्रेम जे ईश्वराप्रती आपल्या प्रेमाचे प्रतिबिंब आहे. अब्दुल–बहा म्हणतात:

**"परिपूर्ण ऐक्याने रहा. कदापि रागवू नका. तुमची दृष्टी सृष्टीच्या जगाकडे न वळवता सत्याच्या साम्राज्याकडे वळवा. प्राणीमात्रांवर परमेश्वरासाठी प्रेम करा आणि त्यांच्या स्वतःसाठी नव्हे. जर परमेश्वरासाठी तुम्ही त्यांच्यावर प्रेम कराल, तर कदापि तुम्ही रागवणार किंवा बेचैन होणार नाही. मानवजात परिपूर्ण नाही. प्रत्येक मानवमात्रात अपूर्णता आहे आणि तुम्ही केवळ लोकांकडे पहाल तर तुम्ही नेहमी दुःखी बनाल. परंतु, जर तुम्ही परमेश्वराकडे पहाल तर तुम्ही त्यांच्यावर प्रेम कराल आणि त्यांच्यावर दयाळू असाल, कारण परमेश्वराचे जग हे पूर्णत्वाचे आणि पूर्णदयेचे जग आहे."**[१३]

- एकमेकांसाठी पूर्ण प्रेमाची जाणीव असतांना देखील आपल्यामध्ये तणाव उद्भवतील तर आपण लगेच अब्दुल–बहांचा हा उपदेश लक्षात ठेवला पाहिजे:

**"तुम्ही आपल्या अंतःकरणात नेहमी एकी व प्रेम यांचाच विचार करा, अशी मी तुम्हाला आज्ञा करतो. जेव्हा तुमच्या डोक्यात लढाईचा विचार येईल तेव्हा तुम्ही त्यापेक्षा अधिक उत्कटतेने शांततेचा विचार करून आलेल्या लढाईच्या विचारांना प्रतिबंध करा. एकमेकांबद्दलच्या द्वेषाच्या सर्व भावना उत्कट प्रेमाच्या विचारांनी मारून टाकल्या पाहिजेत. लढाईचे विचार सद्भाव, सुस्थिती, स्वस्थता व संतोषाचा सर्वथा विनाश घडवून आणतात.**

**"प्रेमाचे विचार आपल्यामध्ये मैत्री, शांतता, बंधुभाव व आनंद निर्माण करतात."**[१४]

- आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे सर्व प्रयत्न केल्यानंतर देखील जर आपल्या वासना आपल्यावर वर्चस्व गाजवीत असल्याचे आणि स्वतःला इतरांशी संघर्षात गुंतताना पाहू, तर आपण स्वतःला बहाउल्लाह ह्यांच्या या शब्दांची आठवण करून दिली पाहिजे:

**"तुमच्यामध्ये काही मतभेद निर्माण झाले तर तुमच्या सन्मुख मला उभा असलेला पहा आणि माझ्या पवित्र नामासाठी आणि माझ्या स्पष्ट आणि दैदिप्यमान धर्मकार्यावरील आपल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून एकमेकांच्या दोषांकडे दुर्लक्ष करा."**[१५]

- इतरांचे दोष दृष्टीआड करणे, त्यांच्या स्तुत्य गुणांवर लक्ष केंद्रीत करणे आणि निंदा करण्याचे पूर्णपणे वर्ज्य करणे, या विषयांची आध्यात्मिक शिस्त बेबनावाविरूद्ध अत्यंत प्रभावी उपाय आहे. जेव्हा आपण एकमेकांवर प्रेम करतो तेव्हा एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागे त्याची निंदा करण्याच्या प्रवृत्तीवर मात करणे

सोपे होते. आपण लक्षात ठेवले पाहिजे की, ज्यांच्यावर आपण प्रेम करतो त्यांचे दोष पाहण्यात आपले मन होत नाही आणि पाप झाकणाऱ्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहण्यात अवघड काहीच वाटत नाही. अब्दुल—बहा म्हणतात:

**"अपूर्णतेची दृष्टी अपूर्णताच पाहते. जी दृष्टी दोषांवर पांघरुण टाकते ती आत्म्याच्या निर्मात्याकडे पहाते. त्याने ज्यांना निर्माण केले, त्यांना तो प्रशिक्षित करतो व त्यांच्यासाठी पुरवितो, त्यांना पात्रता व जीवन, दृष्टी व श्रवणशक्ति प्रदान करतो, म्हणून त्याच्या ऐश्वर्याची ती चिन्हे आहेत. तुम्ही प्रत्येकावर प्रेम करावे व त्याच्याशी दयाळू असावे, गरीबांचा सांभाळ करावा, दुर्बलांचे रक्षण करावे, आजाऱ्यांचा उपचार करावा आणि अज्ञांनाना ज्ञान शिकवावे."**[१६]

बहाउल्लाह आम्हास उपदेश देतात:

**"हे माझ्या राजसिंहासनाच्या सोबत्या! अनिष्ट ते श्रवण करू नकोस आणि पाहू नकोस, स्वत:ची मानहानी होऊ देऊ नकोस, उसासे टाकू नकोस किंवा रुदन करू नकोस. तुला जे बोलले ते तू ऐकू शकणार नाही असे वाईट संभाषण करू नकोस, इतरांच्या दोषांची अतिशयोक्ती करू नकोस ज्यायोगे तुझे दोष मोठे दिसू नयेत, आणि कुणाच्याही मानहानीची इच्छा करू नकोस ज्यायोगे तुझ्या स्वत:चा मानभंग उघड होऊ नये. म्हणून तुझ्या आयुष्याचे दिवस, जे क्षणमात्रापेक्षाही अल्प आहेत, निष्कलंक मनाने, निर्विकल्प हृदयाने, पवित्र विचाराने आणि निर्मळ स्वभावाने व्यतीत कर, ज्यायोगे मुक्त व तृप्त होऊन तू या नश्वर देहाचा त्याग करू शकशील, रहस्यमय स्वर्गाकडे गमन करशील आणि अमर राज्यामध्ये चिरंतन निवास करू शकशील."**[१७]

आणि बहाउल्लाह आम्हास पुढे सांगतात:

**"हे अप्रवासी लोकांनो! मी परमेश्वराच्या स्तवनासाठी जी जिव्हा निर्मिली आहे, तिला निंदेने अपवित्र करू नका. अहंकाराच्या अग्नीने तुम्हास ग्रासले तर माझ्या प्राणीमात्रांचे दोष लक्षात घेण्याऐवजी आपले स्वत:चे दोष लक्षात आणा, कारण की प्रत्येकजण इतरांना जेवढा जाणतो, त्यापेक्षा आपणा स्वत:स तो अधिक चांगल्या प्रकारे जाणतो."**[१८]

- ऐक्य हे भांडण, तंटा व बेबनाव यांचा केवळ अभाव नव्हे, आणि प्रेम केवळ शब्दांनीच व्यक्त करायचे नसते. आपल्यामध्ये खरे ऐक्य असल्याचे आपण केवळ तेव्हाच जाहीर करू शकू, जेव्हा एकमेकांवरील आपले प्रेम समुदायाच्या सेवेमध्ये परिवर्तित होईल आणि जर आपली सेवाकार्ये, सहकार्य व पारस्परिक सहाय्य यांच्या भावनेने नियंत्रित करण्यात येतील. अब्दुल—बहा आम्हास आव्हान करतात:

**"तत्क्षणासाठीदेखील विश्राम घेऊ नकोस आणि क्षणभरदेखील चैन शोधू नकोस, उलटपक्षी अंत:करणापासून आणि आत्म्यापासून परिश्रम कर जेणेकरून तू मित्रांपैकी एकासही समर्पित सेवा प्रदान करावी आणि केवळ एका प्रकाशमान अंत:करणाला आनंद आणि प्रसन्नता आणावी. हे खरे औदार्य**

**आहे आणि त्याद्वारे अब्दुल—बहा यांचा ललाट कांतिमान झाला आहे. तू त्यामध्ये माझा भागीदार आणि सहयोगी राहा."**[१९]

आणि अब्दुल—बहा म्हणतात:

**"मानवजातीची सर्वोच्च गरज म्हणजे सहकार्य व परस्पर देवाणघेवाण होय. मानवांमधील बंधुभाव व एकात्मतेची बंधने जितकी अधिक बळकट असतील तर रचनात्मकतेची शक्ति आणि मानवी कृतीच्या सर्व पातळ्यांवरील उपलब्धी तितकीच महान राहील."**[२०]

- यशस्वी सामुदायिक कृतीसाठी अत्यंत महत्वाची गुरुकिल्ली म्हणजे सर्व विषयांवर प्रांजळ व प्रेमळ विचार विनिमय होय. विचार विनिमयाद्वारे आपण एका प्रकरणावर प्रत्येकजण ज्या वेगवेवेगळ्या मार्गांनी पाहतो, ते एकत्रितपणे मिसळतात आणि आपल्या सामुहिक कृतींमध्ये आपण अनुसरली पाहिजे अशी दिशा शोधून काढतो. विचार विनिमयातून आपण विचारांचे ऐक्य साध्य करतो आणि आपले विचार व दृष्टीकोन एकत्रित करून आपण आपल्या समुदायाच्या वाढीसाठी परिमाणकारक योजना निर्माण करतो. जे विचार विनिमय करतात त्यांचेविषयी अब्दुल—बहा म्हणतात:

**"त्यांना एकत्रित विचारविमर्श करण्यासाठी ज्या मूलभूत गोष्टींची आवश्यकता असते त्या आहेत —शुध्द हेतू, झळकणारे चैतन्य, ईश्वराशिवाय इतर गोष्टींपासून अलिप्तता, 'त्याच्या' स्वर्गीय सुगंधाची ओढ, 'त्याच्या' भक्तांप्रत विनम्रता, कठीणप्रसंगी संयम व सहनशीलता आणि 'त्याच्या' चरणाचे दास्यत्व! हे गुण आत्मसात करायला त्यांना कृपापूर्वक मदत मिळाली तर बहाच्या अदृष्य साम्राज्यातून त्यांच्या विजयाची ग्वाही मिळेल."**[२१]

- विचारांचे रुपांतर कृतीच्या एकत्वात झाले नाही तर विचारांचे एकत्व अपूर्ण राहते. एकत्वाने कृती करणे याचा असा अर्थ नाही की आपण सर्वांनी सारखीच गोष्ट करावी. या उलट, एकत्रित कृतीच्या योजनेचा आराखडा, समुदायाच्या प्रत्येक व्यक्तीच्या विभिन्न कौशल्याचा पुरेपूर उपयोग करतो. आपली सामर्थ्ये बहुगुणित होतात, आणि जरी आमची संख्या कमी असली तरीही, आम्ही जगातील अत्यंत मोठ्या सामर्थ्यशाली संघटना जे काही साध्य करण्यास अपात्र ठरतात, ते संपादन करण्यास योग्य होतो. अब्दुल—बहा म्हणतात:

**"जेव्हाही पवित्र आत्मे स्वर्गीय शक्तिंचा आधार घेत चैतन्याच्या अशा गुणांसाहित उभे ठाकतील आणि जत्थ्यामागून जत्थ्यामध्ये मेळ करून आगेकूच करतील तेव्हा त्या आत्म्यांपैकी प्रत्येकजण एक हजारासमान असेल आणि त्या सामर्थ्यशाली महासागराच्या उफाळत्या लाटा उच्चलोकीच्या सम्मीलनाच्या सैन्यदलासमान असतील."**[२२]

आपण वरील गोष्टी काळजीपूर्वक वाचल्यानंतर आणि आपल्या गटातील सहभागींसोबत सामग्रीच्या मुद्यावर चर्चा केल्यानंतर, एकमेकांना हे विषय सादर करण्याचा सराव करण्यास मदत करू इच्छित असाल,

जसे आपण मागील तीन घटकांत केले आहे.

१. खालील वाक्ये पूर्ण करा:

क. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील ——————— व संघर्ष, द्वेष, वैमनस्य व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

ख. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व ————————, द्वेष, वैमनस्य व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

ग. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व संघर्ष, द्वेष, वैमनस्य व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर ————————— ——————— ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

घ. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व संघर्ष, द्वेष, वैमनस्य व ————————— यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

च. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व संघर्ष, ———————, वैमनस्य व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

छ. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व संघर्ष, द्वेष, —————— व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या पवित्र धर्मकार्याला मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

ज. आजच्या दिव्य दिनी परमेश्वराच्या प्रिय भक्तांमध्ये आपापसातील कलह व संघर्ष, द्वेष, वैमनस्य व उदासीनता यासारख्या विघातक प्रवृत्तीपेक्षा इतर कोणत्याच गोष्टी ह्या ——————— ———————————— मोठ्या प्रमाणात हानी पोहचवू शकत नाहीत.

२. दुसऱ्या उद्धरणामध्ये अब्दुल—बहा आम्हास सांगतात की:

क. आपण परिपूर्ण ———————— रहावे.

ख. ———————— कदापि —————— नका.

ग. प्राणीमात्रांवर —————————— प्रेम करा आणि त्यांच्या स्वत:साठी नव्हे.

घ. जर —————————— तुम्ही त्यांच्यावर प्रेम कराल, तर कदापि तुम्ही —————— किंवा ————— होणार नाही.

च. मानवजात —————— नाही.

छ. तुम्ही केवळ —————— पहाल तर तुम्ही नेहमी ————— बनाल.

ज. जर तुम्ही —————————— पहाल तर तुम्ही —————————— ———— कराल आणि त्यांच्यावर ————— असाल.

३. तिसऱ्या उक्तीमध्ये अब्दुल–बहा आपणास सांगतात:

क. तुम्ही आपल्या अंत:करणात नेहमी ———— व ———— यांचाच विचार करा.

ख. जेव्हा तुमच्या डोक्यात लढाईचा विचार येईल तेव्हा तुम्ही त्यापेक्षा ———— ———— शांततेचा विचार करून ———— ——————— विचारांना ——————— करा.

ग. द्वेषाच्या सर्व भावना ———— ——————— विचारांनी —————— —————— पाहिजेत.

घ. लढाईचे विचार ————, ————, ———— व ————— सर्वथा विनाश घडवून आणतात.

च. ———— विचार आपल्यामध्ये ————, ————, ————, व ———— निर्माण करतात.

४. जेव्हा आपण आपल्या स्वत:मध्ये आणि समाजातील इतरांमध्ये मतभेद उद्भवतांना पहाल तेव्हा आपण काय केले पाहिजे? ————————————————————————————————

———————————————————————————————————————

५. आपल्या समाजात ऐक्यासाठी सहकार्य देण्यास आपणास मदतनीस ठरतील अशा आध्यात्मिक शिस्तीचे वर्णन करा. ————————————————————————————————————

———————————————————————————————————————

६. खालीलपैकी कोणते एकतेसाठी योगदान देतात?

—— इतरांच्या उणिवांकडे पाहणे

—— इतरांच्या दोषांकडे डोळे झाक करणे

—— एका मित्राकडे दुसऱ्या व्यक्तीच्या दोषांवर आलोचना (टीका) करणे

—— दुसऱ्या व्यक्तीला वाईट दाखविण्यासाठी एकादी गोष्ट वाढवून सांगणे किंवा बदलून टाकणे

—— इतरांच्या दोषांविषयी विचार करणे

७. आपण काही लोकांवर टीका का करतो जेव्हा ते चूक करतात पण ठीक त्याचसारखी गोष्ट करणाऱ्या इतरांवर टीका का करीत नाही? ——————————————————————

——————————————————————————————

८. जेथे लोक एकमेकांविषयी निंदा करतात त्या परिस्थितीत ऐक्य असणे शक्य आहे काय? आणि का नाही? ——————————————————————————

——————————————————————————————

९. कोणा एखाद्याविषयी खोटे सांगणे हे चुकीचे आहे. तथापि, एखादी गोष्ट त्याने किंवा तिने वस्तुत: केलेली आहे, त्यासंबंधी इतरांसमोर दोषपूर्ण टीका करणे ठिक आहे काय? ————————

——————————————————————————————

१०. इतरांविषयी गप्पा मारणे, निंदा करणे व टीका करणे यामध्ये काय फरक आहे? ——————

——————————————————————————————

११. गप्पा मारणे, निंदा करणे आणि सतत टीका करणे यांचा समुदायावर काय परिणाम होतो? ————

——————————————————————————————

१२. आपल्या जीवनामधून, ह्या सवयी आपण नाहीशा कशा करू शकू? —————————

——————————————————————————————

१३. ते लोक उपस्थित होते असे समजून त्यांच्या विषयी केवळ आपण बोललो तर काय होईल? ——

——————————————————————————————

१४. आपण लहान मुलांसमोर जर निंदा करू, तर त्यांच्यावर त्याचा काय परिणाम होईल? ————

——————————————————————————————

१५. टीका करण्याची आणि निंदा करण्याची प्रवृत्ती कोठून येते? ————————————

——————————————————————————————

१६. बहाउल्लाह आम्हास उपदेश देतात: "————————— अग्नीने तुम्हास ग्रासले तर माझ्या —————— —————— लक्षात ————————— आपले —————————— —————— लक्षात आणा, कारण की —————————————— ———————— ———————— जाणतो, —————————— आपणा —————————— तो अधिक —————————— —————————— जाणतो."

१७. प्रेम हे शब्दांनीच केवळ व्यक्त करायचे नाही, त्याशिवाय आणखी कशाची गरज आहे? —————— ——————————————————————————————————————————————————

१८. एकता आणि प्रेम या संबंधात, अब्दुल—बहा आम्हास आवाहन करतात: "————————————————— ——————— घेऊ नकोस आणि ———————————— —————— शोधू नकोस, उलटपक्षी —————————— आणि ———————————— परिश्रम कर जेणेकरून तू मित्रांपैकी एकासही —————— सेवा ————————— करावी आणि केवळ एका ————————— अंत:करणाला ————————— आणि ————————— आणावी."

१९. आणि अब्दुल—बहा पुढे म्हणतात: "मानवजातीची सर्वोच्च गरज म्हणजे ————————— व —————————— —————————— होय. मानवांमधील —————————— व ——————————— बंधने जितकी अधिक बळकट असतील तर ——————————— ———————— आणि —————————— कृतीच्या सर्व ——————————— उपलब्धी तितकीच ———————— राहील."

२०. यशस्वी समाज कृतीसाठी अत्यंत महत्वाची गुरुकिल्ली काय आहे? ——————————————— ——————————————————————————————————————————————————

२१. जे विचारविमर्श करतात त्यांच्याबद्दल अब्दुल—बहा म्हणतात: "त्यांना एकत्रित विचारविमर्श करण्यासाठी ज्या मूलभूत गोष्टींची आवश्यकता असते त्या आहेत ————————— ————————, —————————— ————————, —————————— इतर गोष्टींपासून ——————————, 'त्याच्या' —————————— —————————— ओढ, 'त्याच्या' —————————— ——————————, —————————— —————————— व —————————— आणि 'त्याच्या' —————————— ——————————! हे गुण आत्मसात करायला त्यांना कृपापूर्वक मदत मिळाली तर —————————— —————————— साम्राज्यातून त्यांच्या —————————— —————————— मिळेल."

२२. एकात्मतेने कार्य करण्याच्या सामर्थ्याबद्दल, अब्दुल–बहा आम्हास सांगतात: "जेव्हाही पवित्र आत्मे ―――――――――― ―――――――― आधार घेत ―――――――――― अशा ―――――――――― उभे ठाकतील आणि ―――――――――― ―――――――――― मेळ करून ―――――――――― करतील तेव्हा त्या ―――――――――― ―――――――――― एक ―――――――――― असेल आणि त्या ―――――――――――― महासागराच्या ―――――――――― लाटा ―――――――――― ―――――――――― ―――――――――― असतील."

## विभाग ९

श्री. आणि श्रीमती सँचेझ सोबतच्या तिच्या चौथ्या भेटीदरम्यान, जवळच्या हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांच्यासोबत राहायला आलेली नात बीॲट्रिसला भेटल्याचा अलेहांद्राला आनंद झाला. बीॲट्रिस एकतेच्या विषयाबद्दल अत्यंत उत्सुक आहे आणि ती चर्चेत उत्साहाने भाग घेते. त्यांचे संभाषण संपन्न होत असताना, श्रीमती सँचेझ प्रत्येकासाठी कॉफी आणि केक आणतात. यामुळे अलेहांद्राला बीॲट्रिसबद्दल थोडे अधिक जाणून घेण्याची संधी मिळते आणि ती दुसऱ्या दिवशी तिला प्रभागाच्या समुदाय–निर्माण प्रयत्नांबद्दल बोलण्यासाठी भेटण्याची व्यवस्था करते. "तिला अभ्यासक्रमांच्या मुख्य क्रमाचा अभ्यास करण्यात रुची असू शकते," अलेहांद्रा स्वत:शी विचार करते. "मी तिला पहिली काही पुस्तके स्थिर गतीने अध्ययन करण्यास मदत करू शकेल. त्यानंतर तिला लहान मुलांचा वर्ग सुरू करायचा असेल किंवा प्रभागाच्या युवाकिशोर गटात मला मदत करायची असेल. अशा परिस्थितीत, ती हळूहळू गटासाठी अधिक जबाबदारी घेऊ शकते कारण ती पुस्तक ५ पर्यंताच्या सर्व पुस्तकांचे अध्ययन करेल, जे तिला एक अनुप्रेरक म्हणून सेवा देण्यास सक्षम करेल." अलेहांद्राने युवकांसाठी आयोजित केलेल्या अनेक संमेलनात भाग घेतला आहे, ज्यामधील विचारविमर्शात काही विषयांवर लक्ष केंद्रित केले आहे, आणि या चर्चेमुळे अनेक युवक संस्थागत प्रक्रियेत सहभागी होत आहेत. ती ठरवते की ती दुसऱ्या दिवशी ती बीॲट्रिस सोबतच्या तिच्या संभाषणात या विचारांविषयी विचारविमर्श करेल. या संभाषणाची सुरुवात अशा प्रकारे होते:

> आम्हा सर्वांना हे जग एक चांगले ठिकाण बनेल अशी इच्छा आहे. आम्ही अशा भविष्याची वाट बघत आहोत, जेव्हा सार्वत्रिक शांतता प्रस्थापित होईल आणि पृथ्वीवरील मानवी कुटुंब सुसंवादाने जगेल. असे भविष्य प्राप्त करणे हे काल्पनिक स्वप्न नाही आणि जर आपल्यापैकी अधिकाधिक व्यक्ती जगाच्या उन्नतीसाठी हातभार लावण्यास प्रयत्नशील असेल तर ते अस्तित्वात आणले जाऊ शकते. आपल्या प्रत्येकाच्या अंत:करणात आपल्या समाजाची सेवा करण्याची इच्छा आहे. यासाठी जे आवश्यक आहे ते म्हणजे सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी नि:स्वार्थ सेवा करण्याची आपली क्षमता विकसित करणे.

> आपण ज्या सेवेच्या मार्गावर एकत्र चालतो त्या मार्गाची कल्पना करून आपण मानवतेच्या सेवेचा विचार करू शकतो. हा सेवामार्ग सर्वांसाठी खुला आहे. आम्ही प्रत्येकजण त्यात प्रवेश करण्याची

निवड करतो आणि आम्ही आमच्या स्वत:च्या वेगक्षमतेने प्रगती करतो. या सेवामार्गावर आपण एकटे चालत नसतो; आम्ही आमच्या मित्रांसोबत सेवाकार्य करतो, एकत्रपणे शिकतो आणि एकमेकांना सोबत देतो. आपण उचललेले प्रत्येक पाऊल आनंद आणि खात्री निर्माण करते आणि आपण करत असलेला प्रत्येक प्रयत्न दैवी संपुष्टी आणतो.

बीॲट्रिस जे ऐकत आहे ते तिला आवडते आणि या अल्प सादरीकरणानंतर एक चैतन्यशील संभाषणाचा प्रारंभ होतो. आणखी पुढे जाण्यापूर्वी, आपण येथे अल्पविराम देऊ या आणि या दोन नवीन मित्रांमधील परस्परसंवादाच्या स्वरूपाचे अवलोकण करू या. बीॲट्रिसला संस्थागत प्रक्रियेत सहभागी होण्यास आमंत्रित करण्यासाठी अलेहांद्राने भरीव संभाषणात गुंतण्याचा निर्णय घेतला आहे. संस्थेद्वारे संस्थागत अभ्यासक्रमांची एक मालिका देऊ केली जात आहे असे बीॲट्रिसला थेटपणे सांगणे आणि तिला त्यात सामील होण्यासाठी आमंत्रित करणे, असे तिच्यासाठी पुरेसे का नाही?

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

## विभाग १०

अलेहांद्रा आणि बीॲट्रिस यांच्यामधील संवाद सुमारे दोन तास सुरू असतो. खाली अनेक अतिरिक्त कल्पना दिलेल्या आहेत ज्या अलेहांद्रा तिच्या नवीन मित्रासह सामायिक करते. आम्हाला याची नक्कीच जाणीव आहे, की ती एक लांब अखंड सादरीकरण करणार नाही. या परिच्छेदांमध्ये वर्णन केलेल्या कल्पनांवर दोन तासांचा बराचसा अवधी एकत्रितपणे विचारमंथन करण्यात घालवला जातो:

आम्ही युवा आहोत, आमच्यात सामर्थ्य आहे आणि आमच्यात प्रचंड उत्साह आहे. आपण निश्‍चिंत स्वभावाचे आहोत असे लोक गृहीत धरतात. तथापि, वास्तविकता उलट आहे; आम्ही मानवतेच्या दुर्दशेबद्दल चिंतित आहोत आणि समाजात वास्तविक बदल घडवून आणू इच्छितो. आणि आम्ही आपल्या स्वत:च्या जीवनाचा विचार केला पाहिजे –शिक्षण, नौकरी–व्यवसाय, मित्र, कुटुंब. प्रत्येक वर्षी जसजसे आम्ही मोठे होत जातो तसतसे आम्ही स्वत:साठी अधिक जबाबदाऱ्या स्वीकारत असतो; आमच्या पालकांना आमच्याकडून खूप अपेक्षा असतात. कधी कधी जेव्हा मी माझ्या सर्व जबाबदाऱ्यांचा विचार करते तेव्हा मला भारावून गेल्यासारखे वाटते. मग मला मी कंठस्थ केलेल्या बहाई लेखनातील एक उद्धरण आठवते. "मनुष्यजीवनात त्याचा वसंतकाळ असतो आणि तो अद्‌भुत वैभवाने संपन्न असतो. किशोर वयाचा काळ हा शक्ती व जोम यामुळे वैशिष्ठ्यपूर्ण असतो आणि मानवी जीवनात सर्वात चांगला असा निवडक काळ असतो."

मी आपल्यासोबत जे सामायिक करू इच्छिते ते हे, की आमच्या सारख्या समुदायांमधील जगभरातील अनेक तरुणांना अशी जाणीव झाली आहे की त्यांची ऊर्जा दुहेरी उद्देशाने उपयोगात आणली जाऊ शकते: त्यांच्या स्वत:च्या बौद्धिक आणि आध्यात्मिक वाढीची जबाबदारी घेणे आणि समाज—परिवर्तनामध्ये योगदान देणे. आपल्या उद्देशाचे हे दोन पैलू एकमेकांशी जोडलेले आहेत. जसजसे आपण आपली स्वत:ची क्षमता विकसित करतो, तसतसे आपण इतरांची सेवा करण्यास अधिक सक्षम असतो आणि एकमेकांना मदत केल्याने, आपल्या व्यक्तिमत्वाची वाढ होते आणि आपल्यात अंतर्निहित असलेले गुण बळकट होतात.

इथेच मी आधी उल्लेख केलेल्या सेवाकार्याच्या मार्गाची कल्पना अस्तित्वात येते. सेवाकार्याच्या मार्गावर एकत्रित चालणे म्हणजे आपण आपल्या जीवनात भर घालतो असे नाही; कारण ते आपण करत असलेल्या प्रत्येक गोष्टीमध्ये अर्थ ओतते. समुदायाची सेवा आपल्याला आपल्या शिक्षणाचा उद्देश अधिक चांगल्याप्रकारे समजून घेण्यास, भविष्याबद्दल आपले विचार स्पष्ट करण्यास, आपल्या कुटुंबाच्या कल्याणासाठी योगदान देण्यासाठी आवश्यक असलेले गुण विकसित करण्यास मदत करते. त्यामुळे आपल्या मैत्रीसंबंधात वृद्धी होते. हे आपल्याला क्षुल्लक कामांवर आपली शक्ती वाया घालवण्यापासून रोखते.

आपल्या आध्यात्मिक आणि बौद्धिक वाढीचा विचार करत असताना, आपल्यावर प्रभाव टाकणाऱ्या अनेक शक्तींची आपल्याला जाणीव असली पाहिजे. त्यापैकी काही, जसे की ज्ञान, न्याय आणि प्रेमाच्या शक्ती, ज्या आपल्यास योग्य दिशेकडे वळवतात आणि आपण त्यांच्याशी सुसंगत होणे शिकले पाहिजे. इतर, जसे की भौतिकवाद आणि स्वकेंद्रिततेच्या शक्ती, ज्या आपल्या जीवनात प्रतिकूल परिस्थिती निर्माण करतात, त्यांचा आपण प्रतिकार केला पाहिजे. आपण उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे आणि विश्वास ठेवला पाहिजे की आपल्या प्रयत्नांना दैवी संपुष्टी प्राप्त होईल.

आणि समाजाच्या परिवर्तनासाठी —हिंसाचार, दारिद्र्य आणि दु:खपूर्ण जगाला शांती, समृद्धी आणि सौहार्दाच्या जगात बदलण्यासाठी आपल्या योगदानाबद्दल विचार करत असताना— आपण भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती हे दोन्ही विचारात घेतले पाहिजे. जर आपण आध्यात्मिक प्रगती केली नाही तर सर्व लोकांची भौतिक प्रगती होऊ शकणार नाही. या दोन्ही बाबी जर एकत्रित आल्या तरच जगाची उन्नती होईल. मी कंठस्थ केलेले आणखी एक उद्धरण असे आहे: "भौतिक सभ्यता ही दीपसमान आहे, आणि आध्यात्मिक सभ्यता हा त्या दिपातील प्रकाश आहे. जर भौतिक आणि आध्यात्मिक सभ्यता एकरूप झाली, तर आपल्याकडे प्रकाश आणि दीप एकत्र असतील आणि त्याचा परिणाम परिपूर्ण असेल."

आम्ही सेवाकार्याच्या मार्गावर एकत्रितपणे चालत असताना, आम्ही व्यक्तींच्या गटांसह, विशेषत: लहान मुले आणि युवाकिशोरांसोबत कार्य करण्यास शिकतो, त्यांना ज्ञान, कौशल्ये आणि आध्यात्मिक गुण प्राप्त करण्यास मदत करतो. आपण आपल्या समुदायांच्या ऐक्याकडे लक्ष देण्यास देखील शिकतो.

समुदायाच्या प्रगतीत योगदान देऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती, कुटुंबे आणि संस्थांनी सहकार्य केले पाहिजे. त्यांनी एक सामायिक दृष्टी आणि उद्देश तयार केला पाहिजे आणि संघर्षाच्या मार्गाचा त्याग केला पाहिजे.

तेव्हा, तारुण्यात आपण इतरांशी सुसंवादी संभाषण साधण्याच्या सवयी विकसित करणे महत्त्वाचे आहे. आपण एकमेकाचे मित्र असणे आवश्यक आहे: आपण करत असलेल्या सेवाकार्यात एकमेकांची साथ देणे, एकमेकांचे योगदान स्वीकारणे, एकमेकांना प्रोत्साहित करणे आणि पाठिंबा देणे, एकमेकांचे सामर्थ्य ओळखणे, एकमेकांसोबत मिळणे आणि उपयुक्त सल्ला देणे, आणि एकमेकांच्या गुणवत्तेचा आनंद घेणे. सेवाकार्याच्या मार्गावर चालत असताना, आपण सेवाकार्ये केली पाहिजे, आपल्या सेवाकार्यांवर चिंतन केले पाहिजे, विचारविमर्श केला पाहिजे आणि एकत्र येऊन अध्ययन केले पाहिजे.

गेल्या काही दशकांमध्ये, बहाई समुदायाने जगातील व्यावहारिकदृष्ट्या प्रत्येक देशात एक विशेष प्रकारची प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात यश मिळवले आहे. या 'संस्था', ज्या नावाने आपण त्यांना ओळखतो, समुदायाची सेवा करण्यासाठी आपल्या क्षमतांना बळ देणारे अभ्यासक्रम सामायिक करतात. या अभ्यासक्रमांचे अध्ययन करून, आम्हाला आध्यात्मिक अंतर्दृष्टी आणि एकत्रितपणे सेवेच्या मार्गावर पुढे जाण्यासाठी आवश्यक असलेली व्यावहारिक कौशल्ये प्राप्त होतात. जसजसे आपण अध्ययनाद्वारे पुढे जात असतो, तसतसे सेवेची जटिल कृती करण्याच्या आमच्या क्षमतेत वृद्धी होते. या सेवाकार्यात आपल्या सोबत जे आपल्यापेक्षा जास्त अनुभवी आहेत अशा मित्रांची मदत मिळते, आणि कालांतराने, आम्ही स्वाभाविकपणे कमी अनुभव असलेल्या मित्रांना मदत करतो. सुरुवातीपासूनच, आपण सर्व वैयक्तिक आणि सामाजिक परिवर्तनाचे नायक आहोत, आणि आपण स्वत: शिकण्याची व समुदायाच्या सेवेची जबाबदारी उत्सुकतेने स्वीकारतो.

"एक नायक बनणे" म्हणजे विचारपूर्वक कार्य करण्याची, आपल्या प्रयत्नांमध्ये चिकाटी असण्याची आणि प्रत्येक टप्प्यावर ज्ञान प्राप्त करण्याची आणि ते लागू करण्याची इच्छा असणे. "नायक" हा केवळ फायद्यांचा निष्क्रीय स्वीकारक नसून तो होणाऱ्या प्रगतीमध्ये सक्रिय योगदान देणारा असतो. नायक होण्यासाठी व्यक्तीने सर्जनशील असणे आणि शिस्तबद्धतेणे पुढाकार घेणे शिकले पाहिजे. संस्थागत अभ्यासक्रम आम्हाला समुदाय–निर्माण प्रक्रियेचे नायक बनण्याची आमची क्षमता वाढवण्यास मदत करतात.

वरील परिच्छेदातील कल्पनांवर विचार करण्यासाठी आपण थोडा वेळ घेतला पाहिजे. विभागाच्या सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे, अलेहांद्रा केवळ एकामागून एक कल्पना मांडणार नाही तर बीॲट्रिसला त्यांच्याबद्दल विचार करण्याची आणि चर्चेत योगदान देण्याची पुरेशी संधी असेल याची पण खात्री करेल. आपण यावर विचार करू शकता –आपणास आपल्या गटात प्रत्येक परिच्छेदावर चर्चा करण्याची संधी मिळाल्यानंतर आणि स्वत: कल्पना चांगल्या प्रकारे व्यक्त करायला शिकल्यानंतर– की हे संभाषण इतके

विकसित झाले आहे की नाही, जेणेकरून अलेहांद्राला बीॲट्रिससोबत रुही संस्थेच्या काही अभ्यासक्रमांबद्दल माहिती सामायिक करण्यात आणि रुही पुस्तक १ च्या अभ्यासात सहभागी होण्यासाठी बीॲट्रिसला आमंत्रित करण्यात आत्मविश्वास वाटेल. जर आपण तिच्या जागी असता तर आपण काय म्हणाल ते खाली दिलेल्या जागेत लिहू शकता का? आपण पुस्तक १ आणि २ चे वर्णन कसे कराल आणि त्या पुस्तकांत दिलेल्या सेवाकार्यांबद्दल माहिती कशाप्रकारे सामायिक कराल? त्यानंतरच्या पुस्तकांमध्ये नमूद केलेल्या सेवेच्या कृतींचा संक्षिप्त संदर्भ —विशेषत: लहान मुलांच्या आध्यात्मिक शिक्षणाच्या वर्गात शिकवण्यासाठी आणि युवाकिशोर गटाला अनुप्रेरक म्हणून मार्गदर्शन करण्यासाठी— नि:संशयपणे बीॲट्रिसला भविष्यात ती कोणती सेवा देऊ शकते याची दृष्टी मिळविण्यात मदत करेल. आपल्या गटाचे सहशिक्षक आपणास या दोन सेवा कृत्यांवर काही वाक्ये लिहिण्यास मदत करू शकतात, ज्याचा बीॲट्रिसला पुस्तक १ चे अध्ययन करण्यास आमंत्रित करण्यासाठी अलेहांद्रा वापर करू शकेल. ——————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

## विभाग ११

अलेहांद्राने श्री. आणि श्रीमती सँचेझ ह्यांच्या घरी पुढली भेट देण्यापूर्वी दोन आठवडे निघून जातात. त्या वेळात, बीॲट्रिस एका सघन मोहिमेत भाग घेते होते आणि पुस्तक १ चे पहिले दोन घटक पूर्ण करते. ती आता तिसऱ्या घटकाचे अध्ययन पाच सहभागींच्या गटासोबत करत आहे, जो आठवड्यातून दोनदा त्या प्रभागात भेटतो. अलेहांद्राला वाटते की प्रार्थनेच्या विषयावर सँचेझ कुटुंबाशी संभाषण करण्याची ही योग्य वेळ आहे आणि ती बीॲट्रिसला मदत करण्यासाठी विचारते. आपण स्वत: पुस्तक १ च्या दुसऱ्या घटकाचे अध्ययन केले आहे, त्यामुळे आपल्यासाठी अलेहांद्रा आणि बीॲट्रिस यांनी त्यांच्या भेटीदरम्यान विचारात घेतलेली सामग्री येथे सारांशित करण्याची आवश्यकता नाही. घटकाचे पुनरावलोकन केल्यानंतर, या विषयावरील चर्चेत आपण मुख्य मुद्दे तयार करण्यास सक्षम असाल. आपल्या कल्पना लिहिण्यासाठी खाली जागा दिली आहे.

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

__________________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

## विभाग १२

अलेहांद्राच्या सँचेझ कुटुंबाला भेटी पुढील काही आठवडे सुरु राहतील आणि प्रार्थनेच्या महत्त्वावर त्यांच्या विचारमंथनातून नैसर्गिकरित्या प्रवाहित असलेल्या अनेक विषयांवर चर्चा करण्याची संधी त्यांना मिळेल —आत्म्याचे जीवन, आध्यात्मिक गुणांचा विकास, परमेश्वराने प्रकटीत केलेल्या नियमांचे आणि कायद्यांचे पालन करणे आणि त्यांच्या परमेश्वराच्या प्रेमात खंबीर असणे. एका प्रसंगी, ते बहाई प्रशासकीय कार्यव्यवस्थेच्या संस्थांबद्दल, विशेषत: स्थानिक आणि राष्ट्रीय आध्यात्मिक संसदांविषयी थोडेसे संभाषण करतात. त्यानंतरच्या प्रत्येक भेटीदरम्यान सामायिक केलेल्या सामग्रीचा विचार करण्याची आम्हाला आवश्यकता नाही. तथापि, असे दोन प्रश्न आहेत जे सहसा संभाषण करत असलेल्या सहभागींमध्ये उद्‌भवतात ज्याची आपण कल्पना करत आहोत. पहिली बाब आहे समुदायाने आयोजित केलेल्या सभांच्या स्वरूपाविषयी आणि दुसरी आहे आर्थिक संसाधनांविषयी. आम्ही या विभागात सभांचा विषय लक्षात घेऊ, विशेषत: एकोणीस दिवसीय सहभोज सभा, आणि पुढील विभागात आर्थिक संसाधनांविषयी.

यास्तव, खालील मुद्दे एकोणीस दिवसीय सहभोज सभेच्या विषयावर संभाषणासाठी आधार बनू शकतात:

- बहाई समुदायात विविध उद्देशांसाठी सभेंचे आयोजन केले जाते —प्रार्थना करण्यास, अध्ययन करण्यास, विशेष प्रसंग साजरे करण्यास, सामुदायिक घडामोडींवर व समाज सेवा कार्याविषयी विचारविमर्श करण्यास, कृती योजनांवर चर्चा करण्यास. बहाउल्लाह खालीलप्रमाणे वचन देतात:

  **“माझ्या जीवनाची व माझ्या धर्मकार्याची शपथ! ज्या कोणत्या निवासात परमेश्वराचे मित्र प्रवेश करतील आणि जेथून त्यांची पुकार उन्नत होईल, जेव्हा ते परमस्वामीचे स्तवन व वैभव गुणगान करतात, त्याभोवती खऱ्या भाविकांचे व सर्व अनुग्रहित देवदूतांचे आत्मे परिभ्रमण करतील.”**[२३]

- मित्रांच्या साहचर्यात परमेश्वराचे वचन श्रावण केल्याने अंत:करणाला आनंद मिळतो आणि ऐक्याचे बंधन दृढ होतात. बहाउल्लाह आम्हास उपदेश करतात:

  **“ज्या कोणत्या देशात मित्र राहतात, त्यांच्यावर निर्धारित आहे की त्यांनी बैठकीत एकत्र जमावे आणि तेथे बुद्धिमत्तेने व वाक्पटूतेने बोलावे आणि परमेश्वराची पदे वाचावीत, कारण ती परमेश्वराची दिव्य वचने आहेत जी प्रेमाचा अग्नी चेतवितात व त्यास ज्वलंत करतात.”**[२४]

  अब्दुल—बहा लिहितात:

  **“सभा आयोजित करा आणि स्वर्गीय शिकवणींचे वाचन व सुस्वर गुणगान करा, जेणेकरून तो देश सत्याच्या प्रकाशाने प्रज्ज्वलित व्हावा आणि ती भूमी पवित्र चैतन्याच्या संपुष्टीने, खरोखर**

**अगदी एका रमणीय स्वर्गाप्रमाणे व्हावी, कारण हे युग सर्व–गौरवशाली परमेश्वराचे धर्मचक्र होय आणि मानवतेच्या जगाच्या एकात्मतेचे मधुर स्वर पूर्व व पश्चिमेच्या सर्व कानापर्यंत पोहोचत आहेत."**[२५]

- सर्व बहाई सभांपैकी एकोणीस दिवसीय सहभोज सभा ही विशेष उल्लेखास पात्र आहे. बहाई पंचांगात प्रत्येक एकोणीस दिवसांच्या एकोणीस महिन्यांचा समावेश आहे, आणि, प्रत्येक परिसरात, बहाई श्रद्धावंत या सभेसाठी महिन्यातून एकदा एकत्र जमतात, जे बहाउल्लाह ह्यांनी स्वत: निर्धारित केले आहे:

**"सत्यत:, दर महिन्यातून एकदा सहभोज देण्याचे तुम्हाला ठरवून दिले आहे, मग तो केवळ पाण्याच्या स्वरुपात का असेना; कारण हृदये एकत्र बांधण्याचा परमेश्वराचा उद्देश आहे, अर्थातच पृथ्वीवरील व स्वर्गातील दोन्हींच्या साधनांच्या मार्गे."**[२६]

- एकोणीस दिवसीय सहभोज सभेचे तीन भाग आहेत. प्रथम भाग भक्तिभावाचा असून त्या अवधीत प्रार्थना सुस्वर म्हटल्या जातात आणि पवित्र लिखाणांतील उताऱ्यांचे वाचन करण्यात येते. दुसरा आहे प्रशासकीय भाग, ज्या अवधीत मित्र समुदायाच्या कामकाजावर विचारविनिमय करतात. तिसरा भाग आहे भौतिक भाग.

- अब्दुल–बहांच्या खालील शब्दांमधून एकोणीस दिवसीय सहभोज सभेच्या भक्तिभावाच्या भागाचे महत्व आपणास ओझरते समजेल:

**"हे सनातन दैवी सौंदर्याच्या निष्ठांवत सेवकांनो! प्रत्येक कालचक्रात व धर्मयुगात, सहभोज सभेला अनुग्रहित व प्रिय ठरविण्यात आले आणि परमेश्वराच्या प्रेमीजनांसाठी भोजनाची व्यवस्था करणे एक प्रशंसनीय कृति समजण्यात आली आहे. विशेष करून आज याचे महत्व आहे कारण या अतुलनीय धर्मचक्रात सर्वाधिक औदार्याच्या युगात हे सर्वत्र प्रशंसित आहे, आणि वस्तुत: याची गणना खरोखरच अशा वैशिष्ट्यपूर्ण समारंभात केली आहे जे परमेश्वराची आराधना व गुणगौरव करण्यासाठी घेण्यात येतात. येथे पवित्र पदे, स्वर्गीय गीते व स्तवने सुस्वर म्हणण्यात येतात, हृदय अनुप्राणित केले जाते आणि ईश्वराच्या दिशेने उन्मुख होते."**[२७]

- सहभोज सभेच्या प्रशासकीय भागाच्या अवकाशात एकत्रित जमलेले मित्र जवळच्या तसेच दूरच्या बहाई समाजातील कार्याचे अहवाल ऐकतात, त्यांच्या स्वत:च्या समुदायातील धर्मश्रद्धेच्या कामकाजावर आणि समाजाच्या कल्याणासाठी त्यांच्या योगदानाबद्दल विचारविमर्श करतात, विश्व न्याय मंदिराकडून मिळालेल्या मार्गदर्शनाने परिचित होतात, त्यांच्या योजनांच्या प्रगतीवर चिंतन करतात, आणि धर्मश्रद्धेच्या प्रशासकीय संस्थांना प्रस्ताव देतात. एकोणीस दिवसीय सहभोज सभेत झालेला विचारविमर्श अत्यंत महत्त्वाचा असतो, कारण, या माध्यमातून, प्रत्येक व्यक्ती विश्वव्यापी बहाई समुदायाच्या घडामोडींमध्ये सहभागी होण्यास सक्षम होतो.

- सहभोज सभेचा सामाजिक भाग हा मैत्रीभाव व आदरातिथ्यशीलताचा वेळ असतो. वाद्य वाजविण्यात येऊ शकतात, स्फूर्तिदायक भाषणे देण्यात यावीत, लहान मुलांकडून विविध कलाप्रस्तुती करण्यात याव्या. थोडक्यात, संस्कृतीच्या लक्षपूर्वक निवडलेल्या अभिव्यक्ति, ज्या एकाच वेळी सन्माननीय आणि आनंददायक असतात, त्यांचा उपयोग सहभोज सभेचा हा भाग समृद्ध करण्यासाठी वापरला जाऊ शकतो.

- एकोणीस दिवसीय सहभोज सभा धर्मश्रद्धेच्या प्रशासकीय व्यवस्थेचे महत्वपूर्ण अभिलक्षण आहे. ते समाज जीवनातील भक्तिभावात्मक, प्रशासकीय व सामाजिक तत्त्वांना एकत्र आणते. ह्या सर्व बाबींवर समानतेने भर दिला पाहिजे, कारण सहभोज सभेचे यश ह्या तीन मूळ तत्त्वांमधील व्यवस्थित संतुलनावर अवलंबून असते. विश्व न्याय मंदिर त्यांच्या ऑगस्ट १९८९ मध्ये लिहिलेल्या संदेशात नमूद करतात:

  **"बहाउल्लाह यांची विश्व व्यवस्था मानव समाजातील सर्व घटकांना व्यापून टाकते; जीवनाच्या आध्यात्मिक, प्रशासकीय व सामाजिक प्रक्रियांना एकात्म करते; आणि एका नवीन सभ्यतेच्या रचनेसाठी त्यातील विविधांगी स्वरुपांमधील मानवी अभिव्यक्तीची एकमेकांत मिळवणी करते. एकोणीस दिवसीय सहभोज सभा समाजाच्या प्रत्यक्ष पायावर सर्वभूत तत्त्वांना अंगोपांग व्यापून टाकते. खेडे, गांव, शहर यामध्ये कामकाज करणारी ही अशी संस्था आहे जिचे सर्व बहाचे लोक सदस्य असतात. तिचा हेतु ऐक्य उन्नत करणे, प्रगतीची खात्री देणे व आनंद जोपासणे असा आहे."**[२८]

- एकोणीस दिवसीय सहभोज सभे इतका महत्वाचा प्रसंग घाईने एकत्र जुळविता येऊ शकत नाही. प्रार्थना व चिंतनाद्वारे प्रत्येक भाविकाने सहभोज सभेसाठी त्याने किंवा तिने स्वत: आध्यात्मिकरीत्या तयारी केली पाहिजे आणि प्रत्येकाने त्या प्रसंगाच्या अवधीत, भक्तिभावात्मक भागातील वाचन किंवा सुस्वर म्हणण्यात येणाऱ्या परिच्छेदांचे केवळ श्रवण असो; अहवाल देणे, मार्गदर्शन घेणे किंवा सूचना करणे; तसेच यजमान म्हणून भूमिका पार पाडणे किंवा आनंदाने व तेजस्वीपणे आदरातिथ्यात सहभागी होणाऱ्यांपैकी मी केवळ एक म्हणून होणे असो, आपण अंत:करण व मनाने भाग घेतला पाहिजे. एकोणीस दिवसीय सहभोज सभेविषयीच्या त्याच पत्रात, विश्व न्याय मंदिर असे प्रस्तुत करतात:

  **"सहभोज सभेच्या तयारीतील महत्वाच्या अंगोपांगात पठनासाठी योग्य वेच्यांची निवड करणे, चांगल्या वाचकांना आगाऊ ठरवून देणे आणि प्रस्तुतिकरण व श्रवण या दोहोत शालीनतेची जाणीव असणे यांचा समावेश आहे. ज्या वातावरणात सहभोज सभा घ्यावयाची आहे, मग ते चार भिंतीत असो किंवा उघड्यावर असो, त्यावर लक्ष देण्याने अनुभवावर चांगला प्रभाव पडतो. स्वच्छता, जागेची व्यावहारिक व सजावटीच्या मार्गांनी व्यवस्था करणे या सर्वांची महत्वपूर्ण भूमिका असते. वक्तशीरपणा देखील चांगल्या तयारीचा निकष आहे.**

  **"फार मोठ्या प्रमाणात सहभोज सभेचे यश तयारीची गुणवत्ता व व्यक्तीचा सहभाग यांवर अवलंबून आहे. परमप्रिय स्वामी अब्दुल–बहा पुढीलप्रमाणे उपदेश देतात: 'एकोणीस दिवसीय सभांसाठी तुम्ही फार मोठे लक्ष द्या, ज्यायोगे याप्रसंगी दिव्य स्वामींचे प्रियतम आणि दयाघनाच्या**

**निर्मित–सेविका, दैवी राज्याकडे आपले चेहरे वळवतील, सुस्वर गुणगान करतील, परमेश्वराच्या मदतीसाठी याचना करतील, एकमेकांसाठी आनंदाने प्रेमासक्त होतील आणि पवित्र व मांगल्य यांमध्ये वाढत जातील, तसेच ते परमेश्वराच्या भितीने वासना व स्वार्थाचा प्रतिरोध करीत वृद्धिंगत होतील. याप्रमाणे ते ह्या पंचभूतांच्या जगापासून स्वत:ला अलिप्त करतील आणि स्वत: चैतन्याच्या प्रेमपूर्ण उत्साहामध्ये तल्लीन होतील.'"**[२९]

नेहमीप्रमाणे आपण वरील विचार अनेक वेळा वाचावेत व आपल्या गटात त्यांच्यावर चर्चा करावी ज्यायोगे आपण आपल्या स्वत:च्या शब्दांत ते सहजपणे सामायिक करणे शिकाल. खालील सराव आपणास एकोणीस दिवसीय सभेच्या महत्तेबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्यास मदतनीस ठरेल.

१. ज्या प्रत्येक निवासस्थानामध्ये आपण परमेश्वराची स्तुती आणि गौरव करण्यासाठी एकत्र येतो, त्यात कोणत्या विशेष गुणांचे दर्शन घडविते ह्याची बहाउल्लाह आम्हास खात्री देतात?
———————————————————————————
———————————————————————————

२. वरील दुसऱ्या उद्धरणात, बहाउल्लाह सांगतात, की जेव्हा आपण सभांमध्ये एकत्र येतो तेव्हा आपण ————— व ————— बोलावे आणि ——————— ——— वाचावीत, कारण ती ——————— ———— ———— आहेत जी ———— ———— ——————— व त्यास —————— करतात.

३. वरील तिसऱ्या उद्धरणात, अब्दुल–बहा आम्हास सभा आयोजित करण्याचा आणि स्वर्गीय शिकवणींचे पठण आणि जप करण्याचा सल्ला देतात, जेणेकरून
– आपण ज्या देशात राहतो तो देश ———— ———— ————— —————.
– ती भूमी ज्यात आपण राहतो ती पवित्र —————— ——————, —————— अगदी एका —————— ——————— व्हावी.

४. बहाई पंचागात किती महिने आहेत? ——————————————————

५. प्रत्येक महिन्यात किती दिवस आहेत? —————————————————

६. महिन्यात एकदा बहाई कोणती विशेष सभा घेतात? ——————————————

७. एकोणीस दिवसीय सहभोज सभेचे कोणते तीन भाग आहेत? ——————————

८. काय एकोणीस दिवसीय सहभोज सभेचे तीन भाग कोणत्याही क्रमाने घेण्यात येतात? ———————

९. सहभोज सभेच्या भक्तिभावार्थ भागाचा काय हेतू आहे? ————————————————————————

——————————————————————————————————————————————————

१०. सहभोज सभेच्या प्रशासकीय भागाचा काय हेतू आहे? ————————————————————————

——————————————————————————————————————————————————

११. सहभोज सभेच्या सामाजिक भागाचा काय हेतू आहे? —————————————————————————

——————————————————————————————————————————————————

१२. सहभोज सभेच्या प्रशासकीय भागाच्या अवधीत खालीलपैकी कोणत्या मुद्यांवर चर्चा करणे योग्य असेल?

—— सामुदायिक उपक्रमांच्या आर्थिक आवश्यकता

—— राष्ट्रीय फुटबॉल टीमची गोल संख्या

—— समुदायातील दोन सदस्यांमधील मतभेदाचे निराकरण कशाप्रकारे करणे

—— समुदायात आयोजित लहान मुलांच्या बहाई वर्गांची प्रगती

—— आठवड्याच्या सुरवातीस, समुदायातील एक सदस्य दैवी लिखाणांतील एका उद्धरणाचा अभ्यास करीत होता त्याच्या अर्थावर विचार करणे

—— समुदायात आयोजित युवाकिशोर गटाच्या कार्यक्रमाची उत्स्फूर्तता

—— तरुणांसाठी स्थानिक रोजगाराच्या संधी

—— अशा युवाकिशोर गटांना ज्यांचे सेवा प्रकल्प गुंतागुंतीचे झाले आहेत, समुदाय प्रदान करू शकेल असे समर्थन

—— संस्थेने प्रोत्साहित केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये भाग घेत असलेल्या लहान मुलांच्या आणि युवाकिशोरांच्या पालकांना भेट देणे

—— समुदायाच्या भक्तीपूर्वक चारित्र्याचे बळकटीकरण

—— दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांचे वेळापत्रक

—— अध्ययन वर्गांमध्ये आनंदी आणि शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्याबाबत मिळालेली अंतर्दृष्टी

—— आगामी पवित्र दिवसाचा उत्सव साजरा करणे

—— समुदाय—निर्माण प्रक्रियेतून उद्‌भवलेल्या सामाजिक कृतीचे उपक्रम

१३. आपल्या गटासोबत खालील प्रश्नावर चर्चा करा: सहभोज सभेतील तीन भागांमध्ये समतोल असणे महत्वाचे का आहे?

१४. आता खालील दोन प्रश्नांवर चर्चा करा.

क. आपण जर सहभोज सभेचे यजमान असाल तर त्यासाठी आपण कशी तयारी कराल?
ख. आपण सहभोज सभेत जर केवळ सहभाग घेत असाल तर त्यासाठी आपण कशी तयारी कराल?

## विभाग १३

धर्मश्रद्धेविषयीच्या संभाषणांमध्ये सहसा उद्‌भवणारा दुसरा प्रश्न म्हणजे बहाई समुदाय आपल्या आर्थिक गरजा कशाप्रकारे पूर्ण करतो. येथे काही मुद्दे दिले आहेत जे आपणास अशा प्रश्नांना प्रतिसाद देण्यास मदत करू शकतात:

- बहाई समुदाय आपल्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी वापरत असलेले साधन म्हणजे बहाई कोष. हे विविध स्तरांवर धर्मश्रद्धेच्या संस्थांद्वारे प्रशासित केले जाते: स्थानिक, राष्ट्रीय, भूखंडीय आणि आंतरराष्ट्रीय. बहाई श्रद्धावंतांची अशी श्रद्धा आहे की त्यांनी त्यांच्या धर्मश्रद्धेला चालना देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा खर्च त्यांनी स्वत: उचलला पाहिजे आणि म्हणून बहाई कोषामध्ये केवळ बहाई सदस्यांकडूनच योगदान स्वीकारले जाते.

- कोषात योगदान देणे हे स्वयंस्फूर्त कार्य आहे. ह्या अर्थाने ते गोपनीय आहे की ही माहिती व्यक्ति व धर्मश्रद्धेच्या संस्था यांच्यामध्ये गुप्त असते; योगदानकर्त्यांची नावे आणि त्यांनी दिलेली रक्कम जाहीर करण्यात येत नाही. समुदायातील भाविकांवर योगदान करण्यासाठी कोणताही दबाव आणला जात नाही. संस्था समुदायाला सामान्यपणे आवाहन करतात, कोषाच्या महत्वाविषयी आठवण करून देतात आणि त्याच्या आवश्यकतेविषयी माहिती देतात. मधुन मधुन समुदाय स्वत:साठी योगदानाचे लक्ष्य ठरवून घेईल, परंतु व्यक्तींसाठी रकमा कधीच निश्चित करण्यात येत नाहीत आणि पैशासाठी याचना करण्यात येत नाही. कोषाच्या तत्त्वांविषयी त्यांच्या स्वत:च्या समजूतीनुसार, भाविकांनी किती योगदान द्यावे, हे त्यांच्या स्वत:च्या निर्णयावर सोडून देण्यात येते.

- आम्ही जी सभ्यता उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत, ती भौतिक व आध्यात्मिक या दोन्ही बाबतीत समृद्ध असते. संपत्ती केवळ तेव्हाच स्वीकारार्ह असेल जर काही विशिष्ट अटी पूर्ण करण्यात येतील. आपण ती प्रामाणिक कामातून संपादन केली पाहिजे. आपण ती मानवतेच्या हितासाठी खर्चिली पाहिजे. आणि संपूर्ण समाज उन्नत करण्यात आला पाहिजे; फार थोडे लोक अतोनात धनवान असणे व याउलट बहुसंख्य लोक जीवनाच्या मुलभूत गरजांविषयी अभावग्रस्त असणे स्वीकारार्ह नाही. बहाउल्लाह म्हणतात:

**“सर्वोतम माणसे ती आहेत जी स्वत:च्या व्यवसायाने आपली उपजिविका कमावतात आणि आपल्या स्वत:वर व आपल्या बांधवांवर सर्व विश्वाचा स्वामी, परमेश्वराच्या प्रेमासाठी खर्च करतात.”**[३०]

**“...तुम्ही उत्कृष्ट व अद्‌भूत फळे द्यावेत, ज्यामुळे तुम्ही आणि इतरांनी, त्यांच्यापासून लाभ घ्यावा. अशा प्रकारे व्यवसाय धंद्यात व कला कौशल्यात गुंतवून घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, कारण यामध्ये संपत्तीचे रहस्य आहे, हे सुज्ञ मानवांनो!”**[३१]

आणि अब्दुल—बहा स्पष्ट करतात:

**“संपत्ती सर्वात प्रशंसनीय आहे, जर संपूर्ण जनसंख्या श्रीमंत असेल. तथापि, जर काही लोकांकडे अमर्यादित संपत्ती असेल आणि समाजातील इतर लोक दारिद्र्यात असतील, तर त्या संपत्तीपासून समाजातील इतर कुणाचा काहीच फायदा किंवा हित होणार नाही आणि अशी संपत्ती तिच्या मालकाला तणावपूर्ण गोष्ट होऊन बसेल.”**[३२]

- अन्याय व आपत्ती यांपासून मुक्त असणाऱ्या समाज उभारणीसाठी आपण सर्वांनी उदार व दानशूर असावे. जरी आपली आर्थिक संसाधने तुटपुंजी असली तरी, आपण मानवतेच्या प्रगतीसाठी काहीतरी योगदान केले पाहिजे, कारण खरी समृद्धि केवळ देण्यामधून साध्य होऊ शकते. उदारता हा मानवी आत्म्याचा गुण आहे; त्याचा आपल्या भौतिक परिस्थितीशी काहीही संबंध नाही. बहाउल्लाह म्हणतात:

**“दातृत्व व औदार्य माझे गुणधर्म आहेत; त्याचे कल्याण असो, जो माझ्या सद्‌गुणांनी स्वत:स भूषवितो.”**[३३]

- आपण लक्षात ठेवले पाहिजे की जी काही संपत्ती आपण बाळगतो, तिचा वास्तविक उगम आहे सर्व कृपामय परमेश्वर. तो आपल्या अस्तित्वाची साधने आपणास पुरवितो; तो प्रगतीसाठी आपणास पात्र बनवितो. आणि आपण जे काही त्याने आपणास दिले आहे त्याचा एक भाग त्याच्या धर्मकार्यासाठी खर्च करीत असतो. यामुळे, बहाई श्रद्धावंतांसाठी, कोषात दान देणे ही केवळ उदारतेची बाब नाही; तर ती एक आध्यात्मिक कृपादेखील आहे व एक महान व्यक्तिगत जबाबदारी आहे. धर्मसंरक्षक आम्हास सल्ला देतात:

**“आपण सर्वांनी एका निर्झरासारखे असावे जो सतत स्वत:चे सर्वस्व रिक्त करत असतो आणि एका अनोळखी, अदृश्य स्त्रोताच्या द्वारे पुन: भरला जातो. आपल्या मानवतेच्या कल्याणार्थ आपली मिळकत न थबकता, दारिद्र्याच्या भयाने न घाबरता सतत देत राहणे व अदृश्य व अचूक वैभवाच्या स्त्रोतावर दृढ श्रध्दा ठेवणे—हेच अर्थपूर्ण जीवन जगण्याचे गूढ रहस्य आहे.”**[३४]

भौतिक साधनांच्या विषयाला संबोधित करणाऱ्या या पाठ्यक्रमातील नंतरच्या अभ्यासक्रमात, आपणास येथे प्रस्तुत केलेल्या काही कल्पनांचा अधिक सखोल विचार करण्याची संधी मिळेल. आत्तासाठी, आपणास

नेहमीप्रमाणेच वरील विषयावर चर्चा करण्यासाठी आणि पुढील सराव करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते जेणेकरून आपण या  कल्पना नैसर्गिकरित्या आणि सहजतेने व्यक्त करण्यास शिकाल:

१. वरील उद्धरणांच्या आधारे, खालील वाक्यांमधील रिक्त जागा भरा.

क. बहाउल्लाह आम्हास सांगतात की आपण ———————— ———————— आपली ———————— कमवावी आणि आपल्या ———————— व आपल्या ———————— सर्व ———————— स्वामी, ———————— प्रेमासाठी ————— करावी.

ख. आपण ———————— व ———————— फळे द्यावेत, ज्यामुळे ————— आणि —————, त्यांच्यापासून ————— घ्यावा.

ग. ———————— ————— व ————— ———————— गुंतवून घेणे ——————— ———————— आहे, कारण यामध्ये ———————— ———————— आहे.

घ. अब्दुल—बहा स्पष्ट करतात की, ————— ————— ———————— आहे, जर ————— ———————— ————— असेल.

च. —————, जर काही ———————— ———————— ————— असेल आणि ———————— इतर लोक ————————असतील, तर त्या ———————— ———————— इतर ————— काहीच ————— किंवा ————— ————— नाही आणि अशी ————— तिच्या ——————— ———————— गोष्ट ————— बसेल.

छ. बहाउल्लाह म्हणतात, “————— व ————— माझे ————— आहेत; त्याचे ————— असो, जो ————— ————— स्वत:स —————.”

ज. आणि धर्मसंरक्षक आम्हास प्रोत्साहित करतात की, आपण ————— एका —————————— असावे जो ————— ————— ————— ————— करत असतो आणि एका —————, ——————— ——————— द्वारे ——— भरला जातो.

झ. आपल्या ——————————— ——————————— आपली ———————— न

————————, ——————————— ———————— न ———————————

———————— देत राहणे व ———————— व ———————— ———————————

——————————— दृढ —————— ठेवणे—हेच ———————————

———————————— जगण्याचे ———— —————— आहे.

२. वरील स्तुतीकरणामध्ये अनुसरण केलेल्या विचारांचा क्रम लिहा: ——————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

——————————————————————————————————————————————

## विभाग १४

एखाद्या खेड्यात किंवा क्रियाकलापांनी परिपूर्ण प्रभागात होत असलेल्या संभाषणाच्या प्रकारांबद्दल अंतर्दृष्टी प्राप्त करण्यासाठी, आम्ही विद्यापीठातील तरुण विद्यार्थिनी, अलेहांद्राच्या प्रयत्नांचे अनुसरण केले आहे. अनेक आठवड्यांच्या भेटींच्या मालिकेत, अलेहांद्राने, श्री. आणि श्रीमती सँचेझ यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली आहे, आणि तिला आशा आहे की, हे त्यांना धर्मश्रद्धेचे ज्ञान अधिक दृढ करण्यात मदतनीस ठरेल आणि त्यांनी स्वीकारलेल्या शिकवणींशी त्यांची बांधिलकी मजबूत होईल. अखेरीस, सँचेझ दाम्पत्याची नात, बीॲट्रिसच्या या घटनास्थळी आगमनाने आम्हाला आणखी एका प्रकारच्या संभाषणाचे परीक्षण करण्यास सक्षम केले, हे दोन तरुणांमधील संवाद, जे दोघेही त्यांच्या समुदायाची सेवा कशाप्रकारे करू शकतात हे जाणून घेण्यासाठी उत्सुक आहेत. या अनुभवाच्या माध्यमातून पुढे जाताना आणि त्यामधील सराव करत असताना, आम्ही हे जाणले आहे की, संबंधित विषयांच्या वाढत्या ज्ञानाव्यतिरिक्त, आम्ही येथे विचार करत असलेल्या संभाषणांना अविरत ठेवण्यासाठी, काही आध्यात्मिक गुण, वृत्ती आणि कौशल्ये आवश्यक आहेत.

या आणि पुढील घटकाच्या विभागात आम्ही वेगळ्या प्रकारच्या विषयांवर अन्वेषण करू —ते म्हणजे, सामान्यत: संस्थेद्वारे प्रोत्साहन दिलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सहभागी तरुणांसह आयोजित केलेल्या कुटुंबांच्या भेटीदरम्यान होणाऱ्या चर्चेच्या विषयांवर. आधीच सूचित केल्याप्रमाणे, लहान मुलांसाठी वर्ग शिकवणे आणि युवाकिशोर गटाला अनुप्रेरक म्हणून मार्गदर्शन करणे ही सेवाकार्ये अनुक्रमे पुस्तक ३ आणि ५ मधील पुढील अभ्यासक्रमांमध्ये संबोधित केलेली कार्ये आहेत. आपण संबंधित दोन कार्यक्रमांशी परिचित असाल किंवा

नसाल, जे यावर अवलंबून असेल की आपण स्वत: त्यामध्ये लहान वयात भाग घेतला होता की नाही.

सर्वप्रथम, आपण युवाकिशोरांच्या कुटुंबियांसोबत करत असलेल्या संभाषणाचा आधार असलेल्या सामग्रीवर विचार करूया. आपण कल्पना करूया की आम्ही आमची कथा सोडल्यापासून काही काळ गेला आहे आणि बीॲट्रिस आता पुस्तक २ चा अभ्यास करत आहे. अलेहांद्रा बीॲट्रिसला विचारते की जेव्हा ती तिच्या सहाय्याने एक गट स्थापन करणार असलेल्या अनेक युवाकिशोरांच्या कुटुंबांना भेट देते तेव्हा तिला तिच्यासोबत यायचे आहे का. बीॲट्रिस हे उत्सुकतेने स्वीकारते.

अलेहांद्रा बीॲट्रिसला ती कशाप्रकारे कल्पना करत आहे ते समजावून सांगते. “आम्ही प्रत्येक भेटीची सुरुवात अशाप्रकारे करू,” ती तिला सांगते, “पालकांना त्यांच्या मुलाने किंवा मुलीने सहभागी होण्यात स्वारस्य दाखवून आणि प्रभागात कार्यरत असेलेल्या समुदाय–निर्माण प्रक्रियेचा एक भाग असल्याचे नमूद करून आपण या विषयाचा पालकांना परिचय करून देऊ. तद्नंतर आम्ही त्यांच्यासोबत कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी असलेल्या काही संकल्पना आणि कल्पना सामायिक करू. आपल्या भेटींच्या मालिकेतील ही पहिलीच भेट असेल आणि आमची आशा आहे की, कालांतराने जसजसे संभाषण पुढे जाईल, तसतसे कुटुंब केवळ विविध मार्गांनी गटाला सक्रियपणे पाठिंबा देणार नाही तर समुदायात युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाचे प्रवर्तक देखील बनतील.”

अलेहांद्रा आणि बीॲट्रिस पुढे काही मुद्द्यांवर चर्चा करतात जे ते प्रत्येक कुटुंबासोबत सामायिक करणार आहेत. पहिल्या भेटीत ते केवळ काही भाग सामायिक करतील आणि उर्वरित नंतरच्या संभाषणात संबोधित करतील हे लक्षात ठेऊन, त्यांना महत्त्वाच्या वाटत असलेल्या सर्व कल्पना लिहून ठेवण्याचे ते ठरवतात. युवाकिशोरांच्या क्षमतांबद्दल त्यांनी नमूद केलेले मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:

- एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात, १२ ते १५ वयोगटातील तीन वर्षे निर्णायक असतात –बालपणापासून परिपक्वतेकडे संक्रमणाचा टप्पा.

- या वयोगटातील तरुण व्यक्तींना आम्ही “युवाकिशोर” म्हणून संबोधतो. ते आता लहान मुले नाहीत तथापि, ते तारुण्याच्या पूर्णावस्थेत पोहोचलेले नाहीत.

- दुर्दैवाने, युवाकिशोरांची आवेगपूर्ण, बंडखोर, आत्ममग्न आणि सतत संकटांना बळी पडणाऱ्या व्यक्ती अशी चुकीची प्रतिमा व्यापकपणे प्रचारित केलेली आहे. तथापि, आम्ही त्यांना वेगळ्या प्रकाशात बघतो. हे खरे आहे की, आयुष्याच्या या अल्प कालावधीत, आपण सर्वजण शारीरिक, भावनिक आणि मानसिकदृष्ट्या जलद बदल अनुभवतो. आणि हे देखील खरे आहे की, या परिणामी, आपण काही बंडखोरपणा दर्शवू शकतो. तथापि, वास्तवात, हे महान क्षमतेचे आणि मोठ्या आश्वासनाचे वय आहे.

- काही थोड्या काळापूर्वी, आम्ही स्वत: युवाकिशोर होतो आणि या बदलांचा आमच्या जीवनावर कसा परिणाम झाला हे आम्हास आठवते. कधी आम्ही धाडसी होतो तर कधी भित्रे होतो. कधीकधी आम्ही

अत्यंत मिलनसार होतो आणि कधीकधी अत्यंत लाजाळू होतो. लक्ष वेधण्याच्या आशेने आम्ही अनेकदा एकटे राहण्याची इच्छा व्यक्त केली होती. आम्हाला हे समजून घ्यायचे होते की आम्ही कोणत्या गोष्टींमध्ये संपन्न होतो आणि आमच्यात कोणत्या प्रतिभा आणि क्षमता आहेत. आणि इतर लोकांनी आम्हाला कसे पाहिले आणि आमच्या कल्पनांबद्दल त्यांचे काय मत आहे हे आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते.

- हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की अशा प्रकारचे वर्तन केवळ तात्पुरते आहे. व्यक्तीच्या आयुष्यात या वर्षांमध्ये मनाच्या काही शक्ती वेगाने विकसित होतात. आपण अस्तित्वाच्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधू लागतो. आपण आपल्या आजूबाजूला काय होत आहे याचे विश्लेषण करतो आणि आपल्यास जे काही शिकवले गेले आहे त्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. आणि प्रौढ व्यक्तींनी जे करायला सांगितले ते आपोआप पाळायला आम्ही पूर्वीप्रमाणे तत्पर नसतो, विशेषत: जेव्हा आम्हास त्यांच्या शब्द आणि कृतींमध्ये विरोधाभास दिसतो.

- जर युवाकिशोरांना त्यांच्या उदयोन्मुख शक्तींचा उपयोग करण्यास मदत करायची असेल, तर त्यांच्याशी लहान मुलांसारखे वागणे टाळणे आवश्यक आहे. अब्दुल–बहा या वयाचे वर्णन खालीलप्रमाणे करतात:

  **“कालांतराने तो युवावस्थेत प्रवेशतो, ज्यामध्ये त्याच्या पूर्वीच्या अवस्था व आवश्यकतांचे स्थान त्याच्या उन्नत दर्जाला लागू असणाऱ्या नवीन आवश्यकतांनी घेतलेले असते. त्याची निरीक्षण क्षमता विस्तृत व सखोल झालेली असते; त्याची बौद्धिक क्षमता प्रशिक्षित व जागृत झालेली असते; बाल्यावस्थेतील मर्यादा व वातावरण त्याच्या शक्तीवर व संपादनांवर बंधनकारी राहत नाहीत.”**[३५]

- विश्व न्याय मंदिर, बहाई धर्मश्रद्धेची जागतिक प्रशासकीय संस्था, आम्ही युवाकिशोरांसोबत सेवाकार्य करत असताना लक्ष केंद्रित असलेल्या दृष्टिकोनाबद्दल म्हणतात:

  **“जेव्हा जागतिक विचारसरणी या वयोगटाविषयी समस्याग्रस्त, उपद्रवी भौतिक आणि भावनिक बदलांच्या व्यथेत गुंतलेली, बेजबाबदार व आपल्या नादात ढंग असलेली अशी प्रतिमा सादर करते तेव्हा बहाई समुदाय –त्यांचेसाठी जी भाषा वापरतो आणि ज्या पद्धती अंगीकारतो– त्यादृष्टीने निश्चितपणे विरुद्ध दिशेने मार्गक्रमण करीत आहे, बहाई समुदाय त्याऐवजी तरुणांमध्ये परहितवाद, न्यायाची तीव्र भावना, विश्वासंबंधी शिकण्याविषयी उत्सुकता आणि अधिक चांगल्या जगाच्या उभारणीस हातभार लावण्याची इच्छा पाहतो.”**[३६]

अलेहांद्रा आणि बीॲट्रिस नंतर त्यांचे लक्ष युवाकिशोर आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमाकडे वळवतात आणि त्यातील काही वैशिष्ट्ये ओळखण्याचा प्रयत्न करतात:

- हा कार्यक्रम १२ ते १५ वयोगटातील मित्रांच्या गटाशी संबंधित आहेत ज्यांच्यासोबत ते त्यांचे विचार सामायिक करू शकतात, प्रकल्पांवर कार्य करू शकतात, खेळ खेळू शकतात इ. या कारणास्तव, हा कार्यक्रम “युवाकिशोर गट” च्या संकल्पनेभोवती तयार केला गेला आहे. प्रत्येक गटाला “अनुप्रेरका” द्वारे मार्गदर्शन केले जाते, बहुतेकदा एक तरुण, जो सहभागींचा एक खरा मित्र म्हणून, त्यांची क्षमता विकसित करण्यात मदत करतो.

- गट नियमितपणे भेटतात. त्यांच्या वर्गांमध्ये, युवाकिशोर संकल्पना शोधण्यास आणि आक्षेप किंवा उपहासाची भीती न बाळगता कल्पना व्यक्त करण्यास शिकतात. त्यांना ऐकण्यासाठी, बोलण्यासाठी, प्रतिबिंबित करण्यासाठी, विश्लेषण करण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी आणि त्यावर कार्य करण्यास प्रोत्साहित केले जाते.

- आपण अशा वेळी जगत आहोत जेव्हा अनेक नकारात्मक शक्ती युवाकिशोरांच्या विचार आणि वागणुकीवर परिणामकारक ठरतात. अनुप्रेरक त्यांना या शक्तींचा सामना करण्यास मदत करतात —केवळ समाजाच्या नैतिक क्षयपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठीच नव्हे तर जगाच्या कल्याणकारी कार्य करण्यासाठी.

- हा कार्यक्रम मानवी आत्म्यामध्ये अंतर्भूत असलेल्या शक्तींचे पालनपोषण करण्याचा प्रयत्न करतो, ज्या शक्ती लवकरच पौगंडावस्थेमध्ये अधिक आणि मोठ्या प्रमाणात प्रकट होऊ लागतात. विशेषत: महत्वपूर्ण आहेत विचार करण्याची आणि ते अभिव्यक्त करण्याची शक्ती. युवाकिशोरांनी जगाविषयी सखोल कल्पना व्यक्त करण्यासाठी आणि ते कसे बदललेले पाहायचे आहे हे स्पष्ट करण्यासाठी, आवश्यक असलेली भाषाप्रणाली विकसित केली पाहिजे.

- युवाकिशोर, हेतूपूर्ण जीवनासाठी मूलभूत संकल्पनांचा अर्थ प्रतिबिंबित करण्यास उत्सुक असतात. हर्षोल्हास, आशा आणि उत्कृष्टता ही काही उदाहरणे आहेत. दुर्दैवाने लोक या कल्पनांबद्दल वरकरणी मार्गाने बोलतात. अशा संकल्पनांची सखोल माहिती मिळवणे, त्यांना दैनंदिन जीवनात अभिव्यक्ती कशी मिळते हे ओळखणे, तरुण मनांना एक सुदृढ नैतिक रचना तयार करण्यात आणि समाजाच्या नकारात्मक शक्तींना पराभूत करण्यास  मदत करू शकते.

- बौद्धिक विकासासाठी संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. युवाकिशोरांना कधीकधी शाळेत अडचण येऊ शकते कारण त्यांना मूलभूत संकल्पना समजून घेण्यासाठी पुरेशी मदत मिळत नसतानाही, वेगवेगळ्या विषयांवर बरीच माहिती शिकण्याची अपेक्षा असते. हा कार्यक्रम त्यांना कल्पनांचा सखोल विचार करण्यास प्रवृत्त करतो —नैतिक, गणिती, वैज्ञानिक इत्यादी— आणि यामुळे शाळेत त्यांच्या अभ्यासकार्यात सतत सुधारणा होत असते.

- युवाकिशोरांना कुठल्याही गोष्टी उत्तम प्रकारे समजून घेण्याची फार मोठ्या प्रमाणात इच्छा असते. त्यांच्या आजूबाजूला काय घडत आहे याची कारणे त्यांना समजून घ्यायची उत्सुकता असते. यशस्वी होण्यासाठी, त्यांना केवळ त्यांच्या शारीरिक नेत्रांनीच नव्हे तर त्यांच्या चैतन्याच्या नेत्रांनीच देखील पाहण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे, आध्यात्मिक धारणा वाढवणे: आध्यात्मिक शक्ती ओळखण्याची आणि सामोरे आलेल्या परिस्थितीत आध्यात्मिक तत्त्वे ओळखण्याची क्षमता.

- पाठ्यपुस्तकांच्या साहित्यातील मालिकेच्या सहाय्याने, हा कार्यक्रम विविध उद्दिष्टे साध्य करतो —नैतिकता, आध्यात्मिक धारणा आणि अभिव्यक्तीच्या शक्तींचा विकास. या पाठ्यपुस्तकांत जगाच्या विविध भागांतील तरुणांच्या जीवनाविषयीच्या साध्या कथा आहेत. युवाकिशोर या पाठ्यपुस्तकांचा एकत्रितपणे अभ्यास करण्यासोबतच, त्यामधील मजकुरावर चर्चा करतात आणि आवश्यक सराव पूर्ण

करतात, खेळांमध्ये भाग घेतात आणि कला आणि हस्तकला शिकतात.

- अनुप्रेरकाच्या साहाय्याने, युवाकिशोर गट सेवा प्रकल्पांची मालिका तयार करतात आणि पार पाडतात, जो या कार्यक्रमाचा एक प्रमुख घटक आहे. या प्रकल्पांद्वारे, युवाकिशोर समुदाय आणि त्याच्या गरजा याबद्दल विचार करायला शिकतात, विचारविमर्श करायला आणि आपापसात व समाजातील इतरांशी सहयोग करायला शिकतात.

- या पाठ्यपुस्तकांत अंतर्भूत असलेले विविध विषय आहेत; प्रत्येक विषय युवाकिशोरांच्या आध्यात्मिक सशक्तीकरणासाठी आवश्यक असलेल्या विषयावर लक्ष केंद्रित करते. उदाहरणार्थ, पहिले पाठ्यपुस्तक, "संपुष्टी" या विषयावर लक्ष केंद्रित करते —की परमेश्वर, आपण उदात्त ध्येये साध्य करण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची संपुष्टी करतो. आणखी एक पाठ्यपुस्तक, "आशा" या विषयाबद्दल आहे —अगदी कठीण काळातही आपण भविष्याकडे आशेने कसे पाहिले पाहिजे. आणखी एक "उत्कृष्टता" च्या संकल्पनेचे विश्लेषण करते. "आनंद" हा एका कथेचा विषय आहे, तर "शब्दाचे सामर्थ्य" हा दुसऱ्या कथेचा प्रतिबिंब आहे. गणिती संकल्पनांना संबोधित करणारे पाठ्यपुस्तक, एक शिस्तबद्ध मनाच्या शैलीबाबत अन्वेषण करतो. विज्ञानाच्या क्षेत्रात, एक पाठ्यपुस्तक आहे जे एखाद्याच्या आरोग्याची काळजी घेण्यावर लक्ष केंद्रित करते —शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक. आणि अशाप्रकारे एक डझन किंवा त्याहून अधिक पाठ्यपुस्तके आहेत ज्यांचा युवाकिशोर तीन वर्षांच्या अवधीमध्ये अभ्यास करतात.

अलेहांद्रा आणि बीऑट्रिस यांनी त्यांच्यासोबत पाठ्यपुस्तकातील काही मजकूर सोबत घेऊन जाण्याची योजना आखली, जेणेकरून जर पालकांना या पाठ्यपुस्तकांबाबत माहिती प्राप्त करून घ्यायची इच्छा असेल, तर ती सामायिक करता येईल. जर आपण या मजकुरासोबत उत्तमप्रकारे परिचित नसाल, तर आपणास शक्य तितक्या अनेक कथा वाचण्यासाठी थोडा वेळ देणे उपयोगी ठरेल —यामुळे आपणास समुदायामध्ये उलगडणाऱ्या विविध संभाषणांचे अधिक चांगल्या पद्धतीने अनुसरण करता येईल. दरम्यान, आपणास आपल्या अध्ययन वर्गातील इतर सहभागींसोबत वर सादर केलेल्या कल्पनांबद्दल पूर्णपणे चर्चा करण्यास प्रोत्साहित केले जाते, ज्यांचा पुस्तक ५ मध्ये अधिक सखोल विचार केला गेला आहे. जर, त्या पुस्तकाचा अभ्यास केल्यानंतर, आपण एखाद्या युवाकिशोर गटाचे अनुप्रेरक म्हणून सेवा देण्याचे ठरवले, तर आपण त्या गटाच्या सहभागींच्या कुटुंबांना पद्धतशीरपणे भेट द्याल आणि त्यांच्यासोबत या आणि तत्सम अनेक कल्पना जाणून घ्याल. तथापि आताही, बीऑट्रिसप्रमाणे, आपणास आपल्या समुदायातील युवाकिशोरांच्या कुटुंबांना देत असलेल्या भेटींमध्ये, एखाद्या अनुभवी व्यक्तीसोबत जावे असे वाटेल.

## विभाग १५

दुसऱ्या दिवशी, अलेहांद्रा आणि बीऑट्रिस तीन युवाकिशोरांच्या घरी भेट देतात जे त्या प्रभागात सुरु होत असलेल्या नवीन युवाकिशोर गटात सामील होणार आहेत. आध्यात्मिक सशक्तीकरण कार्यक्रमावर पालकांनी ज्या उत्साहाने संभाषणात भाग घेतला आहे ते पाहून बीऑट्रिसला आनंद होतो. दुपारच्या अखेरीस, बीऑट्रिसला खात्री आहे की ती अलेहांद्राला युवाकिशोर गटात मदत करणार आहे आणि तिला आशा आहे की येत्या वर्षभरात, ती स्वत: नवीन गटाचा अनुप्रेरक म्हणून सेवाकार्य कशाप्रकारे करू शकेल हे शिकायला आवडेल.

अर्थातच, तिच्या लक्षात आले आहे की, तिला या दरम्यान काही संस्थागत पुस्तकांचे अध्ययन करावे लागेल. तथापि, तिने त्या पुस्तकांच्या अध्ययनात त्याच स्थिर गतीने पुढे जाण्याचा निर्धार केला आहे, ज्याप्रकारे ती आतापर्यंत या टप्प्यावर पोहोचली आहे.

तर असे आहे की, अलेहांद्राच्या सतत सहाय्याने आणि प्रोत्साहनाने, बीॲट्रिस सेवेच्या मार्गावर पुढे प्रगती करते. याक्षणी, आपण तिची कथा पुन्हा सुरू करू या, जेव्हा काही महिन्यांनंतर, ती नुकतेच रुही पुस्तक ३ चे अध्ययन पूर्ण करणार आहे. तिच्या अध्ययन गटाच्या सहशिक्षिकेने, मॅरिबेल या लहान मुलांच्या वर्गशिक्षिकेला, बीॲट्रिस आणि तिच्या सोबतच्या सहभागींना, ग्रेड १ साठी नव्याने सुरु झालेल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांना देणाऱ्या भेटींमध्ये तिच्यासोबत येण्यास आमंत्रित करण्यास सांगितले आहे. बीॲट्रिसला वाटते की ती पुस्तक ३ च्या अध्ययनातून बरेच काही शिकली आहे. आणि तिला अलेहांद्राकडून माहित आहे, जिने अनेक वेळा असा उल्लेख केला आहे, की बीॲट्रिसला पुस्तकातून मिळालेल्या अंतर्दृष्टीमुळे तिची अनुप्रेरक म्हणून सेवाकार्य करण्याची क्षमता वाढेल.

जेव्हा ते एकत्र येतात, तेव्हा मॅरिबेल बीॲट्रिसला सांगते की ते एम्मा नामक विद्यार्थीच्या आईला भेट देणार आहेत. “ती एक उत्साही लहान मुलगी आहे जिला शिकायला आवडते,” मॅरिबेल सांगते. “मी आधीच तिच्या पालकांना एकदा भेट दिली आहे आणि त्यांना लहान मुलांच्या बहाई वर्गाचे स्वरूप समजावून सांगितले आहे. त्यांनी उत्साहाने एम्माला बहाई वर्गात सहभागी होण्याची परवानगी दिली आहे. तिच्या आईने वर्गाबद्दल अधिक ऐकण्यास जिज्ञासा व्यक्त केली होती आणि मी तिला परत भेटण्याचे वचन दिले आहे आणि आम्ही शिकवत असलेल्या सामग्रीच्या अंतर्निहित शैक्षणिक कल्पनांबद्दल थोडेफार बोलूया हे सांगितले आहे. खरं तर, मी माझ्यासाठी काही टिप्पण्या लिहिल्या आहेत. आपली इच्छा असल्यास, आम्ही एकत्र त्या वाचू शकतो आणि विचारविमर्श करू शकतो.” यासोबत बीॲट्रिसला सहमत आहे. त्यांनी चर्चा केलेल्या टिप्पण्या खालीलप्रमाणे आहेत:

- सर्वप्रथम, मी श्रीमती मार्टिनेझ यांना सांगेल की लहान मुलांच्या बहाई वर्गात एम्मा सहभागी असल्याने मला किती आनंद झाला आहे आणि तिच्या काही विस्मयकारक गुणांचा उल्लेख करेल.

- बहाउल्लाह ह्यांच्या पवित्र लेखनीतील खालील उद्धरण तिच्यासोबत वाचून चर्चेला सुरुवात करणे योग्य वाटते:

  **“मनुष्यास अमूल्य रत्नांनी भरलेली खाण समजा. केवळ शिक्षणानेच त्याची भांडारे प्रकट होऊ शकतात आणि त्यापासून मानवजात लाभ घेण्यास योग्य होऊ शकते.”**[३७]

- या उद्धरणाचा एक शिक्षक म्हणून माझ्यावर किती प्रभाव पडला याबद्दल मी काही विचार मांडू शकते. मी सांगेल की, माझे हृदय आनंदाने ओसंडून वाहते, जेव्हा जेव्हा मी वर्गातील मुलांकडे पाहते आणि त्यांना अमूल्य रत्नांनी भरलेल्या खाणी समजते. त्यांच्यापैकी प्रत्येकामध्ये स्वर्गीय गुण दाखवण्याची क्षमता आहे. त्यांच्यापैकी प्रत्येकाकडे प्रतिभा आहे जी शोधली जाऊ शकते आणि विकसित केली जाऊ शकते. त्यांच्यापैकी प्रत्येकजण मोठा होऊन समाजाचा एक मौल्यवान सदस्य बनू शकतो आणि जगाच्या उन्नतीसाठी योगदान देऊ शकतो.

- तद्नंतर, मी कदाचित काही अनमोल रत्नांची उदाहरणे द्यावी जी शिक्षणाने प्रत्येक मुलामध्ये प्रकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी अंत:करणाच्या काही शक्तींचा उल्लेख करू शकतो, जसे की, निसर्गाचे नियम शोधणे, सुंदर कलाकृती निर्माण करणे आणि उदात्त विचार व्यक्त करणे. मी समजावून सांगेल, की जेव्हा मुलांना योग्य शिक्षण मिळते, तेव्हा मुले या सर्व शक्ती विकसित करण्यास प्रारंभ करू शकतात. परंतु, हे होण्यासाठी मुलांनी लहान वयातच काही गुण आत्मसात केले पाहिजेत. उदाहरणार्थ, त्यांनी लक्ष द्यायला शिकले पाहिजे, आवश्यक असेल तेव्हा कठोर परिश्रम केले पाहिजे, आणि ते जे काही करत आहेत त्यावर लक्ष केंद्रित करणे शिकले पाहिजे. त्यांची वाढ अशा व्यक्तींमत्वामध्ये झाली पाहिजे ज्यांना इतरांच्या समृद्धीची काळजी आहे आणि ज्यांना समाजाची सेवा करायची आहे. म्हणूनच, लहान वयात त्यांच्या चारित्र्याच्या विकासाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

- तेव्हा, श्रीमती मार्टिनेझ यांना तिची मुलगी कशा प्रकारची व्यक्ती व्हावी याविषयी काही कल्पना आमच्याशी सामायिक करण्यास ही एक उचित संधी असेल. एम्मासाठी तिला महत्त्वाचे वाटणारे काही चारित्र्य वैशिष्ट्य कोणते आहेत?

- त्यांनी नमूद केलेल्या गुणांपैकी काही नक्कीच आध्यात्मिक गुणांच्या श्रेणीत येतील, ज्याचा विषय मी नंतर मांडणार आहे. मी सांगेल की एखाद्या व्यक्तीमध्ये काही वैशिष्ट्ये असली पाहिजेत, जी मानवी अस्तित्वासाठी मूलभूत आहेत. ही वैशिष्ट्ये मानवी आत्म्यात अंतर्निहित आहेत. आपण ही वैशिष्ट्ये याप्रकारे विकसित करतो, ज्याप्रकारे आपण आपल्या हृदयाचा आरसा स्वच्छ करतो, जेणेकरून तो परमेश्वराचे गुणधर्म प्रतिबिंबित करू शकेल. त्यांना आम्ही आध्यात्मिक गुण म्हणून संबोधतो, आणि श्रेणी १ मधील जे पाठ आम्ही आमच्या वर्गात शिकवतो, ते मुख्यत: या गुणांवर केंद्रित आहे.

- मी विचार करत आहे की मी हा वार्तालाप पुढे करत राहील आणि पुस्तक ३ मधील श्रेणी १ च्या पाठांमध्ये संबोधित केलेल्या काही आध्यात्मिक गुणांची गणना करेल आणि तिच्याशी संबंधित उद्धरण सामायिक करेल. मी समजावून सांगेन की एम्मा ही उद्धरणे कंठस्थ करणार आहे आणि ती तिच्या मुलीला ही उद्धरणे पठण करायला विचारू शकते, सोबतच अशा प्रार्थना ज्या एम्मा पुढे शिकेल:

  — प्रेम:

  **"हे मित्रा! तुझ्या हृदयाच्या बागेत प्रेमाच्या गुलाबाशिवाय दुसरे काही रुजवू नकोस..."**[३८]

  — न्याय:

  **"न्यायाच्या मार्गावर तुम्ही चला कारण, सत्यत:, हाच खरा सन्मार्ग आहे."**[३९]

  — सत्यवादिता

  **"सत्यवादिता सर्व मानवी सद्गुणांचा पाया आहे."**[४०]

— हर्षोल्हास

**“हे मानव पुत्रा! तुझ्या हृदयातील आनंदाने तू हर्षित हो म्हणजे माझ्या मिलनास आणि माझे सौंदर्य परावर्तित करण्यास तू सुपात्र होशील.”[४१]**

मॅरिबेल आणि बीॲट्रिस ठरवतात की वरील विषय एका भेटीसाठी पुरेसे आहेत. आपण लवकरच पुस्तक ३ चे अध्ययन कराल आणि लहान मुलांच्या आध्यात्मिक शिक्षणासाठी, रुही संस्थेच्या सहा वर्षांच्या कार्यक्रमाला आकार देणाऱ्या काही तत्त्वांवर चिंतन करण्याची संधी आपणास मिळेल. त्याआधी, जर काही पालकांना लहान मुलांच्या वर्गशिक्षकासोबत भेटण्याची संधी आपल्यासाठी उद्भवली, तर येथे मांडलेल्या कल्पना सहाय्यक ठरतील आणि आता आपण आपल्या अध्ययन गटात यामधील प्रत्येक बिंदुविषयी चर्चा करावी.

## विभाग १६

यापूर्वी आपण अब्दुल—बहांचे हे शब्द वाचले आहेत: “मानवांमधील बंधुभाव व एकात्मतेची बंधने जितकी अधिक बळकट असतील तर रचनात्मकतेची शक्ति आणि मानवी कृतीच्या सर्व पातळ्यांवरील उपलब्धी तितकीच महान राहील.” विश्व न्याय मंदिर आम्हास सांगतात की, घरोघरी भेटी देत असताना आणि आपल्या स्वत:च्या निवासस्थानी आमंत्रित करत असताना, आपण “आध्यात्मिक ऋणानुबंध निर्माण करीत आहात जे समुदायाची भावना बळकट करतात.” तेव्हा, या प्रथेचा आपल्या वाढत्या समाजाच्या संस्कृतीवर होणारा परिणाम आपण कमी लेखू नये.

मागील विभागांमध्ये आम्ही एकमेकांच्या घरी भेट देत असताना घडणाऱ्या विविध प्रकारच्या संभाषणांवार चिंतन केले आहे. आपण सर्वजण, सेवेच्या मार्गावर चालत असताना, बहाउल्लाह ह्यांच्या शिकवणींचा आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक जीवनात उपयोग करण्याबद्दल आपल्या गावात, शहरात किंवा विभागात विस्तारणाऱ्या संभाषणात सहभागी होऊ. काहीवेळा हे या शिकवणींबद्दलचे त्यांचे ज्ञान, अधिकाधिक वाढत्या संख्येला सक्षम करण्यासाठी आयोजित केलेल्या औपचारिक भेटींच्या मालिकेत उलगडेल. इतर अनेक प्रसंगी संस्थेचे शैक्षणिक कार्यक्रम, त्यांची उद्दिष्टे आणि आशय हा चर्चेचा विषय असेल. समुदाय—निर्माण प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आमंत्रणे अधिकाधिक प्रमाणात शेजारी आणि मित्रांना दिली जातील. जसजसे आपण भविष्याकडे पाहता, आणि आपल्या पुढे असलेल्या सेवेच्या मार्गाकडे पाहता, तसतसे आपण या विभागामध्ये सादर केलेली सामग्री चांगल्या प्रकारे जाणून घेण्यासाठी, प्रत्येक विषयावर संभाषण करण्याचा अनुभव मिळवण्यासाठी आणि अर्थातच, बहाउल्लाह ह्यांच्या शिकवणींबद्दल आपल्या स्वत:चे ज्ञान वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. अशा प्रकारे इतरांसोबत परमेश्वराचे पवित्र वचन सामायिक करण्याचा कधीही न संपणारा आनंद आपला असेल.

## संदर्भ


१. रहस्यमय शब्द, (अरेबिक क्र. ४)
२. बहाउल्लाह, बहाई प्रार्थना
३. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. ४
४. वरील प्रमाणे, क्र. ५
५. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना
६. वरील प्रमाणे
७. वरील प्रमाणे
८. जागतिक शांततेचा प्रसार
९. अब्दुल–बहा, बहाई प्रार्थना
१०. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. ४५
११. अब्दुल–बहा, बहाउल्लाहांची जागतिक कार्यव्यवस्था
१२. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. ५
१३. जागतिक शांततेचा प्रसार
१४. अब्दुल–बहा, पॅरिस येथील वक्तव्ये
१५. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. १४६
१६. जागतिक शांततेचा प्रसार
१७. रहस्यमय शब्द, (पर्शियन क्र. ४४)
१८. वरील प्रमाणे (पर्शियन क्र. ६६)
१९. अब्दुल–बहांच्या पत्रिकेमधून
२०. जागतिक शांततेचा प्रसार
२१. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२२. वरील प्रमाणे
२३. बहाउल्लाह
२४. वरील प्रमाणे
२५. अब्दुल–बहांच्या पत्रिकेमधून
२६. बहाउल्लाह, किताब–ए–अकदस
२७. अब्दुल–बहांच्या लेखणीतील वेचलेली सुमने
२८. विश्व न्याय मंदिराच्या संदेशातून
२९. वरील प्रमाणे
३०. रहस्यमय शब्द, (पर्शियन क्र. ८२)
३१. वरील प्रमाणे (पर्शियन क्र. ८०)
३२. दैवी संस्कृतीचे रहस्य
३३. रहस्यमय शब्द, (पर्शियन क्र. ४९)
३४. शोघी एफेंदी
३५. जागतिक शांततेचा प्रसार
३६. विश्व न्याय मंदिराच्या संदेशातून
३७. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. १२२
३८. रहस्यमय शब्द, (पर्शियन क्र. ३)
३९. बहाउल्लाह यांच्या लेखसुधेतील अमृत वेंचे, क्र. ११८
४०. दैवी न्यायाचे आगमन
४१. रहस्यमय शब्द, (अरेबिक क्र.३६)